UNIVERSAL LIBRARY

OU_180491

UNIVERSAL LIBRARY

* * * * * *
* * * * *
* * * *

# नाक्षत्र-रहस्य

* * * *
* * * * *
* * * * * *

भाग १ ला


लेखक

महादेव मुराहरी (झित्री) हुंडेकरी, ज्योतिषी

"ज्यो. ठोकताळे व अनुभव" कर्ते



प्रकाशक,

वि. ग. भागवत आणि मंडळी,

ज्योतिष-ग्रंथप्रकाशक, पुणें नं. २.



( सर्व प्रकारचे कायमचे हक्क प्रकाशकांचे स्वाधीन. )



सन १९३३ ] [ किं. १॥ रु.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| विद्वज्जनांस प्रार्थना | |
| सामान्य माहिती | १ |
| योगांचीं नांवें | ६ |
| करणांचीं नांवें | ६ |
| नक्षत्राच्या संज्ञा | ७ |
| लोचनसंज्ञा व मुखसंज्ञा | ८ |
| नक्षत्र व पौर्णिमा | ९ |
| नक्षत्र-पाद | ९ |
| नक्षत्रांचें वेध | १० |
| सप्त व पंचशलाका चक्रें | ११ |
| वर्ण-नक्षत्रें | १२ |
| नक्षत्रांच्या विषघटी | १३ |
| गण्डांत-तारा | १४ |
| ज्येष्ठा नक्षत्र-फल | १४ |
| मूळ ,, ,, | १५ |
| ,, ,, लोक पाहणें | १६ |
| आश्लेषा नक्षत्र-फल | १७ |
| मृत्युप्रद नक्षत्रें व त्यांचा गंडकाल | १८ |
| अथर्वज्योतिष-संज्ञा | १९ |
| नक्षत्रांचा साधारण फलादेश | १९ |
| योगफल | २१ |
| करणफल | २२ |
| अवकहडा चक्र | २३ |
| राशींचीं नांवें | २६ |
| राशिस्वामी व त्यांचीं उच्चनीचें | २६ |
| राशींचीं तत्त्वें | २६ |
| ग्रहांचें शत्रु-मित्र-कोष्टक | २७ |
| ग्रहांचे दृष्टियोग | २८ |
| कुंडलींतील बारा भावांचीं कारकत्वें | २८ |
| ग्रहांचे धंदे | ३१ |
| नक्षत्रविभागात्मक राशी | ३३ |
| नक्षत्र-वर्णन | ३६ |
| स्त्रीजन्म-नक्षत्रफल-विचार | ५४ |
| ग्रहांचें नक्षत्रफलवर्णन | ५७ |
| हर्शल व नेपच्युन | ८९ |
| नवीन १२ वा ग्रह प्लूटो | ९४ |
| नक्षत्रांचे गुणधर्म | ९४ |
| तीक्ष्ण अथवा राक्षसी नक्षत्रें | १०० |
| नक्षत्रांचे वर्ग व त्यांचे धर्म (देव, मनुष्य व राक्षसगण) | १०१ |
| नाक्षत्रिक कुंडलीची सोपी पद्धत (कोष्टक) | १०६ |
| नक्षत्रांचे शर, दिशा, क्रांति व वार्षिक गति (कोष्टक) | १०९ |
| सप्तर्षींचे क्रांतिवृत्ताचे अंश गति | ११२ |
| क्रूर नक्षत्रांचीं द्वादशभाव-गत फलें | ११३ |
| साधाण योग | ११९ |
| तीनहि गणांचें नाक्षात्रिक विवेचन | ११९ |
| कांहीं नाक्षत्रिक फलांच्या कुंडल्या (अल्प चरित्रासह) | १२१ |


मुद्रकः—एन. टी. भिडे, श्रीरामेश्वर प्रेस, रविवार पेठ, विष्णुपुरा, पुणें.

# विद्वज्जनांस प्रार्थना

आतांपर्यंत ज्योतिषविषयक पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत व त्यांत फलित विषय, राशी व ग्रहांचें वर्णन, त्यांचे योग वगैरे परिप्रकारच्या पद्धतींचें वर्णन आलें आहे. परंतु नक्षत्रांसंबंधीं फारच थोडे ग्रंथ आहेत. सूक्ष्मरीतीनें अंश, कला यांचा विचार करावयाचा तर प्रत्येक राशीच्या प्रत्येक अंशाचे गुणधर्म पूर्ण माहित अथवा पाठ पाहिजेत. यासंबंधीं कै. **नवाथे** यांचा **सुलभजातक—भाग ४ था,** पाहिला म्हणजे कल्पना होईल. परंतु त्यांत प्रत्येक नक्षत्रांच्या गुणधर्माचें व त्याच्या सामर्थ्याचें ज्ञान अंशावरून होत नाहीं. त्याला नक्षत्रांसंबंधींचीं माहिती पाहिजे. **मुहूर्तचिंतामणी** व **मुहूर्तमार्तंड, नारदसंहिता, सर्वार्थचिंतामणी, वराहसंहिता, बृहज्जातक** वगैरे वगैरे ग्रंथांतून नक्षत्रासंबंधीं कुंडलीप्रमाणें माहिती दिलेली नाहीं. व मिल्ड-सिटीचा **भृगुसंहिता** ग्रंथ छापील प्रसिद्ध आहे. त्यांतहि नक्षत्रांचीं फलें अगदीं थोडीं दिलीं आहेत. या ग्रंथांत अंदाजें चार हजार कुंडल्या साधारण ८०–९० वर्षांच्या दिल्या आहेत. त्यांत दिलेल्या कुंडल्या लग्नकुंडल्या नसून पाक्षिक आहेत. त्यांतील बऱ्याचशा कुंडल्या जमत नाहींत. फलादेशहि बहुतेक सर्व सारखाच आहे. नुसत्या भृगुसंहिता एवढया नांवावर ग्रंथविक्री करून निव्वळ द्रव्यार्जन करण्यासाठींच हा खटाटोप आहे, असें स्पष्ट म्हणणें भाग येतें ! असो. पंडित **रघुनाथशास्त्री** यांनीं आपल्या **भविष्य-सिद्धांत** नांवाच्या ग्रंथांत शेवटीं एकच नाक्षत्रिक कुंडली देऊन साधारण नक्षत्रांचे गुणधर्म दिले आहेत व कै. श्री. गणकभास्कर **नवाथे** यांनीं **नाक्षत्रफल** या नांवाच्या लहानशाच पुस्तकांत परंतु नुसत्या नक्षत्रांसंबंधीं चांगली, योग्य व व्यवस्थेशीर माहिती दिली आहे. त्यावरून नक्षत्रफलांसंबंधानें बराच बोध होण्यासारखा आहे. पूर्वीं मु. नाशिक येथें श्री. रा. रा कै. **घोलप** यांनी आपल्या **ज्योतिषफलादर्श** या मासिकांतून मात्र नाक्षत्रिक कुंडल्या देऊन त्यांचें वर्णन केलेलें आहे व प्रत्येक नक्षत्राचे पूर्ण गुणधर्म व कारकत्व वगैरेंचेंहि पूर्णपणें विवेचन केलें आहे. मासिक चालू असतां ते कैलासवासी झाल्यामुळें व त्यांच्या मागून तें पुरें करण्यास कोणी नसल्यामुळें तो प्रयत्न जेथल्या तेथेंच राहिला. माझा विचार बऱ्याच दिवसांपासून नक्षत्रांसंबंधीं थोडीबहुत माहिती प्रसिद्ध करावी व त्यावर विद्वानांचे अभिप्राय व सूचना ज्याप्रमाणें येतील त्याप्रमाणें त्यांत सुधारणाहि कराव्या, असा होता.

ही योगायोग ईश्वरकृपेंकरून आज आला आहे. आमचे ज्योतिषविषयक गुरु रा. रा. **नरहरराव डिंगरे** यांनीं मला ज्योतिषाचा नाद लावून व वेळोवेळीं माहिती देऊन जन्माचें ऋणी केलें आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. व प्रस्तुत पुस्तक लिहिण्याच्या कामीं रा. **मोकाशी** मास्तर यांनीं वेळोवेळीं जी मदत केली व त्यांत त्यांची ज्योतिषविषयासंबंधीं जी विलक्षण गोडी दिसून आली, ती त्यांस फार भूषणावह आहे, यांत संशय नाहीं. रा. रा. **काटवे** यांनीं नक्षत्रांच्या फलांसंबंधीं बऱ्याच सुधारणा करून दिल्या, याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहेत. पूर्वीं मीं **ज्यो. वि. ठोकताळे व अनुभव** या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील शकुनाच्या भागासंबंधीं तो भाग लवकर पुरा करून प्रसिद्ध करावा म्हणून बऱ्याच सूचना आल्या आहेत. तोहि सवडीनुसार पूर्ण करून जिज्ञासू जनांपुढें ठेवण्याची इच्छा आहे. सर्व इच्छा पूर्ण करणारी तुळजा भवानी समर्थ आहे.

यापुढें प्रत्येक मनुष्याच्या नाक्षत्रिक कुंडलीवरून कुंडलीचे गुणधर्म सहज समजावे व फलितहि सोपें व्हावें म्हणून नुसत्या ग्रहांचीं फलें व त्यांचें प्रत्येक नक्षत्रांतून भ्रमण आणि प्रत्येक भावावरून व त्या त्या स्थानावरून त्यांचे येणारे फलादेश, यांचें अनुभवशीर वर्णन **नाक्षत्र-रहस्य, भाग २ रा** यांत प्रत्येक चरणात्मक नाक्षत्रिक कुंडल्या देऊन करण्यांचा मानस असून तो लवकरच प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

प्रस्तुत पुस्तकाची पद्धत साधारतः सोपी अशी जरी आम्हीं आमचेकडून अमलांत आणिली आहे तरी त्यांत बरेच दोषहि असण्याचा संभव आहे. तरी वाचकांस—विशेषतः ज्योतिषवर्ग व विद्वज्जन यांस आमची नम्र प्रार्थना कीं, त्यांना या पुस्तकांत जे जे दोष आढळतील ते ते त्यांनीं आम्हांस ( झालेल्या दोषांबद्दल क्षमा करून ) जरूर कळवावे व त्यांत काय काय सुधारणा करावयास पाहिजेत, त्याहि सुचवाव्या. म्हणजे द्वितीयावृत्तीचा योग येईल त्यावेळीं आम्हीं त्या आदरपूर्वक अमलांत आणूं.

| | |
|---|---|
| मु. नामपल्ली, नागाप्पाचा वाडा. | आपला कृपाभिलाषी, |
| नं. ९१, हैद्राबाद, दक्षिण | **महादेव मुराहरी ( क्षित्री ) हुंडेकरी,** |
| ता. १। ६। १९३३ | ज्योतिषी. |

॥ श्रीसरस्वती प्रसन्न ॥

# नाक्षत्र-रहस्य

## भाग १ ला

मेषाश्विप्रथमा नवर्क्षचरणा चक्रस्थिता राशयो
राशिक्षेत्रगृहर्क्षभानि भवनं चैकार्थसंप्रत्यये ॥
—बृहज्जातक.

अश्विनी नक्षत्राचा प्रथम चरण धरून नऊ नऊ चरणांची एकेक राशि, अशा रेवती नक्षत्रापर्यंत सत्तावीस नक्षत्रें मिळून मेषापासून मीनराशीपर्यंत बारा राशी होतात. या बारा राशी क्रांतिवृत्ताला धरून आकाशीं आहेत. यांना राशि-क्षेत्र किंवा गृह, भवन, अशीं एकार्थी नांवें आहेत.

ज्योतिषशास्त्रांत नक्षत्रें आणि राशी यांचा पदोपदीं उपयोग आहे व क्रांतिवृत्ताला धरून असलेलीं सत्तावीस नक्षत्रें हा सूर्यादि नऊ ग्रहांचा फिरण्याचा राजमार्ग आहे. यावरून मानवीप्राण्याच्या प्रारब्धकर्माचें ज्ञान ज्योतिषाला कळूं शकतें.

राशींचे दोन प्रकार आहेत. एक प्रकार—मेषादि राशीपासून मीनराशीपर्यंत बारा राशी ह्या कालपुरुषाच्या शिर्षादि अवयवीं वास करून आहेत म्हणून मेषराशि शिर कल्पून जन्मलेल्या प्राण्याच्या

शीर्षादि भागाची पुष्टि किंवा हानि याचा विचार करितात, यास **स्थिर** राशिचक्र म्हणतात.

दुसरा प्रकार—मनुष्यप्राण्याचा जन्म ज्या कालीं होतो, त्या कालीं आकाशांत पूर्व दिशेस जी राशि उदय पावत असेल तीस जन्मलग्नाचें शिर कल्पून इतर अवयवांचा राशीच्या धर्माप्रमाणें विचार केला जातो, यास चर राशी म्हणतात.

ह्यावरून नक्षत्राचा विचार अगदीं योग्य आहे, व त्याचे प्रत्येक चरणाचा विचारहि ठीक आहे. त्याहीपलीकडे अंश, कला, विकला इ० अतिसूक्ष्म विचार अलीकडे सायन भावचलित कुंडलीवरून करण्याचा जास्त प्रघात आहे. तसेंच निरयन कुंडलीचा विचारहि त्याचप्रमाणें स्पष्ट ग्रहावरून केल्यास पुष्कळसा उत्तम बोध होण्यासारखा आहे. राशिपद्धति प्रचारांत येण्यापूर्वीं वेदांगज्योतिषकालापासून सर्वत्र नक्षत्रपद्धतीच प्रचारांत होती. पूर्वकालीं नक्षत्रावरून फलें पाहण्याचा प्रघात जास्त होता. राशिपद्धतीपेक्षां नक्षत्रपद्धति जास्त सूक्ष्म आहे. नक्षत्रावरून फलें सांगणें जितकें वाटतें तितकें सोपें नसून बरेंच अवघड आहे. नक्षत्रांचे गुणधर्म व त्यांचे स्वामी आणि जन्मलग्न-कुंडलींत प्रत्येक नक्षत्र कोणत्या भावांत आहे, व प्रत्येक भावावर नक्षत्राचा अम्मल कशा प्रकारचा आहे आणि मनुष्यप्राण्याच्या अवयवांवर त्याचा बरावाईट परिणाम काय होतो, हें ज्योतिषास उत्तम कळूं शकतें.

एका नक्षत्राचे चार भाग करितात. त्या प्रत्येक भागास चरण असें म्हणतात. अशीं सव्वादोन नक्षत्रें मिळून एक राशि होते. एका राशींत नऊ चरण येतात. राशि बारा आणि नक्षत्रें सत्तावीस, मिळून एक राशि-चक्र पूर्ण होतें. स्थूल राशीच्या

विचारापेक्षां नक्षत्रविचार सूक्ष्म आहे. त्यांत प्रत्येक नक्षत्रचरणाचा विचार त्यापेक्षांहि सूक्ष्म आहे; आणि नक्षत्राच्या प्रत्येक चरणांपेक्षां अंशाचें निरीक्षण अति सूक्ष्म आहे, व प्रत्येक अंशाचा विचार करणें हें फारच कठीण आहे. तरीपण कै. श्री. गुरुवर्य गणकभास्कर **विष्णु गोपाळ नवाथे** यांनीं आपल्या **सुलभजातक** भाग ४ था, या पुस्तकांत चारुबेल वगैरे इंग्रजी ग्रंथांतून अंशांचीं फलें दिली आहेत त्यांचें भाषांतर व स्वतःचा अनुभवहि दिला आहे. अंशात्मक विचार करण्यास हा ग्रंथ फारच उपयोगी आहे; व अशा तऱ्हेचा ग्रंथ मराठींत सु. जा. भाग ४ था हा पहिलाच होय.

जन्मलग्न-कुंडली मांडली म्हणजे भावचलित कुंडली मांडतात. भावचलित कुंडलींत उदित भाव व भावसंधि असतात. ते वरवर आंकडे दिसतात, परंतु सूक्ष्म विचार केल्यास प्रत्येक नक्षत्राचें चरण प्रत्येक भावावर उदित असतें. वरील अंशात्मक आंकड्याच्या अंतर्यामीं नक्षत्राचे चरण भावामध्यें उदित असतात; व त्याच वेळेस आकाशांतहि नक्षत्रें त्याचप्रमाणें उदय पावत असतात. ह्या कुंडलीबरोबर नाक्षत्रकुंडली मांडली म्हणजे जन्माच्या वेळीं आकाशांत नक्षत्रांचा नकाशा कसा आहे, व प्रत्येक नक्षत्रांतून ग्रहांचें भ्रमण कसें चालू आहे, तें स्पष्टपणें दिसून येतें. नाक्षत्रकुंडली कशी मांडावी यासंबंधीं पुढें माहिती आहेच.

ज्योतिषशास्त्र हें नक्षत्र व राशि यांवर अवलंबून आहे. नक्षत्रें, दिवस, पक्ष, महिना, ऋतु, अयनें आदिकरून द्वादशभावात्मक कालपुरुष निर्माण पावला, यायोगें मनुष्यप्राण्याच्या प्रारब्धाचें यथायोग्य ज्ञान होतें. हें ज्ञान ज्या चक्रापासून होतें, त्यास जन्मलग्नकुंडली असें म्हणतात. कालपुरुष हा त्रिगुणात्मक आहे त्यावरून सत्त्व, रज, तम, भूत, भविष्य आणि वर्तमान यांचा बोध होतो, त्याचप्रमाणें द्रेष्काणाचा-

हि चांगला बोध होतो. द्रेष्काणाचीं फलें किती आवश्यक आहेत, हें ज्योतिषास विसरून चालणार नाहीं. त्याचप्रमाणें शिर, मूर्ति, तनु, अशाहि समर्पक संज्ञा ह्या शास्त्रांत असल्यामुळें लग्नकुंडली किती बरोबर असावी लागते, याची कल्पना करावी. कुंडलींत नवांश कुंडलीचें महत्त्व जास्त आहे. त्याचें कारण एका राशींत नक्षत्राचे ९ नऊ चरण होतात, व प्रत्येक चरणभाग शरीरावयवाचा द्योतक आहे. प्रत्येक चरणाचीं फलें सूक्ष्मपणानें समजण्यासाठीं, नवांश कुंडलीचें महत्त्व विशेष आहे. एका राशीचे ३० अंश होतात. त्या मानानें प्रत्येक चरणाचे ३ अंश २० कला, दोन चरणांचे ६ अंश ४० कला, तीन चरणांचे १० अंश व चार चरणांचे १३ अंश २० कला, पूर्ण होतात.

नक्षत्र-भावचालित कुंडलींत आकाश-गोलार्धांत, सहा राशी येतात, त्यांचे १८° अंश होतात व पाताल-गोलार्धांत सहा राशी येतात, त्यांचे अंशहि १८° च होतात. एकूण ३६° अंशांचें बारा राशींचें चक्र पूर्ण होतें. उदित गोलार्धावरील नक्षत्रें व ग्रह यांचे परिणाम चांगले अनुभवास येतात. तेच फलें देण्यास समर्थ असतात. त्या मानानें भूगोलार्धांतील नक्षत्रें व ग्रह यांचीं फलें फारच थोडीं अनुभवास येतात.

ग्रहांचीं फलें पाहण्याची निरनिराळी पद्धत आहे. त्यांत ग्रह ज्या राशींत असेल, त्या राशीच्या गुणधर्माप्रमाणें ग्रहाचें बलाबल कमी किंवा अधिक होतें. राशींची मांडणी नक्षत्रांवरून झाली आहे. २७ नक्षत्रांचे बारा भाग केले असून प्रत्येक राशीचा भाग २। सव्वा-दोन नक्षत्रांचा ( प्रत्येक नक्षत्राचे ४ चरण धरून ) आहे. त्याचप्रमाणें २७ नक्षत्रांचा आकाशांतील व्यास ३६०° अंशांचा पूर्ण आहे. त्या मानानें एका राशीस ३०° अंश येतात; व एका नक्ष-

त्रास १३ अंश २० कला पडतात. तसेंच प्रत्येक नक्षत्राचे चरणास ३ अंश २० कला येतात. नुसत्या राशीच्या गुणधर्मांनीं फलें सांगतां येणें कठीण आहे. त्यास प्रत्येक नक्षत्राचे गुणधर्म, त्यांचीं तत्त्वें व त्यांचा स्वभाव वगैरे लक्षांत घेणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक नक्षत्र आकाशांत पाहून ओळखतां येणें; त्यांचा तारकापुंज पाहून अमुक चांदणी अमुक नक्षत्राची आहे व तिचे गुणधर्म अमुक अमुक आहेत, हें तावडतोब लक्ष्यांत येणेंहि आवश्यक आहे. त्याची माहिती साधारणपणें लक्ष्यांत येण्यासाठीं खालीं देतों.

## २७ नक्षत्रांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| १ अश्विनी | १० मघा | १९ मूळ |
| २ भरणी | ११ पूर्वा फा. | २० पूर्वाषाढा |
| ३ कृत्तिका | १२ उत्तरा फा. | २१ उत्तराषाढा |
| ४ रोहिणी | १३ हस्त | २२ श्रवण |
| ५ मृगशीर्ष | १४ चित्रा | २३ धनिष्ठा |
| ६ आर्द्रा | १५ स्वाती | २४ शततारका |
| ७ पुनर्वसु | १६ विशाखा | २५ पूर्वा भाद्रपदा |
| ८ पुष्य | १७ अनुराधा | २६ उत्तरा भा. |
| ९ आश्लेषा | १८ ज्येष्ठा | २७ रेवती |

अभिजित् म्हणून आणखी एक नक्षत्र आहे. हें नक्षत्र उत्तराषाढा व श्रवण ह्या दोन नक्षत्रांच्या मध्यभागीं आहे. म्हणून वरील २७ नक्षत्रांमध्यें याचा समावेश करीत नाहींत. तें उत्तराषाढाचें शेवटचें चरण व श्रवणाचें प्रथम चरण, मिळून एक नक्षत्र आहे. त्यास कोणी अठ्ठाविसावें नक्षत्र गणतात. हें चंद्राच्या कक्षेच्या बाहेर आहे. म्हणून त्याची गणना निराळी करतात. बाकी वरील नक्षत्रांत तें आहेच. सृष्टीचा जनक जो 'ब्रह्मा,' ती याची देवता होय.

## २७ योगांचीं नांवें.

| | | |
|---|---|---|
| १ विष्कंभ. | १० गंड | १९ परिघ |
| २ प्रीति: | ११ वृद्धि | २० शिव |
| ३ आयुष्मान्. | १२ ध्रुव | २१ सिद्धि |
| ४ सौभाग्य. | १३ व्याघात | २२ साध्य |
| ५ शोभन. | १४ हर्षण | २३ शुभ |
| ६ अतिगंड | १५ वज्र | २४ शुक्ल |
| ७ सुकर्मा | १६ सिद्धि | २५ ब्रह्मा |
| ८ धृति | १७ व्यतीपात | २६ ऐंद्र |
| ९ शूल | १८ वरीयान् | २७ वैधृति |

वरील २७ योगांचीं त्यांच्या नांवांप्रमाणें फलें आहेत. त्यांत व्यतीपात व वैधृति हे अगदींच अशुभ मानितात. शुभकार्य या योगावर करीत नाहींत. आणखी कांहीं अशुभ योग आहेत, त्यांच्या आरंभापासूनच्या कांहीं ठरीव घटिका अशुभ मानून त्या वर्ज्य करितात. विष्कंभ आणि वज्र यांच्या प्रथमच्या ३ घटिका अशुभ, परिघाच्या ३० घटिका, शूलयोगाच्या ५ घटिका, व्याघाताच्या ९ घटिका, गंड व अतिगंड यांच्या पहिल्या ६ घटिका, वर्ज्य कराव्या. व्यतीपात व वैधृति हे योग सर्व कार्यास वर्ज्य आहेत. परिघ पूर्वार्ध सोडावें, आणि विष्कंभ घटि ३, वज्र घ. ९, व्याघात घ. ५, गंड घ. ६, अतिगंड घ. ६ व शूल घ. १५ हे देखील कांहीं मतें शुभ कार्यास वर्ज्य सांगितले आहेत.

## ११ करणांचीं नांवें.

करण अकरा आहेत. करण म्हणजे तिथीचा अर्धा भाग. एका तिथीस दोन करणें पूर्ण होतात. त्यांचीं नांवें:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ बव | ४ तैतिल | ७ विष्टि | १० नाग |
| २ बालव | ५ गर | ८ शकुनी | ११ किंस्तुघ्न |
| ३ कौलव | ६ वणिज् | ९ चतुष्पाद् | |

शुक्ल प्रतिपदेच्या उत्तरभागांत बव करण येतें, द्वितीयेस बालव आणि कौलव तृतीयेस. तैतिल व शकुनी हीं कृष्ण १४ च्या उत्तर भागांत येतात. चतुष्पाद आणि नाग हीं अमावास्येस असतात. किंस्तुघ्न हें शुक्ल प्रतिपदेच्या पूर्व भागांत येतें. साधारण मानानें याप्रमाणें यांची मांडणी आहे.

## नक्षत्रांच्या संज्ञा.

१ स्थिर अथवा ध्रुव, २ चर-चल, ३ मृदु-मैत्र, ४ लघु-क्षिप्र, ५ क्रूर-उग्र ६ दारुण-तीक्ष्ण व ७ मिश्र, ह्याप्रमाणें यांच्या संज्ञा असून अंध, मंद, मध्यम व सुलोचन, अशा लोचनसंज्ञा आहेत.

१ स्थिर ( ध्रुव ) नक्षत्रें:—रोहिणी, उत्तरा, उत्तराषा., उत्तराभा. या नक्षत्रांवर घर बांधणें वगैरे स्थिरकृत्यें.

२ चर (चल) नक्षत्रें:—श्रवण, धनिष्ठा, शततारका, स्वाती, पुनर्वसु ह्या नक्षत्रांवर गमन करणें वगैरे चरकृत्यें.

३ मृदु (मैत्र) नक्षत्रें:—मृग, चित्रा, अनुराधा, रेवती ह्या नक्षत्रांवर नाच, गाणें, तमाशे, नाटक व करमणुकीचे खेळ वगैरे.

४ लघु ( क्षिप्र ) नक्षत्रें:—पुष्य, अश्विनी, अभिजित्, हस्त यांवर औषधी, कला, भूतपिशाच्च, तोडगे, मंत्रतंत्र, वादविवाद, देवघेव वगैरे.

५ क्रूर ( उग्र ) नक्षत्रें:—पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभा०, भरणी, मघा या नक्षत्रांवर विषप्रयोग, घातपात, अग्नि लावणें वगैरे क्रूरकर्मे.

६ दारुण ( तीक्ष्ण ) नक्षत्रें:—ज्येष्ठा, आर्द्रा, मूळ, आश्लेषा या नक्षत्रांवर मंत्रतंत्रादि अनेक साधनें, फूट पाडणें ( दुही ), जारणमारणादि क्रिया, शस्त्राघात वगैरे.

७ मिश्र नक्षत्रें:—विशाखा, कृत्तिका.

## लोचन-संज्ञा.

| १ अंध. | २ मंद. | ३ मध्य. | ४ सुलोचन. |
|---|---|---|---|
| ४ रोहिणी. | ५ मृग. | ६ आर्द्रा. | ७ पुनर्वसु. |
| ८ पुष्य. | ९ आश्लेषा. | १० मघा. | ११ पूर्वा. |
| १२ उत्तरा. | १३ हस्त. | १४ चित्रा. | १५ स्वाती. |
| १६ विशाखा. | १७ अनुराधा. | १८ ज्येष्ठा. | १९ मूळ. |
| २० पूर्वा षा. | २१ उत्तरा षा. | २२ अभिजित्. | २३ श्रवण. |
| २४ धनिष्ठा. | २५ शततारका | २६ पूर्वा भा. | २७ उत्तरा.भा |
| २८ रेवती. | १ अश्विनी. | २ भरणी. | ३ कृत्तिका. |

याचा क्रम रोहिणीपासून मोजण्याचा आहे.

## नक्षत्रांच्या मुखसंज्ञा.

| ऊर्ध्वमुख | अधोमुख | तिर्यङ्मुख |
|---|---|---|
| १२ उत्तरा. | १९ मूळ | ७ पुनर्वसु |
| २१ उत्तराषाढा | ९ आश्लेषा. | १७ अनुराधा |
| (२२ अभिजित्) | १० मघा. | १८ ज्येष्ठा |
| २७ उत्तरा भा. | ११ पूर्वा | १३ हस्त |
| ४ रोहिणी. | २० पूर्वाषाढा. | १४ चित्रा |
| ८ पुष्य. | २६ पूर्वा भा. | १५ स्वाती |
| ६ आर्द्रा | १६ विशाखा | ५ मृग |
| २३ श्रवण | २ भरणी | २८ रेवती |
| २४ धनिष्ठा | ३ कृत्तिका | १ अश्विनी |
| २५ शततारका | | |

१ ऊर्ध्वमुख नक्षत्रावर देवालय, घर, स्तंभ रोवणें, पाया घालणें, कोणशिला बसविणें, वगैरे वगैरे कृत्यें होतात.

२ अधोमुख नक्षत्रावर विहिरी खणणें, पाणी पाडणें, नाला किंवा ओढा काढणें वगैरे, खणण्याचीं कामें.

३ तिर्यङ्मुख नक्षत्रावर वाहनें व वाहनांसंबंधींची सामुग्री जमा करणें, वगैरे.

## नक्षत्रांचा व पौर्णिमेचा संबंध.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चैत्र महिन्यांत | पौर्णिमेस | | चित्रा नक्षत्र असतें. | | |
| २ | वैशाख " | " | " | विशाखा | नक्षत्र | असतें. |
| ३ | ज्येष्ठ " | " | " | ज्येष्ठा | नक्षत्र | असतें. |
| ४ | आषाढ " | " | " | पूर्वाषाढा | " | " |
| ५ | श्रावण " | " | " | श्रावण | " | " |
| ६ | भाद्रपद " | " | " | पूर्वा भा. | " | " |
| ७ | आश्विन " | " | " | अश्विनी | " | " |
| ८ | कार्तिक " | " | " | कृत्तिका | " | " |
| ९ | मार्गशीर्ष " | " | " | मृगशीर्ष | " | " |
| १० | पौष " | " | " | पुष्य | " | " |
| ११ | माघ " | " | " | मघा | " | " |
| १२ | फाल्गुन " | | | पूर्वा फा. किंवा उ. फा. असतें. | | |

पौर्णिमेस सूर्य व चंद्र यांत प्रतियोग होतो. म्हणजे ह्यावेळीं ह्या दोन्ही ग्रहांत १८०° अंशांचें अंतर असतें, हा ठोकताळा ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे.

## नक्षत्र-पाद.

सुवर्ण-पाद ( सोन्याचे पाय )—रेवती, अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी, मृग हीं ६ नक्षत्रें सोन्याच्या वर्णाचीं होत.

**रौप्य-पाद** ( चांदीचे पायाचे )—आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती हीं १० नक्षत्रें चांदीच्या वर्णाचीं होत.

**ताम्र-पाद** ( तांब्याचे पाय )—विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषा, उत्तराषा, श्रवण, धनिष्ठा, शततारका हीं ९ नक्षत्रें तांब्याच्या वर्णाचीं होत.

**लोह-पाद** ( लोखंडाचे पाय )—पूर्वाभा. व उत्तराभा. हीं दोन नक्षत्रें लोखंडाच्या गुणाचीं होत. सुवर्ण, रौप्य, ताम्र हे आपसांत मैत्र भावाचे आहेत. लोह-पाद नक्षत्राचें कोणाशीं जमत नाहीं, असा समज तैलंगण व दक्षिण कर्नाटक प्रांतांत आहे. लग्नसमयीं लोहपादावर बराच कटाक्ष असतो. जो मनुष्य ज्या नक्षत्रावर जन्मला त्या नक्षत्राची जी धातु असेल, तो त्याचा पाद होय, असें समजण्याचा प्रघात आहे.

## नक्षत्रांचे वेध.


ज्या नक्षत्रांत ग्रह आहे त्या नक्षत्रापासून दुसऱ्या नक्षत्रावर नक्षत्रें व ग्रह वेध करितात. ते खालीं लिहिल्याप्रमाणें ( हा वेध सप्तशलाकांप्रमाणें असतो. समजुतीकरितां हें चक्र पुढें दिलें आहे. )

| | | | |
|---|---|---|---|
| मघा | — भरणी. | कृत्तिका | — श्रवण. |
| पूर्वा | — अश्विनी. | रोहिणी | — अभिजित्. |
| उत्तरा | — रेवती. | मृग | — उत्तरा षा. |
| हस्त | — उत्तरा भा. | आर्द्रा | — पूर्वा षा. |
| चित्रा | — पूर्वा भा. | पुनर्वसु | — मूळ. |
| स्वाती | — शततारका. | पुष्य | — ज्येष्ठा. |
| विशाखा | — धनिष्ठा. | आश्लेषा | — अनुराधा. |

वर दिलेलीं नक्षत्रें परस्परांशीं वेध करितात.

(वरीलप्रमाणें पाहण्याचा विशेष प्रघात नाहीं.)

## सप्तशलाका चक्र.





## पंचशलाकाप्रमाणें वेध पाहण्याचें कोष्टक.

| | | | |
|---|---|---|---|
| भरणी | — अनुराधा | आश्लेषा | — धनिष्ठा |
| कृत्तिका | — विशाखा | मघा | — श्रवण |
| रोहिणी | — अभिजित् | पूर्वा | — अश्विनी |
| मृग | — उत्तरा षा. | उत्तरा | — रेवती |
| आर्द्रा | — पूर्वा षा. | हस्त | — उत्तरा भा. |
| पुनर्वसु | — मूळ | चित्रा | — पूर्वा भा. |
| पुष्य | — ज्येष्ठा | स्वाती | — शततारका |

वरील वेध संकटसमयीं व विवाहसमयीं पाहण्याचा प्रघात आहे. लग्नाधिपति, चंद्र, गुरु व शुक्र इ. शुभ ग्रहांची दृष्टि व शुभयोग असतां वरील वेधाचा दोष मानीत नाहींत.

**पंचशलाका चक्र**




ज्या नक्षत्रावर जन्म होतो, तें जन्मनक्षत्र होय. त्या नक्षत्रापासून दहावें नक्षत्र तें कर्मनक्षत्र, सोळावें संघातनक्षत्र, अठरावें समुदायनक्षत्र, तेविसावें विनाशनक्षत्र व पंचविसावें मानसनक्षत्र.

याशिवाय देशनक्षत्र, जातिनक्षत्र, राज्यारोहण—अभिषेकनक्षत्र अशीं तीन अधिक मिळून एकूण नऊ नक्षत्रें पाहतात. ह्या नक्षत्रांवर पापग्रह व ग्रहणयोग वगैरे वाईट योग झाले असल्यास त्याचें फल वाईट मिळतें. शुभ ग्रह असल्यास त्याचा योग व कार्य उत्तम व यशदायक होतें.

## वर्ण ( जाति ) नक्षत्रें.

**ब्राह्मण**—पूर्वा फा., पूर्वा षा., पूर्वा भा., व कृत्तिका ह्या चार नक्षत्रांवर विप्राचें स्वामित्व असतें.

**क्षात्रिय**—उत्तरा फा., उत्तरा षा., उत्तरा भा., पुष्य या चार नक्षत्रांवर क्षात्रियांचें स्वामित्व असतें.

**शेतकरीवर्ग**—रेवती, मघा, अनुराधा, रोहिणी यांवर शेतकरी-वर्गाचें स्वामित्व असतें.

**वाणी**—पुनर्वसु, हस्त, अभिजित्, अश्विनी यांवर वाणी, कोमटी, मारवाडी, वगैरेंचें स्वामित्व असतें.

**यवनादिक**—मूळ, आर्द्रा, स्वाती, शततारका या नक्षत्रांवर मुसल-मानादिकांचें स्वामित्व असतें.

**नौकरचाकर वर्ग**—मृगशीर्ष, ज्येष्ठा, चित्रा, धनिष्ठा, यांवर या वर्गाच्या लोकांचें स्वामित्व असतें.

**क्रूर व चांडाल**—आश्लेषा, विशाखा, श्रवण, भरणी यांवर चांडाल व क्रूर कर्में करणारे यांचें स्वामित्व असतें. ज्या नक्षत्रावर शुभ व पापग्रह गोचरीनें येतील त्या त्या वेळेस चांगलेवाईट गुण व भावना उत्पन्न होतात आणि त्या वर्णास चांगलेंवाईट फल मिळतें.

## नक्षत्रांच्या विष-घटी.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अश्वि. ५० | मृग १४ | आश्ले. ३२ | हस्त २१ | अनुरा. १० | उ.षा. २० | पू. भा. १६ |
| भरणी २४ | आर्द्रा २१ | मघा ३० | चित्रा २० | ज्येष्ठा १४ | श्रवण १० | उ. भा. २४ |
| कृत्ति. ३० | पुन. ३० | पूर्वा २० | स्वाती १४ | मूळ ५६ | धनिष्ठा १० | रेवती ३० |
| रोहि. ४० | पुष्य २० | उत्तरा १८ | विशा. १४ | पू.षा. २४ | शतता. १८ | अभि. ० |

२७ नक्षत्रांच्या अनुक्रमानें घटिकात्मक ध्रुवांक दाखविले आहेत. त्याचा अर्थ असा कीं, त्या त्या नक्षत्राच्या तितक्या घटिका गेल्या-नंतर त्यापुढील चार घटिका विषघटी असतात. त्या सर्व शुभ-कर्मास वर्ज्य सांगितल्या आहेत, हें वरील कोष्टकावरून सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे

## गंडांततारा-संज्ञक

अश्विनी व रेवती, ज्येष्ठा व मूळ, आश्लेषा व मघा या नक्षत्रांचा संधिकाल त्यास गंडकाल म्हणतात. हा मनुष्यास हानिकारक आहे. ज्येष्ठा व मूळ यांमधील जो संधिकाल त्यास अभुक्त अशी संज्ञा आहे. ज्येष्ठाची शेवटची एक घटी व मुळाची प्रथमची एक घटी ही फारच अनिष्ट आहे. ह्यावर मनुष्य, पशु किंवा जनावर व नौकरचाकर जन्मल्यास कुळाचा नाश करितात. त्याचप्रमाणें वरील सहा नक्षत्रांचे तीन संधिकाल वाईट आहेत. कित्येकांच्या मतें संधीच्या घटिकेंत थोडासा मतभेद आहे. तरी साधारणत: एक ते दीड घटी संधिकाल मानिला आहे. ज्येष्ठा व मूळ यांच्या दोन दोन घटिका एकूण ४ चार घटिका गंडांतकाल मानितात व त्यावर शांति वगैरे करण्याचा प्रघात आहे. अभुक्त मुळावर जन्मलेलें बालक वडिलांना घातक असून ३ वर्षे त्याज्य आहे, म्हणजे तीन वर्षेपर्यंत त्याचें मुख पाहूं नये, असें म्हणतात. कित्येकांच्या मतें तर हा काल ५ व ८ वर्षे धरावा. परंतु त्यास सबळ आधार नाहीं.

## ज्येष्ठा नक्षत्राचें फल.

ज्येष्ठा नक्षत्राचे दहा समान भाग करून खालीलप्रमाणें फल वर्तवितात:—

१ ले भागांत जन्म झाल्यास आईची आई मरण पावते.
२ रे ,, ,, ,, आईचा बाप मरण पावतो.
३ रे ,, ,, ,, आईचा भाऊ (मामा) मरण पावतो.
४ थे ,, ,, ,, आई मरण पावते.
५ वे ,, ,, ,, जन्मलेलें बालक स्वत:च मरण पावतें.
६ ,, ,, ,, ,, जन्म झाल्यास गोत्रज मरतात.
७ ,, ,, ,, ,, ,, उभय कुळांचा नाश होतो.

८ वे भागांत जन्म झाल्यास वंशनाश होतो.
९ ,, ,, ,, ,, सासऱ्याचा मृत्यु होतो.
१० ,, ,, ,, ,, सर्वांस भयकारक व नाशक.

ज्येष्ठा नक्षत्र मंगळवारीं असतां जन्म झाल्यास ज्येष्ठ बंधूचा नाश करितो. ज्येष्ठा नक्षत्राच्या प्रथम चरणीं जन्म झाल्यास थोरल्या भावास मृत्युप्रद, द्वितीय चरणीं जन्म झाल्यास पाठीवरच्या भावंडास मृत्युदायक, तृतीय चरणीं जन्म झाल्यास बापास वाईट, व चतुर्थ चरणीं जन्म झाल्यास स्वतः बालकास मृत्युप्रद. ज्येष्ठा नक्षत्रावर पुत्रजन्म झाल्यास वडील भावाचा व कन्या असल्यास वडील दिराचा नाश होतो.

## मूळ नक्षत्राचें फळ.

मूळ नक्षत्राचे १९ समान विभाग करून त्यांचें फल वर्तवितात. तें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ ले भागांत जन्म असतां बापाचा मृत्यु किंवा नाशक.
२ रे ,, ,, ,, चुलत्याला नाशक.
३ रे ,, ,, ,, बहिणीच्या नवऱ्याचें मरण.
४ थे ,, ,, ,, बापाचा बाप म्हणजे आज्यास मृत्यु.
५ वे ,, ,, ,, मातेस मृत्युप्रद.
६ ,, ,, ,, ,, मावशीस मृत्युप्रद.
७ ,, ,, ,, ,, मामास मृत्युप्रद.
८ ,, ,, ,, ,, चुलत्याची स्त्री मरण पावते.
९ ,, ,, ,, ,, सर्वांस नाशकारक.
१० ,, ,, ,, ,, घरांतील जनावर, पशु इ०स नाशक.
११ ,, ,, ,, ,, चाकरमाणसांस वाईट.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ वे भागांत | जन्म | असतां | जन्मलेलें बालक स्वतःच मरण पावतें. | | |
| १३ ,, | ,, | ,, | ,, | ज्येष्ठ भावंडास मरण. | |
| १४ ,, | ,, | ,, | ,, | बहिणीचा मृत्यु. | |
| १५ ,, | ,, | ,, | ,, | आईच्या बापास मृत्युदायक. | |

रविवारीं मूळ नक्षत्र असतां कन्याजन्म झाल्यास सासऱ्याचा नाश करिते.

२. कित्येकांच्या मतें मूळ वृक्षाचे आठ भाग धरावे. त्यांचीं फलें ग्रंथांत सांगितलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | भाग— | ४ | घटिका. | वृक्षाचें मूळ | त्याचें फल—नाशकारक. |
| २ | ,, | ७ | ,, | वृक्षाचा स्तंभ | ,, धननाशकारक. |
| ३ | ,, | १० | ,, | वृक्षाची त्वचा | ,, भावास वाईट. |
| ४ | ,, | ८ | ,, | वृक्षाच्या फांद्या | ,, मातेस वाईट. |
| ५ | ,, | ९ | ,, | वृक्षपत्रें | ,, परिवारास वाईट. |
| ६ | ,, | ५ | ,, | वृक्षपुष्पें | ,, राज्यमंत्री, सौख्यकारक. |
| ७ | ,, | ६ | ,, | वृक्षफल | ,, राज्यप्राप्ति-सौख्य. |
| ८ | ,, | ११ | ,, | वृक्षाचा शेंडा | ,, अल्पायुषी. |
| | | ६० | | | |

मूळ नक्षत्रीं जन्मलेली कन्या सासऱ्यास वाईट असते.

## जन्मकाळीं मूळ नक्षत्र कोणत्या लोकीं आहे तें पाहणें.

वृषभ, वृश्चिक, सिंह, कुंभ या लग्नीं जन्म झाल्यास त्यावेळेस मूळ नक्षत्र स्वर्गीं आहे. त्याचें फल-राज्य-प्राप्ति. मिथुन, तूळ, कन्या, मीन या लग्नीं जन्म झाला असतां त्यावेळेस मूळ नक्षत्र पाताळीं असतें. त्याचें फल—धनप्राप्ति. मेष, धन, कर्क, मकर या लग्नीं जन्म

असतां त्यावेळेस मूळ नक्षत्र मृत्युलोकीं असतें. त्याचें फल—सर्व कुटुंबास वाईट. याप्रमाणें १२ लग्नांचीं मूळ नक्षत्राचीं स्थानें सांगितलीं आहेत

## आश्लेषा नक्षत्राचें फळ.

आश्लेषा नक्षत्राचे १० भाग करून त्या नक्षत्रीं जन्म झाल्यास त्याचें बरेंवाईट फल येणेंप्रमाणें वर्तवितातः—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | भाग प्रथम | ५ | घटिकेंत जन्म असतां | राज्यप्राप्ति. |
| २ | ,, | ७ | ,, | वडिलांस नाशकारक. |
| ३ | ,, | २ | ,, | मातेस नाशकारक. |
| ४ | ,, | ३ | ,, | पितृभक्ति करणारा. |
| ५ | ,, | ४ | ,, | कामभोगेच्छा करणारा. |
| ६ | ,, | ८ | ,, | स्वतःच्या बलावर काम करणारा. |
| ७ | ,, | ११ | ,, | हिंसक. |
| ८ | ,, | ६ | ,, | त्याग करणारा. |
| ९ | ,, | ९ | ,, | सुखभोगी. |
| १० | ,, | ५ | ,, | धनप्राप्तिकारक. |
| | | ६० | घटिका. | |

आश्लेषा नक्षत्राच्या प्रथमचरणीं जन्म असल्यास सुख; द्वितीयचरणीं धननाश; तृतीयचरणीं मातेस वाईट व चतुर्थचरणीं पित्यास वाईट. कित्येकांच्या मतें द्वितीयचरणीं सासूचा व चतुर्थचरणीं ज्येष्ठ दिराचा नाश होतो.

## मृत्युप्रद नक्षत्रें.

मघा, मूळ, अश्विनी या नक्षत्रांच्या प्रथमचरणीं जन्म असतां वडिलांचा नाश होतो.

रेवती, ज्येष्ठा, आश्लेषा या नक्षत्रांच्या चतुर्थचरणीं जन्म असतां—रात्रीं, दिवसा व संधिकाळीं जन्म झाल्यास—अनुक्रमें माता, पिता व जन्मलेलें बालक यांचा नाश होतो.

## नक्षत्रांचा गंडकाल.

| | | | |
|---|---|---|---|
| अश्विनी | प्रथमचरणीं | १६ | वर्षें. |
| मघा | प्रथमचरणीं | ८ | ,, |
| ज्येष्ठा | ,, | १ | वर्ष |
| चित्रा | ,, | ४ | वर्षें |
| मूळ | ,, | ४ | ,, |
| आश्लेषा | ,, | २ | ,, |
| रेवती | ,, | १ | वर्ष |
| उत्तरा | ,, | २ | महिने. |
| पुष्य | ,, | ३ | ,, |
| पूर्वाषाढा | ,, | ९ | महिने; |

व हस्त नक्षत्र मुलाच्या १२ वर्षांच्या वयाच्या आंत, वडिलांस मृत्युदायक.

वडिलांस मृत्युप्रद वर्षें दर्शविणारीं नक्षत्रेंहि ग्रंथकारांनीं सांगितलीं आहेत.

## जातकपारिजातकारांचें नक्षत्रासंबंधीं मत.

ज्या नक्षत्रीं जन्म होतो तें जन्मनक्षत्र होय. त्या नक्षत्रापासून

१० वें नक्षत्र कर्मसंज्ञक, १६ वें संघातिक, १८ वें समुदाय, १९ वें आधान, २३ वें वैनाशिक, २५ वें जाति, २६ वें देश, २७ वें अभिषेकसंज्ञक, याप्रमाणें तें तें नक्षत्र त्या त्या कर्माचें द्योतक समजावें.

## अथर्वज्योतिषांत खालीलप्रमाणें संज्ञा आहेत

१ लें जन्म १० वें कर्म १९ वें आधान.

२ रें जन्म ११ वें कर्म २० वें संधत्कर.

३ रें ,, १२ वें ,, २१ वें विपत्कर.

४ थें ,, १३ वें ,, २२ वें क्षेमकर.

५ वें ,, १४ वें ,, २३ वें प्रत्यर

६ वें ,, १५ वें ,, २४ वें साध्य.

७ वें ,, १६ वें ,, २४ वें नैधन.

८ वें ,, १७ वें ,, २६ वें मैत्र.

९ वें ,, १८ वें ,, २७ वें परम मैत्र.

नक्षत्रीं शुभग्रह असतां शुभफल प्राप्त होतें. हानिकारक नक्षत्रांत पापग्रह असतां त्याचे कारकत्वाप्रमाणें वाईट फलें प्राप्त होतात.

नक्षत्राचा साधारण फलादेश पुढीलप्रमाणें आहे. **जातकशिरोमणि खंड १ ला** ( कै. श्री. गणकभास्कर **नवाथे** यांच्या ) ग्रंथांत खालीं लिहिल्याप्रमाणें फलें आहेत:—

१ अश्विनी—अति बुद्धिमान्, धनवान्, नम्र, प्रज्ञावान्, यशस्वी, सुखी.

२ भरणी—व्यंग, व्यभिचारी, दुष्ट, कृतघ्न, धनवान्.

३ कृत्तिका—तेजस्वी, राजासारखा, शहाणा व विद्वान्.

४ रोहिणी—दुसऱ्यांचीं व्यंगें जाणणारा, सडपातळ, ज्ञानी, परस्त्रीरत.

५ मृग—हलक्या मनाचा, प्रवासी, कुटिलदृष्टि, विषयी व रोगी.
६ आर्द्रा—दरिद्री, चंचल, बलवान् व हलकीं कामें करणारा.
७ पुनर्वसु—खोल मनाचा, धनवान्, प्रख्यात कवि व विषयी.
८ पुष्य—देवब्राह्मण-प्रिय, धनवान्, ज्ञानी, राजप्रिय व बांधवयुक्त.
९ आश्लेषा—मूढ, कृतघ्न, रागीट व दुराचारी.
१० मघा—गर्विष्ठ, पुण्यकर्मे करणारा, स्त्रीलंपट, मानी, धनवान्.
११ पूर्वा—चपल, वाईट कामें करणारा, उदार, बलवान् व विषयी.
१२ उत्तर—भोगी, मानी, कृतघ्न व उत्तम बुद्धीचा.
१३ हस्त—कामी, गुणवान्, शाहणा, गुणवान्, उपकार करणारा, धनवान्.
१४ चित्रा—खोल मनाचा, मानी व स्त्रीरत.
१५ स्वाती—देवी-देवब्राह्मणप्रिय, भोगी, धनवान् व मंदबुद्धीचा.
१६ विशाखा—गर्विष्ठ, स्त्रीजित, शत्रूंना जिंकणारा व रागीट.
१७ अनुराधा—गोड बोलणारा, धनवान्, सुखासक्त, पूज्य, यशस्वी व सामर्थ्यवान्.
१८ ज्येष्ठा—अतिशय रागीट, परस्त्रीरत, सामर्थ्यवान् व धार्मिक.
१९ मूळ—वक्ता, अप्रमाणिक, धूर्त, उपकार न जाणणारा व धनवान्.
२० पूर्वा षा०—सच्चारित्राचा, मानी, सुखी व शांतबुद्धीचा.
२१ उत्तरा षा०—मान्य, सत्त्वगुणी, धनवान् व पंडित.
२२ श्रवण—ब्राह्मण व देव यांचा उपासक, राजा, धनी व धर्मवान्.
२३ धनिष्ठा—आशाळू, संपत्तिमान्, मांड्या व कंठ हे अवयव भरदार व सुखी असा होतो.
२४ शततारका—ज्योतिषी, शांत, थोडकें खाणारा व साहसी.

२५ पूर्वा भा०—खोल बोलणारा, धूर्त, मित्रा व अशक्त.
२६ उत्तरा भा०—सत्त्वगुणी, दाता, धनवान् व पंडित.
२७ रेवती—ज्याच्या मांडीवर खूण आहे, विषयी, सुंदर, सल्लागार, पुत्र, स्त्री व मित्र यांनीं युक्त, स्थिर संपत्तीचा उपभोग घेणारा.

## योगफल.

योगफलांचा व तिथिनक्षत्रांचा बराच संबंध असल्यानें योगांचीं फलें खालीं दिलीं आहेत.

१ विष्कंभ—शत्रूंस जिंकणारा, धनवान् व गोधनादि असलेला.
२ प्रीति—परस्त्रीवश.
३ आयुष्मान्—दीर्घायु व निरोगी.
४ सौभाग्य—सुखी, आनंदी.
५ शोभन—भोगी.
६ अतिगंड—खुनी, खुनशीपणा करणारा.
७ सुकर्मा—धनवान्, धर्माचरण करणारा, नीतिमान्.
८ धृति—परस्त्रीचा उपभोग घेणारा व त्यांतच सुख मानणारा.
९ शूल—रागीट, भांडखोर, अभद्र बोलणारा.
१० गंड—दुराचारी.
११ वृद्धि—बोलका, बडबड्या.
१२ ध्रुव—अतिशय धनवान्.
१३ व्याघात—घातक ( घातपात करणारा ).
१४ हर्षण—ज्ञानी व कीर्तिमान्.
१५ वज्र—धनवान् व विषयी.
१६ सिद्धि—सर्वांना आश्रय देणारा व राजासारखा.
१७ व्यतीपात—कपटी (कपटानें कार्यनाश करणारा, ठकविणारा).
१८ वरीयान्—दुराचारी, दुवर्तनी.

१९ परिघ–द्वेष करणारा, धनवान्.
२० शिव–शास्त्रज्ञ, धनवान्, शांत, राजप्रिय.
२१ सिद्ध–धर्मपरायण, यज्ञ करणारा, यशाकारक.
२२ साध्य–चांगल्या आचरणाचा, पद्धतशीर वागणारा.
२३ शुभ—सुंदर शरीर, धनवान्, कामातुर व कफप्रकृतीचा.
२४ शुक्ल—धर्मरत, वक्ता, रागीट, चंचल व विद्वान्.
२५ ब्रह्मा—मानी, गुप्तधनवान्, दाता, विवेकी व नीतिमान्.
२६ ऐंद्र—सर्व लोकांवर उपकार करणारा, सर्वज्ञ, धनवान्.
२७ वैधृति—कपटी, निंदक, बलवान्, दाता, धनवान्.

## करणफल.

१ बव—पोरकट कृत्यें करणारा व प्रतापी.
२ बालव—साधा पोषाख व साधी राहणी राजपूज्य.
३ कौलव—हत्ती-घोडे बाळगणारा व चांगलीं कामें करणारा.
४ तैतिल—मृदु व योग्य बोलणारा, समयसूचक, पुण्यशील.
५ गर—शत्रुरहित व प्रतापशील, मानी.
६ वणिज्—चांगला वक्ता व जारकर्म करणारा.
७ विष्टि—सर्व लोकांच्या विरुद्ध, पापकर्मं करणारा, सेवकांना पूज्य व स्वतंत्रपणानें वागणारा.
८ शकुनी—ज्योतिषी, निरंतर सुख भोगणारा.
९ चतुष्पाद—वारंवार ज्यांच्यावर संकटें कोसळतात, सर्वज्ञ, ज्ञानी, कीर्तिमान् व धनवान्.
१० नाग—तेजस्वी, श्रीमान्, बलवान् व वाचाळ.
११ किंस्तुघ्न—दुसऱ्याच्या उपयोगीं पडणारा, चंचल बुद्धीचा, व हास्यप्रिय.

पुढें अबकहडा चक्राचें कोष्टक दिलें आहे तें वाचकांनीं पहावें.

विशेष स्पष्टीकरणासाठीं अबकहडा चक्र घातवारासह दिलें आहे. त्यायोगें जन्मनक्षत्राची व जन्मनामाचे आद्याक्षराची सहज ओळख होईल.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नक्षत्र | अश्विनी | भरणी | कृत्तिका | रोहिणी | मृग | आर्द्रा | पुनर्वसु | पुष्य | आश्लेषा |
| नाडी | आद्य ना. | मध्य | अंत्य | अंत्य | मध्य | आद्य | आद्य | मध्य | अंत्य |
| योनि | अश्व | गज | मेष | सर्प | सर्प | श्वान | मांजर | मेष | मार्जार |
| गण | देव | मनुष्य | राक्षस | मनुष्य | देव | मनुष्य | देव | देव | राक्षस |
| आराध्यवृक्ष | कुचला | आंवळी | औदुंबर | जांभळी | खैर | कृष्णागरु | वेळू | पिंपळ | नागचांफा |
| चरणांक | १ २ ३ ४ | १ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ |
| चरणाक्षरें | चू चे चो ला | ली लू ले लो | आ इ ऊ ए | ओ वा वी वू | वे वो का की | कु घ ङ छा | के को हा ही | हू हे हो डा | डी डू डे डो |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **राशी** | **मेष** | **वृषभ** | **मिथुन** | **कर्क** |
| राशिस्वामी | मंगळ | शुक्र | बुध | चंद्र |
| वर्ण | क्षत्रिय | वैश्य | शूद्र | विप्र |
| वश्य | चतुष्पाद | चतुष्पाद | मानव | जलचर |
| घातवार | रविवार | शनिवार | सोमवार | बुधवार |
| घातनक्षत्र | मघा | हस्त | स्वाती | अनुराधा |

| नक्षत्र | मघा | पूर्वा | उत्तरा | हस्त | चित्रा | स्वाती | विशाखा | अनुराधा | ज्येष्ठा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नाडी | अंत्य | मध्य | आद्य | अद्य | मध्य | अंत्य | अंत्य | मध्य | आद्य |
| योनि | उंदीर | उंदीर | गौ | महिषी | व्याघ्र | महिषी | व्याघ्र | मृग | मृग |
| गण | राक्षस | मनुष्य | मनुष्य | देव | राक्षस | देव | र क्षस | देव | राक्षस |
| आराध्यवृक्ष | वट | पळस | पायरी | जाई | बेलवृक्ष | अर्जुनवृक्ष | नागकेशर | नागकेशर | सांबर |
| चरणांक | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ \| २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ \| ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ \| | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ |
| चरणाक्षरें | मा मी मू मे | मो टा टी टू | टे \| टो पा पी | पू षा णा ठा | पे पो \| रा री | रू रे रो ता | ती तू ते \| तो | ना नी नू ने | नो या यीं यू |

| राशी | सिंह | कन्या | तूळ | वृश्चिक |
|---|---|---|---|---|
| राशिस्वामी | सूय | बुध | शुक्र | मंगळ |
| वर्ण | क्षत्रिय | वैश्य | शूद्र | विप्र |
| वश्य | वनचर | मानव | मानव | कीटक |
| घातवार | शनिवार | शनिवार | गुरुवार | शुक्रवार |
| घातनक्षत्र | मूळ | श्रवण | शततारका | रेवती |

| नक्षत्र | मूळ | पूर्वा षा. | उत्तरा षा. | श्रवण | धनिष्ठा | शततारका | पूर्वा भा. | उत्तरा भा. | रेवती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नाडी | आद्य | मध्य | अंत्य | अंत्य | मध्य | आद्य | आद्य | मध्य | अंत्य |
| योनि | श्वान | वानर | मुंगुस | वानर | सिंह | अश्व | सिंह | गौ | गज |
| गण | राक्षस | मनुष्य | मनुष्य | देव | राक्षस | राक्षस | मनुष्य | मनुष्य | देव |
| आराध्यवृक्ष | राळेचा वृ. | वेत | फणस | अर्क (रुई.) | शमी | कळंब | आम्र | कडूलिंब | मोहाचा |
| चरणांक | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ \| २ ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ \| ३ ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ \| ४ | १ २ ३ ४ | १ २ ३ ४ |
| चरणाक्षरें | ये यो भा भी | भू धा फा डा | भे \| भो जा जी | खी खू खे खो | गा गी \| गू गे | गो सा सी सु | से सो दा \| दी | दू ज्ञ झा था | दे दो चा ची |

| राशी | धन | मकर | कुंभ | मीन |
|---|---|---|---|---|
| राशिस्वामी | गुरु | शनि | शनि | गुरु |
| वर्ण | विप्र | वैश्य | शूद्र | विप्र. |
| वश्य | मानव | जलचर | मानव | जलचर |
| घातवार | शुक्रवार | मंगळवार | गुरुवार | शुक्रवार |
| घातनक्षत्र | भरणी | रोहिणी | आर्द्रा | आश्लेषा |

## बारा राशींचीं नांवें.

१ मेष. २ वृषभ. ३ मिथुन. ४ कर्क. ५ सिंह. ६ कन्या.
७ तूळ. ८ वृश्चिक. ९ धन. १० मकर. ११ कुंभ. १२ मीन.

## राशींचे स्वामी व त्यांच्या उच्च व नीच राशींचें कोष्टक.

| ग्रह | सू. | चं. | मं. | बुध | गुरु | शुक्र | शनि | रा. | के. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्वगृह | सिंह | कर्क | मेष वृश्चिक | कन्या मिथुन | धन मीन | वृषभ तूळ | मकर कुंभ | कन्या | मीन |
| उच्च | मेष | वृषभ | मकर | कन्या | कर्क | मीन | तूळ | वृषभ | वृश्चिक |
| नीच | तूळ | वृश्चिक | कर्क | मीन | मकर | कन्या | मेष | वृश्चिक | वृषभ |

हर्शल व नेपच्युन यांचीं अनुक्रमें कुंभ व मीन हीं आधुनिक मतें स्वगृहें धरलेलीं आहेत.

## राशींचीं तत्त्वें.

पृथ्वीतत्त्व—वृषभ, कन्या, मकर.
जलतत्त्व—कर्क, वृश्चिक, मीन.
अग्नितत्त्व—मेष, सिंह, धन.
वायुतत्त्व—मिथुन, तूळ, कुंभ.
चरराशी—मेष, कर्क, तूळ, मकर.
स्थिरराशी—वृषभ, सिंह, वृश्चिक, कुंभ.
द्विस्वभावराशी—मिथुन कन्या, धन, मीन.
पुरुषराशी—मेष, मिथुन, सिंह, तूळ, धन, कुंभ.

स्त्रीराशी—वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर, मीन.

सुहृदराशी—मेष, सिंह, धन, तूळ.

अशक्तराशी—कर्क, मकर, मीन, वृषभ.

मध्यमराशी—मिथुन, कुंभ, वृश्चिक, कन्या.

बहुप्रसवराशी—कर्क, वृश्चिक, मीन.

वंध्याराशी—सिंह, कुंभ, कन्या.

अल्पप्रसवराशी—कन्या, वृषभ.

जुळया राशी—मिथुन, धन, मीन.

विषुवदिन-राशी—मेष, तूळ.

अयन-राशी—कर्क, मकर.

## ग्रहांचें शत्रुमित्र—कोष्टक.

| ग्रह | मित्र | शत्रु | सम |
|---|---|---|---|
| सूर्य | चं. मं. गु. | शनि. रा. शु. के. | बुध. |
| चंद्र | र. बु. गु. | रा. के. | मं. गु. शु. श. |
| मंगळ | र. चं. गु. | बुध, श. | शु. श. |
| बुध | र. शु. | चंद्र | मं. गु. श. |
| गुरु | र. चं. मं. | बु. शुक्र. | शनि. |
| शुक्र | बु. श. | र. चं. | मं. गु. |
| शनि | शुक्र, बुध. | र. चं. मं. | गुरु. |
| रा. | .... | .... | .... |
| के. | .... | .... | .... |

## ग्रहांचे दृष्टियोग.

३० अंश एकराश्यंतर— नेहमीं शुभ.

६० अंश द्विराश्यांतर—शुभ. लाभयोग म्हणतात.
अर्ध काटकोन—अशुभ योग.

७२ अंश—मध्यम शुभ.

९० अंश—केंद्र. अशुभ.

१२० अंश—त्रिकोण. नवपंचम. शुभयोग.

१४४, १५० अंश—षडाष्टक योग. अशुभ.

१८० अंश—प्रतियोग. अमोरासमोर. कडक योग.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूर्य | आपल्यापासून | ७ व्या | स्थानावर पूर्ण | दृष्टीनें पाहतो. |
| चंद्र | ” | ७ | ” | ” |
| मंगळ | ” | ४——७——८ | | ” |
| बुध | ” | ७ | .... | ” |
| गुरु | ” | ५——७——९ | | ” |
| शुक्र | ” | ७ | .... | ” |
| शनि | ” | ३——७——१० | | ” |
| राहु | ” | ७ | .... | ” |
| केतु | ” | ७ | .... | ” |

## कुंडलींतील १२ भावांचीं कारकत्वें.

१ तनु, लग्न—शरीरवर्ण, स्वभाव, मन, आरोग्य किंवा आयुष्य आणि शारीरिक सुखदुःखें. याचा अंमल शरीरावर आहे.

२ धन हें द्वितीय स्थान—डावा नेत्र, वाणी, वडिलार्जित संपत्ति, कुटुंबसुख, यश, व्यापार, उदीम, सुवर्ण-रत्नादिकांची प्राप्ति, विद्या,

बुद्धि, नवराबायकोचें सुख वगैरे यावरून समजतें. याचा अंमल वाणी व नेत्र यांवर असतो.

३ **पराक्रम** हें तृतीय स्थान होय. बंधुभगिनी सुख, रेल्वेचे प्रवास इ. गळा, ऊर, कान यांवर याचा अंमल असतो. शेजारी व आप्तांपासून सुखदुःख, हस्ताक्षर, औषधी क्रिया, पराक्रम, धमक वगैरेंचा विचार यावरून होतो.

४ **सुख** हें चवथें स्थान होय. मातृसुख, वाहनांचें सुख, स्थावर इस्टेट, मित्र, आई, घर, शेती, उन्नति वगैरे. याचा अंमल हृदयावर असतो व हें अंतःकालची स्थिति दर्शवितें.

५ **सुत** हें कुंडलींतील पंचमस्थान होय. संतति, विद्या, ऐहिक सुख, पैशाची देवघेव, सट्टे, शर्यती, बुद्धि, मंत्रशास्त्र, गर्भ, वगैरेंचा यावरून विचार करितात. उदर व बरगड्या यांवर याचा अंमल आहे.

६ **रिपु** हें स्थान कुंडलींतील सहावें होय. शत्रु, रोग, मातुल, उपदंशविकार, व्रण, चतुष्पाद यांचा विचार या स्थानी होतो. नाभि, कटिप्रदेश यांवर याचा अंमल आहे.

७ **जाया** हें कुंडलींतील सप्तमस्थान होय. विवाह व वैवाहिक-सुख, भागीदारी, दिवाणी कामें, प्रवास, दुकानदारी, कोर्टीतील खटले, चोरीस गेलेलें द्रव्य वगैरेंचा विचार या स्थानावर होतो. बस्ती, ओटीपोट यांवर याचा अंमल आहे.

८ **मृत्यु**--हें कुंडलींतील आठवें स्थान होय. मृत्यु कोणत्या रीतीनें येईल? स्त्रीधन, मृत्युपत्रानें फायदा होणें, गुप्त द्रव्य, लॉटरींत पैसा टाकणें, विमा हुंडा, अकल्पित द्रव्य, विषारी जनावरापासून त्रास वगैरे यावरून कळतें. याचा अंमल गुह्येंद्रियावर आहे.

९ **धर्म**—हें कुंडलींतील नवमस्थान होय. यावरून धर्म व प्रवास,

जलप्रवास, भाग्योदय, उन्नतीचे मार्ग, दानधर्म, धर्मश्रद्धा, तप तीर्थयात्रा, लौकिक, वडिलांचा मृत्यु, नातवंडाचें सुख हीं समजतात. याचा अंमल मांड्यांवर आहे.

१० **कर्म**—हें कुंडलींतील दशमस्थान होय. नौकरी, उद्योगधंदा; दरबारीं मानमान्यता, पितृसुख, व्यापार, समाजांतील दर्जा, राज्य-प्राप्ति, अधिकार, वरिष्ठांची मर्जी, मुत्सद्दीपणा, अब्रू, उदरनिर्वाहाचा सर्व प्रकारचा धंदा वगैरे यावरून समजतें. याचा अंमल गुडघ्यांवर आहे.

११ **लाभ**—हें कुंडलींतील एकादशस्थान होय. मित्र, आशा, आकांक्षा, सांपत्तिक स्थितीचा विचार, लाभालाभ, मिळकतीचा बोध, हत्ती, घोडे, दासदासी, सर्व प्रकारच्या द्रव्यलाभाचा विचार, यावरून होतो. याचा अंमल पोटऱ्यांवर आहे.

१२ **व्यय**—कुंडलींतील बारावें स्थान. मोक्ष, कैद, राजकीय संकट, व्यय, सर्व प्रकारचा खर्च, कर्जबाजारीपणा, सर्व तऱ्हेनें नुकसानी, गुप्तशत्रु, अपघात वगैरे यावरून समजतें. याचा अंमल दोन्ही पायांवर आहे.

## ग्रहांचें कारकत्व साधारणतः खालीं दिल्याप्रमाणें आहे.

**सूर्याचें कारकत्व**—स्वतःचा आत्मा, बाप, तेज, आरोग्य, शक्ति, संपत्ति, इज्जत, अब्रू, आयुष्य व सत्ताधारी लोक, राजा, अधिकारीवर्ग, राजमंडळ, पुढारी वगैरे.

**चंद्राचें कारकत्व**—मन, बुद्धि, राजकृपा, आई, संपत्ति वगैरेंचा विचार चंद्रावरून करितात. याशिवाय प्रजापक्ष, जनता, सामान्य लोक, स्त्रिया, मनोवृत्ति व पुढाऱ्यांची मनःस्थिति वगैरे.

**मंगळाचें कारकत्व**—सेनापती, सामर्थ्य, क्रोध, रोग, गुण,

शूरलोक, पाठीवर होणारीं भांवडें, जमीन, शत्रु व जात; रक्त-विकार, स्वाभिमानी पुरुष, युद्ध, लढाया, अग्निप्रलय, पोलीसखातें, इ.

**बुधाचें कारकत्व**–विद्या, मातुलाप्त, विचार, मामा, मावश्या, मित्र, वाणी, विद्वत्ता, ग्रंथकार, लेखक, संपादक, वकील, बौद्धिक, सराफीचा धंदा, प्रचारक व वक्ते, वगैरे.

**गुरूचें कारकत्व**–शहाणपणा, द्रव्य, शारीरबळ, पुत्रसंतति, ज्ञान, सुशीलपणा, शांतता, श्रीमंत, व्यापारी, मोठमोठ्या पेढ्या, जाहगीरदार, दिवाण, संस्थानिक, सोन्याचे व्यापारी, वगैरे.

**शुक्राचें कारकत्व**–पत्नी, वाहनें, अलंकार, रतिसुख, ऐष-आराम, मोती, सट्टे करणारे, हिरे, माणीक, चांदी, कापूस, कला-कौशल्य जाणणारे, गायनवादन करणारे, वगैरे.

**शनीचें कारकत्व**–आयुष्य, धंदा, मृत्यूचें कारण, विपत्ति, दीर्घकालपर्यंत टिकणारे रोग, संपात्ति, मजूरवर्ग, वृद्ध माणसें, शेत-करी, खाणी, खनिजपदार्थ, हाल, कष्ट, गुप्तगोष्टी, दुष्टपणा, विश्वासघात, छापखाना व त्याचे मालक, कामगार, वगैरे.

**राहूचें कारकत्व**–बापाचा बाप, याचा विचार.

**केतूचें कारकत्व**–आईचा बाप, याचा विचार.

## ग्रहांचे धंदे.

रवि–मोठा अधिकारी, पुढारी, पुष्कळ धंदे करणारा, सत्ताधारी, वैद्य, ज्याची इज्जत व मानमान्यता चांगली आहे असा, गवताचा व्यापारी व स्वतंत्र धंदे करणारा.

चंद्र–पाण्याशीं संबंध असणारे धंदे, दुकानदार, पोस्टाचे कामगार, रेल्वे कामगार, फिरते लोक, पातळ पदार्थ व औषधी यांचे व्यापारी, चांदी, कापूस, बागाईत, फळफळावळ, वगैरे.

**मंगळ**—धातूचा व्यापारी, तांबट, सोनें, विटांचा व कौलांचा कारखाना, रासायनिक द्रव्यें तयार करणारा, पोलीस-मिलिटरीचा शिपाई, अधिकारी, कमांडर, एंजिनिअर, साहसाचें काम करणारा, डॉक्टर, कंट्राक्टर, जमीनदार, वगैरे.

**बुध**—वेदांती, वैयाकरणी, भाषाशास्त्रज्ञ, मुत्सद्दी, कारकून, जमाखर्च लिहिणारा, ऑडिटर, कायदा जाणणारा, (बोलका) वक्ता, देवघेव करणारा, दुकानदार, शिक्षक, बुकसेलर, किरकोळ धंदे करणारा, सामान्य नौकरीचे लोक.

**गुरु**—पुराणिक, भिक्षुक, वेदांती, नैय्यायिक, भाषाशास्त्रज्ञ, मुत्सद्देगिरीचीं-लोककल्याणकारक कामें करणारा, वकील, राजकारणी, प्रधान, उत्तम सल्लागार, न्यायाधीश, अंमलदार, श्रीमंत, प्रख्यात पुढारी, सराफी धंदा करणारा, खजिनदार, सर्वांच्या ठेवी ठेवून घेणारा.

**शुक्र**—नाटकी, गवई, शिल्पविद्या जाणणारा, कलाकुशल, चित्रकार, सिनेमा, वाद्य वाजविणारा, कवि, कादंबरीकार, कापडाचा व्यापारी, सुगंधी द्रव्यांचा व्यापार करणारा, खाजगी कारभारी, धनरक्षक, जवाहिऱ्या, कापूस-चांदी-नाणें वगैरे शुभ्र पदार्थांचा व्यापारी, दिखाऊ-मोहक कामें करणारा, गारोडी, मेस्मेरिझम् करणारा, फ्रेमी बसविणारा, शिंपी, छानछोकीनें राहाणारा, वगैरे वगैरे.

**शनि**—नौकर, छापखाना, शेती, कारस्थानी, गुप्तकार्यें करणारा, पोलिस-फौजदार, लोहार, कारखानदार, रॉकेल-पेट्रोल वगैरे तेलाचा व्यापारी, कोळशाच्या खाणीचा मालक किंवा गुत्तेदार, हलके धंदे करणारा, कायदेपंडित, डावपेंचानें बोलणारा, चोरी, फसवेगिरी, विश्वासघात, खोटें बोलणारा, काळा रंग, तेली वगैरे.

**राहू-केतूचे धंदे**—शनीच्या धंद्याप्रमाणें समजावे.

**हर्शल**—रेल्वे काम करणारे, ड्रायव्हर, फायरमन व कामांत घोंटाळा करणारे, ब्याटरी व इलेक्ट्रिक लाइटचा धंदा करणारे, विद्युत्शक्तीचीं कामें करणारे, विमानांचे ड्रायव्हर व त्यांचे मालक, आकस्मित कल्पना काढणारे लोक, विलक्षण बुद्धिमत्ता असणारे वगैरे. हर्शलचे गुणधर्म शनि व मंगळाप्रमाणें आहेत.

**नेपच्युन**—शांत गुणाचे, बैलगाड्यांचे मालक, बौद्धिक उन्नति करणारे व विचारीपणानें वागणारे, वगैरे. नेपच्यूनच्या धंद्यासंबंधीं अझून नक्की कांहीं ठरलेलें नाहीं.

## निरयन नक्षत्रविभागात्मक राशी.

वसंतसंपातापासून प्रत्येक भाग ३० अंशाचा धरून अशा बारा राशी पूर्ण होतात व त्यांचे पूर्णांश ३६० होतात आणि त्या प्रत्येक राशीस सव्वादोन नक्षत्रें याप्रमाणें २७नक्षत्रें पूर्ण होतात. तसेंच प्रत्येक नक्षत्राचे १३ अंश २० कला व त्याच्या प्रत्येक चरणाचे ३ अंश २० कला होतात. आकाशांतील तारकांवरून म्हणजे नक्षत्रांवरून राशींची पूर्ण ओळख होते. कोणत्याहि नक्षत्राजवळ एखादा ग्रह आला असतां अमुक नक्षत्र व अमुक राशींत तो ग्रह अमुक अमुक अंश-कलांवर आहे, असें सहज ध्यानांत येतें. म्हणजे ग्रह कोणत्या नक्षत्रांत कोणत्या चरणीं आहे हें समजण्यास अवघड जात नाहीं, व त्याप्रमाणें फलें पाहण्यास ठीक पडतें. कोणत्याहि पंचांगांत पौर्णिमा व अमावास्या या दिवसांचे इष्टस्थळाचे सूर्योदयाच्या वेळचे स्पष्टग्रह दिलेले असतात, त्यांवरून साधारण मनुष्यास समजण्यास सोपें जावें म्हणून निरयनप्रमाणें खालीं नक्षत्राचे अंश दाखविले आहेत. प्रत्येक नक्षत्राचे चार चरण व प्रत्येक चरणाचे

३ अंश २० कला व एका पूर्ण नक्षत्राचे १३ अंश २० कला होतात.

१ **अश्विनीनक्षत्र**—हें मेषराशींतील प्रथम नक्षत्र. तें १३ अंश २० कलांपर्यंत आहे.

२ **भरणीनक्षत्र**—हें मेषराशींतील दुसरें. हें १३ अंश २१ कलांपासून २६ अंश ४० कलांपर्यंत आहे.

३ **कृत्तिकानक्षत्र**—प्रथमचरण, मेषेंतील २६ अंश ४१ कलांपासून ३० अंशापर्यंत आहे, व कृत्तिकेचे तीन चरण वृषभराशींतील १० अंशांपर्यंत आहे.

४ **रोहिणीनक्षत्र**—हें वृषभराशींतील १० अंश १ कलेपासून २३ अंश २० कलेपर्यंत.

५ **मृगनक्षत्र**—हें वृषभराशींतील शेवटचे दोन चरण आहेत. ते २३ अंश २१ कलांपासून ३० अंशांपर्यंत आहेत व मृगाचे दोन चरण मिथुनराशींतील ६ अंश ४० कलांपर्यंत आहे.

६ **आर्द्रानक्षत्र**—हें मिथुनराशींतील ६ अंश ४१ कलांपासून २० अंशांपर्यंत आहे.

७ **पुनर्वसुनक्षत्र**—याचे प्रथम तीन चरण असून ते २० अंश १ कलेपासून ३० अंशांपर्यंत आहे, व पुनर्वसूचा शेवटचा चरण कर्कराशींत ३ अंश २० कलांपर्यंत आहे.

८ **पुष्यनक्षत्र**—याचे चारहि चरण कर्कराशींत आहेत, ते ३ अंश २१ कलांपासून १६ अंश ४० कलांपर्यंत आहेत.

९ **आश्लेषानक्षत्र**—याचे चारहि चरण कर्कराशींत आहेत. ते १६ अंश २१ कलांपासून ते ३० अंशांपर्यंत.

१० **मघानक्षत्र**—याचे चार चरण सिंहराशींत आहेत ते १३ अंश २० कलांपर्यंत आहेत.

११ पूर्वानक्षत्र—याचे चार चरण सिंहराशींत १३ अंश २१ कलांपासून २६ अंश ४० कलांपर्यंत.

१२ उत्तरानक्षत्र--याचा प्रथम चरण सिंहराशींत २६ अंश ४१ कलांपासून ३० अंशांपर्यंत व शेवटचे तीन चरण कन्याराशींत १०:अंशांपर्यंत.

१३ हस्तनक्षत्र—याचे चार चरण कन्याराशींत १० अंश १ कलेपासून २३ अंश २० कलांपर्यंत.

१४ चित्रानक्षत्र—याचे प्रथमचे दोन चरण कन्याराशींत २३ अंश २१ कलांपासून ३० अंशांपर्यंत व शेवटचे दोन चरण तूळराशींत ६ अंश ४० कलांपर्यंत.

१५ स्वातीनक्षत्र—हें तूळराशीच्या मध्यभागीं आहे. व तें ६ अंश ४१ कलांपासून २० अंशांपर्यंत आहे.

१६ विशाखानक्षत्र—याचे प्रथम तीन चरण तूळराशींत आहेत. ते २३ अंश २१ कलांपासून ३० अंशांपर्यंत व शेवटचा चरण वृश्चिकेंत ३ अंश २० कलांपर्यंत आहे.

१७ अनुराधानक्षत्र—याचे चारहि चरण वृश्चिकेंत असून तें ३ अंश २१ कलांपासून ते १६ अंश ४० कलांपर्यंत आहे.

१८ ज्येष्ठानक्षत्र—याचे चार चरणांवर वृश्चिकराशि पूर्ण होते. ते १६ अंश ४१ कलांपासून ३० अंशांपर्यंत पूर्ण होतात.

१९ मूळनक्षत्र—ह्याचे धनराशीच्या प्रथमांत चारहि चरण आहेत व ते १३ अंश २० कलांपर्यंत आहे.

२० पूर्वाषाढानक्षत्र—याचे चारहि चरण धनराशीच्या मध्यावर असून १३ अंश २१ कलांपासून २६ अंश ४० कलांपर्यंत आहेत.

२१ उत्तराषाढानक्षत्र—याचा प्रथम चरण धनराशींत २६

अंश ४१ कलांपासून ३० अंशांपर्यंत आहे व शेवटचे तिन्ही चरण मकरराशींत १० अंशांपर्यंत.

२२ **श्रवणनक्षत्र**—याचे चारहि चरण मकरराशींच्या मध्यभागीं आहेत. ते १० अंश १ कलेपासून २३ अंश २० कलांपर्यंत आहेत.

२३ **धनिष्ठानक्षत्र**—याचे प्रथम दोन चरण मकरराशींत २३ अंश २१ कलांपासून ३० अंशांपर्यंत व शेवटचे दोन चरण कुंभ-राशींत ६ अंश ४० कलांपर्यंत.

२४ **शततारकानक्षत्र**—याचे चारहि चरण कुंभराशींच्या मध्य-भागीं आहेत. ते ६ अंश ४१ कलांपासून २० अंशांपर्यंत.

२५ **पूर्वाभाद्रपदानक्षत्र**—याचे प्रथम तीन चरण कुंभराशीच्या शेवटीं २० अंश १ कलेपासून ३० अंशांपर्यंत व शेवटचा एक चरण मीनराशीचे प्रथम ३ अंश २० कलांपर्यंत आहे.

२६ **उत्तराभाद्रपदानक्षत्र**—याचे चारहि चरण मीनराशीचे मध्यभागीं ३ अंश २१ कलांपासून १६ अंश ४० कलांपर्यंत आहे.

२७ **रेवतीनक्षत्र**—हें मीनराशीचें शेवटचें नक्षत्र आहे तें १६ अंश ४१ कलांपासून ३० अंशांपर्यंत आहे.

वरील २७ नक्षत्रांचे प्रत्येक राशींतील प्रत्येक चरणाचे अंश दाखविले आहेत. हे ज्योतिषवर्गास माहित असणें जरूरीचें आहे. याचा उपयोग नक्षत्रकुंडली मांडणें व पाहण्याकडे विशेष आहेत.

---

# नक्षत्र-वर्णन

## नक्षत्रांचे गुणधर्म.

**आश्विनीनक्षत्र**—हें नक्षत्र मंदलोचन-संज्ञक आहे. हें तिर्यङ्-मुख असून लघुनक्षत्र आहे. याचें मुख अश्वासारखें आहे. याच

स्वामी अश्विनीदेव. हें नक्षत्र शुभ आहे. ह्या नक्षत्रावर जन्म झाल्यास प्रकृति उष्ण, प्रवासाची आवड असणारा, दूरदूरचे प्रवास करणारा व परदेशीं व्यापार चालविणारा; बुद्धिमान्, महत्त्वाकांक्षी, सात्त्विक, परोपकारी, उच्च पदवीवर चढणारा, कला-कौशल्य जाणणारा, विद्येची अभिरुचि बाळगणारा, प्रेमी, धन-धान्यांनीं युक्त; वैद्य व क्वचित् गाई, बैल इ. जनावरांचा पोषक व नामांकित, असा होतो. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष कुचला आहे. हा वृक्ष विषारी आहे. याचे गुण—तिखट, कडू, लघु, रसायनिक आहे. हा शुद्ध केल्यास प्रकृतीस आरोग्य व बलवृद्धि करणारा—आयुष्य वाढविणारा आहे.

**भरणी**—हें नक्षत्र मध्यलोचन, अधोमुख, क्रूररूप असून स्वरूप त्रिकोणाकृती आहे. याचा स्वामी यम असून हें नक्षत्र मध्यम नाशक आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास पित्तप्रकृति, बुद्धीनें सामान्य, दुसऱ्यावर अवलंबून राहून स्वतःची नुकसानी करून घेणारा, धैर्य कमी, लवकर न रागावणारा, कोप चढल्यास दुसऱ्यास आवरणें अशक्य व त्यायोगें दरारा ठेवणारा, आंतल्या गांठीचा, निष्काळजी, निरोगी, विश्वासास पात्र असा राजसगुणी, उपकार, करणारा, समयसूचकतेनें उत्तर देणारा व वेळ मारून नेणारा. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आंवळी हा आहे. त्याचे गुणधर्म बृहत्-निघंटुकारांनीं सांगितले आहेत. हा वृक्ष सर्वत्र असतो. गुणधर्म—तिखट, गोड, कडू, आंबट, तुरट, शीत, जरा व व्याधी यांचा नाश करणारा, वृष्य, सारक, हितकर, रुचिकर, रक्तपित्त-प्रमेह-ज्वर-वांति-सूज-शोष-तहान-रक्तविकार-त्रिदोष व पित्त यांचा शामक आहे. याची पूजा केल्यास बाहेरची बाधा वगैरे होत नाहीं.

**कृत्तिका**—हें सुलोचन-संज्ञक असून अधोमुख आहे. रूप साधें. वस्तऱ्याप्रमाणें आकृति. याचा स्वामी अग्नि आहे. हें द्वाड नक्षत्र असून

कार्यनाशक आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास प्रकृति उष्ण व रक्त-स्रावाची ( रक्तस्रावाचे विकार उत्पन्न होण्याची ) भीति असते. रूप उग्र, साहसकर्म करणारा, शिपाईबाण्याचा, करारी स्वभावाचा, शत्रूशींसुद्धां उदारपणानें उघड आव्हान देऊन भांडणारा, कोणत्याहि गोष्टीचा पूर्ण विचार करणारा, स्वतंत्रवृत्तीचा, अतिशय सावधपणानें वागणारा, अतिशय मानी, हट्टी, दुराग्रही, सहनशील, दंतविकारी, लॉटरी, सट्टे करणारा, शास्त्र जाणणारा. अशा लोकांच्या स्वभावांत अधाशीपणा आढळून येतो. हे उपदेशकाचा धंदा करितात. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष औदुंबर आहे. हें झाड सर्व देशांत आहे. याची भाविक लोक पूजा करितात, व यास अति पूज्य मानितात. याचे गुण—शीतल, गर्भसंधानकारक, मधुर, व्रणरोपण, रूक्ष, तुरट, गुरु, वर्णकर. याचें फल—स्तंभक, तुरट, गर्भाला हितकर, व्रणनाशक, तृषा-पित्त-रक्तविकार यांचा नाश करणारें. हें झाड फार औषधोपयोगी आहे. कृत्तिका नक्षत्राच्या मनुष्यांनीं वर्षांतून एकदां तरी उंबर खावें व एकवीस दिवस प्रातःकाळीं पूजा करून २१ प्रदक्षिणा घालाव्या म्हणजे ग्रह-पीडा निवारण होते. या नक्षत्रावर जन्मलेल्या मनुष्यांनीं सहसा हें झाड तोडूं नये किंवा तोडण्यास भाग पाडूं नये. हें नक्षत्र तमोगुणी आहे.

**रोहिणी**—हें अंधलोचन-संज्ञक आहे. हें ऊर्ध्वमुख असून स्थिर-रूप आहे. शकटाप्रमाणें स्वरूपाकृति याची देवता ब्रह्मा आहे. हें कार्यसिद्धि करणारें व सत्त्वगुणी नक्षत्र आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास प्रकृति शांत, सालस, विद्वान्, बुद्धिमत्ता चांगली, विलासी, शरीरसौंदर्य उत्तम, धर्मकृत्याकडे प्रवृत्ति जास्त असते. सत्यवचनी, श्रीमंतीस योग्य असे गुण अंगीं असणारे, अधिकारी व पशु-वाहनें बाळगणारा, निःस्वार्थी, दुसऱ्याचीं व्यंगें जाणणारा,

क्वचित् फरकीरत असा होतो. हे लोक सौम्य स्वभावाचे व विनय-शील असतात. रोहिणी नक्षत्राचा आराध्यवृक्ष जांभळीचें झाड. हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. यास जांभळीं फळें येतात. त्यास कोणी कोणी 'निलीचें बोर' असें म्हणतात. फळाचा वर्ण बाहेरून नीलवर्ण व आंतून तांबुस असतो. त्याचे गुण—तुरट, ग्राहक, मधुर, पाचक; मलस्तंभक, रूक्ष, रुचिकर, आंबट, कंठाला हितकर, पित्त-दाहनाशक, कृमि-श्वास-शोष-अतिसार-कास-रक्तदोष-कफ-व्रणनाशक व थंड आहे. हें फळ वर्षातून एकदांतरी अवश्य खावें. त्यायोगें पोटांतील कृमि व केंसाळ पदार्थांचें पचन होतें. या वृक्षाची छाया थंड असून निरोगी आहे. कृष्ण दैवत या झाडाखालीं वास्तव्य करीत असतें, अशी भावना आहे. या झाडाची पूजा कृष्ण पक्षांत लागोपाठ तीन दिवस करावी, म्हणजे दृष्टांत होऊन इच्छित कार्य होईल.

**मृग**—हें मंदलोचन-संज्ञक नक्षत्र आहे. तिर्यङ्मुख संज्ञा. मैत्र-रूप. मृगसमान रूपसंज्ञक. स्वामी चंद्र. हें नक्षत्र शुभ असून राजस-गुण व तम-मिश्रित आहे. हें नक्षत्र बुद्धिमत्तेला ठीक नाहीं. कामातुर, रोगी, कुटिल. हें बलहीन नक्षत्र आहे. साधारण गायनप्रिय, कप-ड्याची आवड, संशयवृत्तीचा व भित्रा; वाचाळ व ऐषआरामाचा शोकी. या लोकांची मनोवृत्ति बरी नसते. यांचे हातून परोपकार वगैरे होत नाहीं. हे लोक लहरी स्वभावामुळें दुसऱ्याचें नुकसान करितात. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष खैर आहे. यास संस्कृतमध्यें 'खदिर' म्हणतात. याचीं पानें शमीच्या पानाएवढीं होतात. खैराचें लांकूड प्रसिद्धच आहे. खैराचे गुण—पाचक, शीत, कडू, तुरट, रक्त शुद्ध करणारें, दांताला हितावह, व्रण-कुष्ट-कंडू-नाशक, धातुपौष्टिक वगैरे प्रसिद्ध आहेत. मृगनक्षत्राच्या मनुष्यांनीं खैराची काठी हातीं धरावी. त्याची पूजा करीत जावी व खैराचें झाड तोडूं नये.

**आर्द्रा**—हें मध्य-लोचन संज्ञक आहे. हें अधोमुख असून दारुणरूप आहे. मणिसम स्वरूपाकृति असून याचा स्वामी शिव आहे. हें नक्षत्र शुभ असून सत्त्व-रज-मिश्र गुणाचें आहे. या नक्षत्राचे गुण—हें तीक्ष्ण असून घातक नाहीं. बुद्धिमत्तेला व विद्वत्तेला योग्य आहे. स्वभावानें तीक्ष्ण व कडक. त्यायोगें विश्वासघात करण्यास कमी करीत नाहीं. खोटीं कामें करण्यास मागेंपुढें पाहत नाहीं. स्वभाव रंगेल, भुताटकी—चेटूक जाणणारा, दरवडेखोर, लुटारू. फसवेगिरीचाहि गुण क्वचित् आढळून येतो व हलक्या कामाकडे प्रवृत्ति असते. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष—कृष्णागरु. यास 'अगरू' असें म्हणतात. याचे कृष्णागरु, दाह-गरु, काष्ठगरु, स्वाद्वगरु व मंगल्यागरु असे पांच प्रकार आहेत. हे मलबाराकडे जास्त होतात. अगरु चंदन हा फारच उच्च प्रतीचा होतो. अगरूचे गुण—सुगंधी, उष्ण, कडू, तिखट, स्निग्ध, मंगलकारक, रुच्य, धूपदीपादि यांस योग्य, पित्तनाशक, पौष्टिक व लघु असे याचे गुण आहेत. अगरूची काठी, पंखा वगैरे नेहमीं हातात वापरण्यांत आल्यास उत्तम पुष्टिकर आहे.

**पुनर्वसु**—सुलोचन-संज्ञक, तिर्यङ्मुख, चलरूप, गृहासम आकृति. याची देवता देवमाता आहे. हें नक्षत्र मध्यम व सत्त्वगुणी आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास खोल बुद्धीचा, धनवान्, कवित्वाची आवड असलेला, विश्वासू, गंभीर, जनसेवा-तत्पर, चित्रकला जाणणारा, थट्टेखोर, मित्रांची आवड बाळगणारा, नीतीनें वागणारा, विचारशील, स्वतः सर्व कार्यात दक्षता बाळगणारा व दुऱ्यावर उपकार करणारा असा होतो. याचा आराध्यवृक्ष वेळू हा आहे. वेळूस 'बांबू' असें म्हणतात. कोंकण वगैरे ठिकाणी वेळूंचीं बेटें आहेत. वेळूचे गुण—शीतल, आंबट, तुरट, सारक, स्वादु—छेदक, कफ-रक्तविकार,

पित्त–कुष्ट-सूज, व्रण-मूत्रकृच्छ्र-अर्श वगैरेंवर फार उपयोगी पडतो. वेळू अत्यंत हितावह आहे. त्याचा वाराहि रोगनाशक आहे.

पुष्य–अंधलोचन-संज्ञक, ऊर्ध्वमुख, लघुरूप. शरासम रूपाकृति. याचा स्वामी गुरु असून हें शुभनक्षत्र आहे. या नक्षत्रांत सत्त्वगुण जास्त आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास परोपकारी, ईश्वरभक्त, नीतिमान्, सर्वसुखी, धनवान्, उच्च भावना बाळगणारा, वडिलांस पूज्य मानणारा असा होतो. या नक्षत्रांत शुभग्रह गुरु, शुक्र, बुध, चंद्र इ. असल्यास उच्च पदवीला पोंचवितात. कित्येक लोक या नक्षत्रावर सुवर्णसंचय करितात. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष पिंपळ आहे. हा वृक्ष सर्वप्रसिद्ध आहे. हा प्रत्येक देवालयांत बहुतेक असतोच. या वृक्षाचे ठिकाणीं देवता वास करितात म्हणून यास पूज्य मानितात. याचे गुणधर्म फारच उत्तम आहेत. पिंपळाचे गुण–मधुर, शीत, तुरट, गुरु, रुक्ष, वर्णकर, योनिशुद्धकर, दाह-पित्त-कफ-व्रण यांचा नाशक. याचें फळ–रक्तदोष, पित्त, दाह, अरुचि यांचा नाश होतो. या झाडाची पूजा ११ शनिवारपर्यंत रोज प्रातःकाळीं केल्यास इच्छित कार्य सिद्ध होतें.

आश्लेषा–मन्दलोचन-संज्ञक, अधोमुख, दारुणरूप, चक्रासम आकृति. याचा स्वामी सूर्य आहे. हें शोककारक असून तमोगुणी आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास कपटी, कृतघ्न, कोपिष्ट, धूर्त, दुसऱ्याचा घात करण्याची इच्छा बाळगणारा, किंचित् मंदबुद्धि, विषारी वस्तूंची आवड बाळगणारा, औषधि-संग्रह करणारा, परधन हरण करणारा होतो. आश्लेषाचे प्रथमचरणावर जन्म झाल्यास कल्याणकारक, दुसऱ्या चरणावर द्रव्यनाशक, तिसऱ्या चरणावर पीडा, चौथ्या चरणावर वडिलांस वाईट, असें म्हणतात. हें दुष्ट नक्षत्र आहे. याचा आराध्यवृक्ष नागचांफा. हें झाड कोंकण व कर्नाटक प्रांतांत

होतें. याचीं पानें मोठीं असतात. फुलांची आकृति नागासारखी दिसते म्हणून नागचांफा म्हणतात. याचे गुण—उष्ण, तिखट, कफ, वायु, अग्निमांद्य व वात-रोग यांचें नाशक आहे.

मघा—मध्यलोचन-संज्ञक, अधोमुख, क्रूररूप, सळासम आकृति. याची देवता पितर आहे. हें नक्षत्र नाशक व क्रूर असून राजसगुणी आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास उच्च इच्छा करणारा, अंमलदार, प्रसिद्धीस येणारा, विलक्षण धैर्याचा, साहसी, शूर, पराक्रमी, द्वेष करणारा व वैऱ्याचा सूड उगविणारा, मारामारी व तंटे-बखेडे करणारा, पितृ-भक्त, अभिमानी व बाणेदारपणानें राहण्याची हौस बाळगणारा. हें तीव्र नक्षत्र आहे. याचा आराध्य-वृक्ष वटवृक्ष आहे. हा वृक्ष सर्वत्र प्रसिद्ध आहे. हें झाड फारच मोठें असतें. यास दरवर्षी नव्या पारंब्या फुटतात व त्यायोगें त्याचा विस्तार सारखा वाढतच जातो. यास हिंदुधर्मांत फार पूज्य मानितात. याचा चीक औषधोपयोगी आहे. वडाचे गुण—शीतल, जड, मधुर, तुरट, ग्राहक, स्तंभक, रुक्ष, पित्त-विसर्प-व्रण यांचा नाशक. याचें फल—मधुर, तुरट, स्तंभक व वायुनाशक. मघानक्षत्राच्या मनुष्यांनीं वडाची पूजा करावी व हें झाड तोडूं नये. आणि शक्य तों वडाचें झाड लावीत असावें.

पूर्वा—हें सुलोचन-संज्ञक आहे. हें अधोमुख असून क्रूर आहे. शय्यासम आकृति. याचा स्वामी भग असून मृत्युदायक आहे. हें सत्त्व-रजमिश्र गुणी आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास बुद्धिमान्, श्रीमंत, शरीर मजबूत, विश्वासू, फारच भटकणारा, वेळ पडल्यास शरण जाऊन आपलें कार्य साधून घेणारा, धूर्त, समयसूचकतेनें वागणारा, नैसर्गिक वस्तूंच्या व्यापाराची आवड बाळगणारा, स्त्रियांचा शौकी, क्वचित् चैनी व ख्यालीखुशालीनें वागणारा. या नक्षत्राचा

आराध्य-वृक्ष पळस हा आहे. पळसाचें झाड सर्वत्र प्रसिद्ध आहे. याच्या फुलाचा रंग लाल असतो व त्यास चापट व लाल रंगाचीं फळें येतात. त्यांस 'पळसपापडी' म्हणतात. त्याचे गुण—तिखट, उष्ण, कफ व कृमि यांचा नाशक व बियांचें तेल योगवाही व आयुष्य-वृद्धिकर आहे. तें विधिपूर्वक घेतल्यास सर्वरोगनाशक आहे. याचें फूल—स्वादु, कडू, उष्ण, तुरट, वातुळ, शीतल, कुष्ठ-मूत्र-कृच्छ्र वगैरेंचें नाशक आहे.

उत्तरा—हें अंधलोचन—संज्ञक नक्षत्र आहे. ऊर्ध्वमुख असून स्थिररूप व परियंकासम स्वरूपाकृति असून स्वामी अर्यमा आहे. हें नक्षत्र विद्याप्रद व शुभ आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास गुणी, श्रीमंत, शांत, उदार, विद्वान्, ऐष-आरामाचा शोकी, बुद्धिमान्, मानी, पाखंडमत मांडणारा व प्रिय होतो. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष पायरी हा आहे.

हस्त—मन्दलोचन-संज्ञक, तिर्यङ्मुख, क्षिप्ररूप, हस्तासम स्वरूपाकृति. याचा स्वामी रवि आहे. हें नक्षत्र लक्ष्मीदायक आहे व सत्त्वगुणी देव-नक्षत्र आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास शरीरसौंदर्य उत्तम, कला-कुशल, विद्वान् व विद्येचा चाहता, दागिन्यांची व वाहनांची आवड, गाडी-मोटार इ. यांत्रिक वाहनां-कडे विशेष ओढा, क्वचित् बाहेरख्याली व दुर्व्यसनी, मादक पदार्थां-ची आवड वगैरे. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष जाई हा आहे. त्यास चमेली असेंहि म्हणतात. याचीं फुलें सर्वत्र प्रसिद्धच आहेत. याचा वेल होतो. या वेलाचा रस औषधांत उपयोगीं पडतो. फुलांचे गुण—सुगंध, तुरट, कडू, उष्ण, मुखपाक व वायु वगैरेंचा नाशक आहे, हस्तनक्षत्रावर जन्मणाऱ्यांचें जीवन-चरित्र फारच भानगडीचें व गुंतागुंतीचें असून अत्यंत श्रवणीय असतें.

चित्रा—मध्यलोचनसंज्ञक, तिर्यङ्मुख, मैत्रीरूप, मौक्तिकासम स्वरूपाकृति. याचा स्वामी त्वष्टा असून शुभदायक आहे. हें राक्षसी नक्षत्र असून तामसी आहे. यावर जन्म झाल्यास उग्रबुद्धि, विद्या कमी, स्त्रियांचा शौकी, दांभिक, छानछोकी, गायनप्रिय, संशयी वृत्तीचा, शस्त्रक्रिया करणारा, गूढ शास्त्राचा अभ्यास करणारा, विणकरी काम करणारा. कापूस अशा लोकांना फारच प्रिय असतो. देवतांची भक्ति, जपज्याप्य हें यांच्यांत जास्त असतें. यांचे चारित्रांत वरचेवर स्थित्यंतर होत असतें. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष बेलवृक्ष आहे. हा सर्वत्र प्रसिद्ध आहे. याचीं पानें शिवपूजनास घेतात. या झाडास कवठासारखीं फळें येतात. त्यास बेलफळ म्हणतात. त्यांतील गीर औषधोपयोगी आहे. या झाडाची सावली फारच शीतल आहे. याचें फळ कोंवळें असतांना स्निग्ध, गुरु, रुचिकर, दीपन, ग्राहक, पाचक, कडू, उष्ण, तुरट, शूल व आमवात-ग्रहणी-कफातिसार यांचें नाशक आहे. हें झाड हिंदु लोकांत फार पूज्य मानितात.

स्वाती—सुलोचन-संज्ञक, तिर्यङ्मुख, चलरूप. तोरणासम स्वरूपाकृत्ति असून याचा स्वामी वायु आहे. हें देवनक्षत्र असून शुभ आहे. हें सत्त्वगुणी व नीतिमान् आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास विद्वान्, बुद्धिमान्, गुणी, ईश्वरभक्ति करणारा, लांबट शरीर, धार्मिक वृत्तीचा, बौद्धिक गोष्टींचा विचार करणारा, पशुपक्षाची आवड असलेला, कारागीर, विनयशील, आत्मसंयमन करणारा, मितभाषणी, वगैरे. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष अर्जुनवृक्ष होय. यास हिंदींत कौहा व सर्वत्र अर्जुनसादडा असें म्हणतात. हें झाड कोंकणांत फार होतें. याचें लांकूड मजबूत असतें. याचे गुण—तुरट, मधुर, शीतळ, कांतिकारक, बलकर, लघु, व्रणशोधक

व अस्थिभंग-कफ-पित्त-श्रम-तृषा-दाह-विषबाधा-भस्मकरोग-रक्तदोष यांचा नाशक आहे. हा अत्यंत औषधोपयोगी आहे.

**विशाखा**—अंधलोचन-संज्ञक, अधोमुख व साधीरूप असून पोंवळ्यासमान स्वरूपाकृति. याचा स्वामी इंद्राग्नि आहे. हें राक्षसी नक्षत्र असून तामसी असल्यानें अशुभ मानितात. या नक्षत्रावर जन्म झाल्यास विद्या कमी, प्रकृति रोगट, कपटी, आंतल्या गांठीचा, धान्याच्या व्यापाराची आवड असलेला, क्षुद्र अंतःकरणाचा व भांडखोर असून मधुर-भाषणी, लोभी, स्त्रीलंपट, अविचारी, मागेंपुढें न पाहणारा व उत्तराला उत्तर देणारा. अशा लोकांच्या भाषणाचा स्वाभाविक विषय असा असतो कीं, त्या भाषणांत मागचापुढचा संदर्भ मुळींच नसतो. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष नागकेशर आहे. हा वृक्ष व याचीं फळें मसाल्यांत उपयोगास आणतात. याचे गुण—कडू, तुरट, आम-पाचक, पित्त-वात-कफ यांचें नाशक असून थंड आहे. याचा कंडू, वातरक्त, कंठरोग, मस्तकशूल, कुष्ट, विसर्प वगैरेंवर चांगला उपयोग होतो.

**अनुराधा**—हें मन्दलोचनसंज्ञक, तिर्यङ्मुख, मैत्ररूप, बलिसम स्वरूपाकृति असून याचा स्वामी मित्र आहे व हें सर्वकार्य-सिद्धि-दायक नक्षत्र आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास मनुष्यास गृह-सौख्य बरें असतें. असे लोक गायनकलाप्रिय असून समाजांत त्यांची चांगली मानमान्यता व पत असते. हें वाहनांचे शोकी, खादाड व कामी असतात. बाहेरख्यालीपणा ह्या मंडळींत जास्त आढळून येतो. ह्यांचा देशोदेशीं फिरण्याकडे फार ओढा असतो, व त्यातच त्यांचा फायदा व नुकसान होतें. हे लोक कधींकधीं सट्टे व शर्यतीमध्येंहि पैसे घालतात. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष नागकेशरच आहे. त्याचें वर्णन वर विशाखा नक्षत्रांत आलेंच आहे.

ज्येष्ठा—हें नक्षत्र मध्यलोचनसंज्ञक व तिर्यङ्मुख असून दारुण-रूप आहे. याची कुंडलासम स्वरूपाकृति आहे. याचा स्वामी इंद्र. हें नक्षत्र नाशक व तामसी गुणाचें आहे. या नक्षत्रावर जन्मणारे लोक स्वभावानें धीट, खुनशी व हट्टी असतात. ह्यांस मित्र थोडे असतात. चमत्कारिक प्रयोग करून हे लोकांचें चित्त आपणाकडे वेधून घेतात. ह्यांस प्रवास करण्याची आवड फार असते व त्यांतच त्यांना मोठा आनंद वाटतो. तसेंच ह्यांस बौद्धिक विषयाची आवड फार असून हे मोठे धर्माभिमानी असतात. ह्यांस स्वतःचें वर्चस्व इतरांवर ठेवण्याची शैली चांगली साधते. यांचे विचार उच्च असतात. या नक्षत्रांचा आराध्य-वृक्ष सांवर हा आहे.

मूळ—हें सुलोचनसंज्ञक असून अधोमुख आहे. दारुण-रूपाकृति व वानरासम स्वरूपाकृति असून याचा स्वामी राक्षस आहे. हें मोठें हानिकारक नक्षत्र आहे. हें जितकें एकाद्याला वाईट तितकेंच एखाद्याला उच्च पदाला पोंचविणारें आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास बहुतेक शांति करण्याचा प्रघात आहे. बागबगीचे करण्याची हौस, दयाळू व सुखी. एकांताची आवड ह्या लोकांत फार असते. हे युद्ध-प्रिय, महत्त्वाकांक्षी, राजकीय उलाढाली करणारे, घराण्यांत नांव-लौकिक काढणारे व धनसंचय करणारे असतात. मुळाच्या तिसऱ्या व चौथ्या चरणांवर जन्मास येणाऱ्यांत वरील गुण प्रामुख्यानें आढळून येतात. ह्या नक्षत्राचा प्रथम व द्वितीय चरण अशुभ मानतात. मुळाच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या चरणांवर जन्म झाल्यास अनुक्रमें सासऱ्याचा, सासूचा व ज्येष्ठ किंवा कनिष्ठ दिराचा घात होतो, असें म्हणतात. कित्येकांच्या मतें मूळ नक्षत्र आईस ठीक नसतें. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष राळेचें झाड आहे. हीं झाडें बंगाल, अबूचा पहाड व उत्तर हिंदुस्थानांत फार होतात. ह्या झाडाच्या

दोन तीन जाती आहेत. त्यांत मोठी राळ फार गुणावह आहे. राळेचे गुण—तिखट, कडू, उष्ण, स्निग्ध, कर्णरोग, रक्तरोग, कफ-विकार, प्रमेह, कुष्ट, विषदोष वगैरेंचें नाशक आहे. हें झाड अत्यंत औषधोपयोगी आहे.

**पूर्वाषाढा**—हें अंधलोचन-संज्ञक, अधोमुख व क्रूररूप असून याची शय्यासम स्वरूपाकृति आहे. यांचा स्वामी उदक आहे. हें नक्षत्र हानिकारक आहे. ह्या नक्षत्रांत तामसी वृत्तीचे गुण जास्त आढळतात. या नक्षत्रावर जन्म झाल्यास विद्या-बुद्धि कमी, सुख साधारण, अपमानाची वागणूक, फसवणूक करणें, वैर, मारामारी, विषबाधा, अभिमान, ताठा व छां छूं करण्याची मांत्रिक कला अंगीं असते. हे लोक सर्व कामांत चतुर, दक्षतेनें वागणारे दुसऱ्याचें न्यून काढणारे, कावेबाजीनें आपलें काम साधून घेणारे, स्पष्ट रीतीनें बोलणारे व लांच वगैरे घेणारे असतात. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष वेताचें झाड आहे. गोकर्ण, मलबार, कोचीन, मंगलोर, रामेश्वर या देशांत हीं झाडें फार होतात. याची लांबी ३०।४० हात असते. हिंदुस्थानांत चीनहून देखील वेत फार येतो. हा वेत उच्च प्रकारचा व मजबूत असतो. याचे गुण—तुरट, शीत, कडू, कफ-वात-पित्त-नाशक; दाह, सूज, मूळव्याध, मुतखडा, विसर्प, अतिसार, योनिरोग, वगैरेंवर उत्तम गुणकारी. वेताचा अंकुर उष्ण, तिखट, खारट, लघु, व वातनाशक आहे. याचें बीज स्वादु, तुरट, आंबट, रूक्ष व सूज, रक्तदोष, भूतबाधा वगैरेंवर फार उपयोगी आहे.

**उत्तराषाढा**—हें मन्दलोचन-संज्ञक, अधोमुख असून स्थिररूप आहे. हत्तीसम स्वरूपाकृति असून याचा स्वामी विश्वेदेव आहे. हें वृद्धिदायक नक्षत्र आहे. ह्यांत रजोगुणाचें प्रमाण जास्त आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास विद्या-बुद्धि अल्प, स्थूल शरीर व आज्ञा-

धारकपणा विशेष असतो. नम्रवर्तन, लष्करी बाणा, नेकीनें वागणारा, उत्तम सेवक, स्वामिनिष्ठापूर्वक काम करणारा, इमानी, देखणा, टापटिपीनें राहणारा व उत्तम विचाराचा असतो. परंतु हें नक्षत्र जास्त महत्त्वाचें नाहीं. सेवक-वर्गाला चांगलें आहे. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष फणस होय. हें झाड सर्वत्र प्रसिद्धच आहे. फणसाचें फळ १५-२० शेरांपर्यंत मोठें होतें. त्यावर जाड कांटे येतात. ते व त्याचा गीरहि खाण्याच्या उपयोगीं येतो. हें झाड मंगलोर, गोमांतक व डोंगरकपारीस जास्त होतें. हें गुरांस दिलें तर दूध जास्त येतें. खाण्यास मृदु आहे. कोंवळा फणस—मधुर, गुरु, बलकर, कफप्रद व मेदोरोगवृद्धिकर, दाह-वायु-पित्त यांचा नाशक आहे. हा एक प्रकारचा उत्तम मेवा आहे.

**श्रवण**—हें सुलोचन-संज्ञक व ऊर्ध्वमुख असून चलरूप आहे. व्यक्ताकार स्वरूपाकृति असून याचा स्वामी विष्णु आहे. हें सुखकारक आहे. हें सत्त्वगुणी नक्षत्र आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास सदाचारी, ईश्वरभक्त, सच्छील, विद्वान्, शास्त्री किंवा वैदिक, अंगीं कर्तृत्व असलेला, ज्ञानी, कलावान्, भोगी, पुष्कळ संतति होणारा, धनवान्, धार्मिक, हट्टी व एकनिश्चयी होतो. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष अर्क म्हणजे रुईचें झाड होय. याचीं पानें वडाच्या पानासारखीं जाड असतात. यास फुलें व फळें येतात. त्या फळांतून बारीक रुई ( कापूस ) निघते. याच्या फुलांचा मारुतीस हार करून घालतात, व याचीं वाळलेलीं लांकडें जाळून त्याचा कोळसा दारूच्या कामीं उपयोगास आणतात. या झाडाचें पान, दूध, चीक, लांकूड वगैरे सर्व पदार्थ औषधोपयोगी आहेत. याचे गुण—सारक, उष्ण, कुष्ट, वायु-कंडू-विष-यकृत्-श्लेष्मोदर व कृमि यांचा नाशक. या झाडाची ११ दिवस पूजा केल्यास व याचीं फुलें

मारुतीस वाहिल्यास दृष्टांत होतो, असें भाविक समजतात.

**दृष्टांतानुभव**—रुईचीं फुलें घेऊन त्याचा रेशमीदोऱ्याचा हार करावा व दररोज एक एक फूल वाढवून त्याचा हार करून मारुतीच्या गळ्यांत घालावा व प्रदक्षिणाहि त्या फुलाप्रमाणेंच वाढवाव्या. पहिल्या दिवशीं एक फूल एक प्रदक्षिणा, दुसऱ्या दिवशीं दोन, याप्रमाणें, किंवा मुलांनीं दररोज एक एक नमस्कार वाढवावा. असें चाळीस ४० दिवस करावें, व त्याचप्रमाणें उतरत उतरत एका नमस्कारापर्यंत आणावें. याला ८० दिवस लागतात. त्यांत चाळिसाव्या दिवशीं स्वप्नांत दृष्टांत होतो, व आपल्या पुढील कार्यासंबंधीं उलगडा होतो आणि कार्यसिद्धि अगदीं अवश्य होते, यांत संदेह नाहीं. हा प्रयोग दोनतीनदां अनुभवलेला आहे. चिकाटी सोडतां उपयोगाची नाहीं. एक दिवस चुकल्यास त्याचा उपयोग नाहीं. पुन्हां सुरवात करावी. स्त्रियांकरितां चार दिवसांची सूट आहे. तरी याचा अनुभव सुज्ञ व अनुभवजिज्ञासू लोकांनी अवश्य घ्यावा.

**धनिष्ठा**—हें नक्षत्र अंधलोचन-संज्ञक व ऊर्ध्वमुख असून चलरूप आहे. चक्रासम स्वरूपाकृति असून याचा स्वामी वसु आहे. हें नक्षत्र साधारण शुभ आहे. ह्यांत तमोगुणधर्म विशेष आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास चंचल-वृत्तीचा, निर्लज्ज, धार्मिक, स्त्रियांचा द्वेष करणारा, बहुतेक लोकांशीं मैत्री जमत नाहीं, गायनवादनाचा नादी, खादाड, निर्दयी, साहसी, अविचारी, आपल्या व दुसऱ्याच्या बलाबलाचा किंवा योग्यतेचा विचार न करणारा, स्थूलदेही, केसाळ, मोठमोठ्या उलाढाली करणारा, सूक्ष्मदृष्टीचा, दुःख भोगणारा, बहुस्त्रिया करणारा व स्त्रियांपासून त्रास पावणारा असा होतो. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष शमी हा आहे. हें झाड सर्वत्र प्रसिद्ध आहे.

विजयादशमीस या झाडाची पूजा करितात. याचीं पानें अगदीं बारीक असतत व हें हवनीय द्रव्यांपैकीं आहे. शमीचे गुण—तुरट, लघु, कडू, तिखट, रेचक, लघु, रक्त-पित्त-कुष्ट-अर्श यांचें नाशक आहे. याची नेहमीं किंवा शनिवारीं तरी पूजा करावी.

**शततारका**—हें मन्दलोचन नक्षत्र आहे. हें ऊर्ध्वमुख असून चलरूप आहे. याची मृगाकार स्वरूपाकृति आहे. याचा स्वामी वरुण. हें नक्षत्र कल्याणकारक आहे. हें रजोगुणी आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास साधारण वर्ण काळसर, बुद्धिमान्, हलका धंदा करणारा, बोलका व ठांसून उत्तर देणारा, सत्यवादी, निर्भीडतेनें वागणारा, स्वतंत्र वृत्तीचा, कुमार्गी, स्त्रियांचा नादी, परदेशगमन करणारा, धनसंचयाची हांव धरणारा, शत्रूस जिंकण्याची इच्छा करणारा, व उच्छृंखळ वृत्तीचा होतो. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष कळंब आहे. हें झाड फार मोठें होतें. याचीं पानें मोठीं व रुंद होतात. या झाडास गोंदहि येतो. याचे गुण—तिखट, कडू, तुरट, खारट, शुक्रवर्धक, शीतल, गुरु, शुक्र, ग्राहक, वर्णकर; रक्तरोग-व्रण-कफ-पित्तकर, व्रण-दाह-विष-मूत्र-कृच्छ्र-वायुरोग यांचा नाशक आहे. मुखरोग व डोळे येतात त्यास फार उपयोगीं आहे.

**पूर्वाभाद्रपदा**—मध्यलोचन, अधोमुख, क्रूरस्वरूप-संज्ञक व वर्तुलाकार स्वरूपाकृति. स्वामी अजचरण आहे. हें नक्षत्र सत्त्वगुणी व शोधक आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास विद्याभ्यासंगीं, कल्पक, बौद्धिक कामें करणारा, शरीर-सौंदर्य साधारण, धनवान्, कीर्तीस पोंचणारा, श्रद्धावान्, चांगल्या योग्यतेनें राहणारा, सुखी, बोलका, मुलांबाळांपासून सुख पावणारा, धार्मिक, खर्च फार करणारा, नांवलौकिकाची हौस बाळगणारा, असा होतो. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष आम्रवृक्ष (आंब्याचें झाड) आहे. हें झाड सर्वत्र प्रसिद्धच आहे.

हीं झाडें उष्ण देशांत जास्त होतात. यांच्या मोठमोठ्या बागा आहेत. यास वर्षांतून एकदां फळें येतात. आंब्याचें लोणचेंहि घालतात. आंब्याच्या स्वरूपाकृतीवरून त्यास निरनिराळीं नांवें पडलीं आहेत. आंबा रक्तवृद्धिकर, गोड, सुगंध, आंबट, रोचक, ग्राहक, क्षार, कांतिकर व पथ्यकर आहे.

**उत्तराभाद्रपदा**—हें सुलोचनसंज्ञक, ऊर्ध्व-मुख व स्थिररूप आहे. यमलाकार स्वरूपाकृति असून याचा स्वामी अहिर्बुध्न्य आहे. हें साधारण बलवान् व लक्ष्मीप्रद आहे. या नक्षत्रावर जन्म झाल्यास बुद्धि साधारण, स्थिरबुद्धीचा, विद्वान्, हट्टी, लोकांना तुच्छ मानणारा, शत्रूचा नाश करणारा, धर्मावर भावना ठेवणारा, व अल्पकेशी असतो. या नक्षत्राचे गुण साधारण उत्तराप्रमाणें असतात. याचा आराध्य-वृक्ष कडूनिंब आहे. यास कोणी लिंब व निंब असेंहि म्हणतात. हें झाड सर्वत्र प्रसिद्ध आहे. याचा पाला कडू असतो. हा अनेक व्याधिनाशक आहे. ह्या वृक्षास ऋषिवर्यांनीं ‘ भूवरील कल्पवृक्ष ’ मानलें आहे. हा पुष्कळ रोगांवर उपयोगीं आहे. पाडव्याच्या दिवशीं म्हणजे वर्षप्रतिपदेस याचा कोंवळा पाला व पांढरीं फुलें वांटून त्यांत मिरें, हिंग, सैंधव, जिरें, ओंवा, चिंच, गूळ हीं घालून जेवण्याच्या आधीं शुचिर्भूत होऊन सर्वांनीं भक्षण करावें, असा पूर्वींच्या शास्त्रकारांनीं नियम घालून दिला आहे. आपल्या आरोग्याच्या संरक्षणासाठीं वर्षांतून एकदां तरी लिंबाच्या पानांचा उपयोग करण्याचा प्रघात आहे. लहान मुलांना देवी निघाल्यास लिंबाच्या ( कडूलिंबाच्या ) डाहळ्यांनीं वारा घालतात. त्याच्या पानांचा अंगास स्पर्श झाल्यानें शीतलता उत्पन्न होऊन थंड वाटतें. लिंबाचें झाड दारापुढें असल्यास त्याच्या वाऱ्यानें घरांतील मनुष्यें निरोगी राहतात व हवाहि स्वच्छ राहते.

नुसता कोंवळा पाला खाऊन राहणारे बरेच विरक्त पुरुष आहेत. त्यांच्या आंगाची कांतिहि चांगली तेज:पुंज दिसते. यावरून या वृक्षांत फारच अलौकिक गुण आहे, हें सिद्ध होतें. ह्या झाडाच्या गुणांवर हें झाड युरोपांत लावण्याची डॉक्टर लोकांनीं बरीच खटपट केली, परंतु ती सिद्धीस गेली नाहीं. हा वृक्ष हिंदुस्थानांत फार आहे व तो फार वर्षे जगतो. हा एकदां तोडून काढला असतां पुन्हां मोठें झाड होतें. याप्रमाणें शेंकडों वर्षें याची लागवड चाललेली असते, हें झाड धर्मशाळा, विहिरी, सडकेवरून व घरांत वगैरे लावण्याचा प्रघात जास्त आहे. देवळें व मोठमोठीं मंदिरें यांतून निंब व पिंपळाचें झाड एके ठिकाणीं लावण्याचा प्रघात फार आहे; व ह्या दोन्ही वृक्षांची मैत्रीहि पण फार आहे. तें आपल्या धर्मांत फार पूज्य मानिलें आहे. कारण अशा ठिकाणीं लक्ष्मीनारायणाचें वास्तव्य असतें, अशी समजूत आहे. याचे गुण—शीतल, कडू, ग्राहक, तिखट, व्रणरोपण, सुजेला पिकवणारें, हितकर; कृमि, कफ, सूज, वांति, वायु, कोड, हृदयदाह, श्रम, खोकला, तृषा, अरुचि, रक्तदोष, प्रमेह, उपदंश वगैरेंचें नाशक आहे. कडूनिंबाच्या वृक्षाचीं पानें, फुलें, गोंद, काड्या, लांकूड वगैरे सर्व भाग औषधोपयोगी आहे. लिंबाच्या काड्यांनीं दंतधावन करावें. म्हणजे दांतांस कीड लागत नाहीं व पुवाचा संचय होत नाहीं. अलीकडे याचा उपयोग कोणी करीत नाहीं, त्यामुळें बहुतेक सर्व तरुणांचे दांत खराब झालेले आढळतात व दांतांत पूहि झालेला पाहण्यांत येतो. तरी यापुढें तरी आमचे तरुण पिढींतील विद्यार्थी, पुरुष व स्त्रिया इकडे लक्ष देतील तर त्यांचे दांत निरोगी राहतील. शरीरप्रकृति निरोगी राहण्यास दांतांची खबरदारी अवश्य घेतली पाहिजे. पूर्वीं बाळंतपणामध्येंहि निंबाचा रस तीन दिवस जेवण्याच्या पूर्वीं एकदां बलाबल

व अनुपान पाहून देत असत. त्यायोगें बायकांना बाळंतपणासारखे रोग होत नव्हते. अलीकडे हा प्रचार अगदींच बंद झाला आहे. त्यामुळें पुष्कळ स्त्रियांची संख्या बाळंतरोग वगैरे वगैरे व्याधींनीं ग्रासलेली आढळते. अशा शेंकडों स्त्रिया मृत्युमुखीं पडतात. हा प्रघात तेलंगण देशांत लंबाडी व गौंड लोकांत अद्यापि कोठें कोठें आहे. त्यामुळें त्यांच्या स्त्रिया एका आठवड्यांत उठून घरांतील कामधाम करूं लागतात. कडूनिंबाच्या झाडाचे गुण—सर्व झाडांत हें श्रेष्ठ व सर्वोपयोगी आहे. तरी सर्वांनीं त्याचा शक्य तों उपयोग करण्याकडे लक्ष ठेवावें. निदान दांत घांसण्यासाठीं ब्रशाऐवजीं लिंबाच्या काडीचा उपयोग अवश्य करावा, अशी नम्र विनंति आहे.

**रेवती**—अंधलोचन, तिर्यङ्मुख व रेवतीकार रूप (?). पर्यासम स्वरूपाकृति. याचा स्वामी सूर्य आहे. हें नक्षत्र सात्त्विक व ऐश्वर्य भोगणारें आहे. बुद्धिमान्, विद्वान् व चतुर पुरुष ह्या नक्षत्रावर होतात. या नक्षत्रावर जन्म झाल्यास सत्यप्रिय व शांत, कायदे जाणणारा, पंडित, सत्कर्म करणारा, वडिलांना पूज्य मानणारा, आपलें नांव मागें ठेवून जाणारा, धार्मिक बाबतींत पुष्कळ द्रव्य खर्च करणारा, मानी, दुसऱ्याचे शब्द न साहणारा, कृति करून दाखविणारा, असा होतो. या नक्षत्राचा आराध्य-वृक्ष मोहाचें झाड आहे. हें फार मोठें होतें. या झाडाच्या पानांच्या पत्रावळी लावतात. मोहाच्या फुलाची दारू काढितात, व त्याच्या बियांचें तेल निघतें. मोहाचीं झाडें निजाम इलाख्यांत फार आहेत, व तेथें मोहाच्या दारूचे गुत्तेहि आहेत. त्याचीं फुलें दक्षिण हैद्राबादेस हजारों पल्ले येतात. नेहमीं फुलांनीं भरलेल्या वागिणी स्टेशनावर येतात, व त्यांचा उपयोग सररहा दारू काढण्याकडे होतो. निजाम संस्थानास दारूचें फारच मोठें उत्पन्न आहे, व मोहाच्या झाडावर पोलीसची

निगराणी आहे. परमेश्वरानें कांहीं वनस्पती व झाडें उत्तम गुणांचीं व कांहीं मादक द्रव्यांचीं निमार्ण केलीं आहेत, परंतु शक्य तों त्यांतील चांगला गुण घेण्याकडे मनुष्यानें लक्ष ठेवल्यास पुष्कळ फायदा होईल.

मोहाचे गुण—मधुर, शांत, कफकर, वीर्यकारक, पौष्टिक, तुरट, कडू, पित्त-हारक, श्रम-हारक, कृमि-वायु-नाशक, वगैरे. मोहाच्या मदिरेचे गुण—मादक, तुरट, बलकर व जास्त वापरण्यांत आल्यास क्षयकारक, दंतरोग उत्पन्न करणारी, अजीर्ण व जीर्ण-ज्वरादि रोग वाढविणारी, असे त्या मदिरेपासून हानिकारक रोग होतात.

नक्षत्रांच्या वृक्षांसंबंधींचा विचार नारदसंहितेमध्यें केला आहे.

## स्त्री-जन्मनक्षत्रफलविचार ( त्रोटक ).

**अश्विनी** नक्षत्रावर कन्या जन्मल्यास—ती स्त्री मनोवेधक, बहुद्रव्यवती, प्रियदर्शनी, प्रियभाषिणी, सहनशील, सुंदर, शुद्धाचरणी, देव-गुरु-ब्राह्मण यांची भक्ति करणारी असते. तिचे दांत मजबूत असतात.

**भरणी**—कलहप्रिय, घात करणारी, दुष्ट अंतःकरणाची, मानी व आंतल्या गांठीची.

**कृत्तिका**—अतिशय कोपिष्ट, भांडखोर, उदासीन वृत्तीची, द्वेष करणारी, बंधुजनविरहित, कफयुक्त प्रकृति, कृश व अशक्त.

**रोहिणी**—सुंदर शरीराची, शुद्धाचरणी, हुशार, पतिव्रता, पितृ-मातृभक्त, सुपुत्रवती, ऐश्वर्यवान्, मुखवटा सुंदर व गोल, नीटनेटकेपणानें वागणारी व समयसूचकतेनें बोलणारी.

**मृग**—ती स्त्री लोकमान्य, रूपवती, प्रिय भाषण करणारी, भूषणांलकारप्रिय, नानाप्रकारचें द्रव्य व अन्नवस्त्र यांनीं युक्त, सुपुत्रा, धर्मासक्त, शुद्ध शरीर व दक्षतेनें वागणारी.

**आर्द्रा**—रागीट स्वभाव, खोडसाळपणानें बोलणारी, दुसऱ्याचें उणें पाहणारी, जास्त खर्च करणारी, आपलें म्हणणें खरें करणारी, व कफ-विकारी.

**पुनर्वसु**—निष्कपटपणानें स्नेह करणारी, बहुश्रुत, पुण्यकृत्यें करणारी, उत्तम स्वभावाची, धर्माविषयीं तत्पर, लोकपूज्य, दानधर्माकडे जास्त ओढा असणारी.

**पुष्य**—सुंदर, सर्व कृत्यांत प्रसिद्ध, सौभाग्यवती, सुपुत्रवती, देवद्विजांवर प्रीति करणारी, धनप्रिय, उत्तम गृहांनीं युक्त, सुखसंपन्न, बंधुजनप्रिय, वात-विकारी.

**आश्लेषा**—ओबडधोबड, कुरूप, दुःखी, कठोर भाषण करणारी, क्रियाहीन, काम करण्यांत चुका करणारी, कपटी, गर्विष्ठ, हलगर्जीपणानें वागणारी.

**मघा**—लोकमान्य, ऐश्वर्यसंपन्न, पुष्कळ शत्रु असणारी, निष्पाप, गुरुभक्ति करणारी, ब्राह्मणांचे ठायीं नम्रता, कौटुंबिक सुख यांनीं युक्त, धैर्यशालिनी, स्पष्टपणानें बोलणारी व न्यायी.

**पूर्वा**—शत्रूला जिंकणारी, दुसऱ्याचा पाडाव करणारी, रूपवती, विनयशील, सत्कर्मासक्त, शास्त्रप्रिय, प्रियभाषिणी, पुण्यशील, दुसऱ्यावर उपकार करणारी व दुसऱ्याचा उपकार जाणणारी.

**उत्तरा**—स्थिरमनाची, धनधान्ययुक्त, विनयशील, गृहकृत्यांविषयीं दक्ष, गुणाचे ठिकाणीं प्रीति करणारी, निरोगी, सदा आनंदी वृत्तीनें राहणारी, शांतताप्रिय, मधुरभाषिणी.

**हस्त**—हात, डोळे, कान, प्रमाणशीर, गोंडस व सुंदर असून क्षमायुक्त, शीलवती, सर्व कृत्यांत दक्ष, सुजाण व शुभकारक, सुखाची वृद्धि करणारी, शरीरानें पुष्ट, सुबक व सुस्वरूप.

**चित्रा**—चित्रविचित्र अलंकार धारण करणारी, रूपवती,

पोषाख बदलण्याची आवड बाळगणारी व छानछोकीनें राहणारी. कृष्णपक्ष चतुर्दशीस चित्रानक्षत्र असून त्यावर जन्म असल्यास ती विषकन्या मानितात व शुक्लपक्षीं चतुर्दशीस चित्रानक्षत्र असतां जन्म असल्यास दरिद्री, असें कित्येक म्हणतात.

**स्वाती**—पतिव्रता, धनवान्, पुत्रवती, सत्य बोलणारी, मंदमंद चालणारी, कीर्तिमान्, बहुसखिजनयुक्त, शत्रूस जिंकणारी, सुशील व विचारी.

**विशाखा**—प्रिय व मृदु बोलणारी, कोमलांगी, ऐश्वर्यसंपन्न, तीर्थसेवा करणारी, व्रतधर्मतत्पर, बंधुजन-प्रिय, अल्प-संतति, दुसऱ्याच्या विचारांना हाणून पाडणारी व त्यास बोलूं न देणारी.

**अनुराधा**—उत्तम मैत्रिणींनीं युक्त, निराभिमानी, प्रसन्नमूर्ति, अधिकारसंपन्न, सभ्यवस्त्रालंकार धारण करणारी, गुरुभक्त, अखंड सौभाग्यवती, सर्वपूज्य.

**ज्येष्ठा**—रमणीय, प्रौढ, मंजुळ बोलणारी, नम्रतेनें युक्त, बहुधन-संपन्न, सौभाग्ययुक्त, पुत्रवती, बंधुयुक्त, सत्य बोलणारी, सर्वांवर दरारा व वर्चस्व ठेवणारी.

**मूळ**—अल्पसुखी, दरिद्री, रोगग्रस्त, शत्रु असणारी, बंधुसुख कमी, दुसऱ्याकडून त्रास पावणारी, गर्विष्ठ, हेकेखोर, सुख घेण्याची आवड बाळगणारी.

**पूर्वाषाढा**—आपल्या कुळांत श्रेष्ठ, अनुकूल अशी, स्तुत्य कृत्यें करणारी, पराक्रमी, सत्यभाषण करणारी, विशालनेत्री, रूपसंपन्न, सत्कीर्तिमान्, कुटुंबांत वजन, ओजस्वी भाषण करणारी, धार्मिक वृत्तीची.

**उत्तराषाढा**—सुंदर, प्रख्यात, नानाप्रकारचें धन व उपभोग यांनीं युक्त, पुढारीपण करणारी, संतुष्टचित्त, प्रियभाषिणी, पतिप्रिय,

**श्रवण**—सुस्वरूप, ज्ञानवती, शास्त्रप्रिय, प्रमावानें युक्त, दानशूर, सत्य बोलणारी, नेहमीं परोकार करण्याची इच्छा बाळगणारी. धैर्यवान्.

**धनिष्ठा**—सुकथाप्रिय, नानातऱ्हेचें अन्न व अलंकार यांचा उपभोग घेणारी, धनयुक्त, भूतमात्रावर दया करणारी, गुणसंपन्न, जिचें वर्तन दुसऱ्यास बोधकारक होईल अशी.

**शततारका**—इंद्रियनिग्रह करणारी, स्त्रीजनमान्य, बंधुवर्गांत पूज्य, देवाची भक्ति करणारी, साधुसंत यांचें आदरातिथ्य करणारी, सद्वर्तनी.

**पूर्वाभाद्रपदा**—बहुधनवती, श्रवणप्रिय, सत्पात्राचे ठायीं दान करणारी, सुज्ञांच्या समागमानें विद्येचा लाभ घेणारी, मनुष्याची पारख करणारी, समाजामध्यें वजन असणारी, सन्मान्य.

**उत्तराभाद्रपदा**—पतीचें हित करणारी, क्षमाशील, गुरूचे ठायीं पूर्ण भक्ति, निगर्वी, सुसौख्यांनीं युक्त, विचारी, प्रपंचकार्याविषयीं दक्षता बाळगणारी, समयास योग्य असें उत्तर देणारी.

**रेवती**—स्त्रीजनपूज्य, शुद्ध स्वभावाची, व्रताचरण करणारी, पुष्कळ पशुसंततीनें युक्त, शत्रूस जिंकणारी, गृहकृत्यांत दक्षतेनें वागणारी, सुस्वरूप, उत्तम विचाराची, कल्पना-शक्ति अचाट, धनधान्य यांनीं समृद्ध.

---

# ग्रहांचें नक्षत्रफलवर्णन.

## रवि.

**रवीचें सामान्य स्वरूप**—पर्वेशा सारखे डोळे, पिवळसर, थोडा कमणा, स्वच्छ, निर्मळ, शरीर रोडकें, हाडें जास्त, मध्यम बांध्याचा,

पित्तप्रकृति, वर्ण लाल, क्षात्रधर्म, सत्त्वगुणी, अंमल गाजविणारा, शूर, पूर्व दिशेचा मालक. याची देवता—अग्नि. वस्त्र—जाड. धातु—तांबें. रस—तिखट. राजदरबार, वगैरे स्थल.

१ **अश्विनी** नक्षत्रांत रवि असल्यास—हें नक्षत्र त्याचें पूर्ण उच्च आहे. बलवान्, मानसन्मान, हुकमत चालविणें, अधिकार प्राप्त होणें, महत्त्वाकांक्षी, विद्वान्, पुढारी, जोखमीचीं कामें आंगावर घेणारा, सर्वांवर दरारा कायम ठेवणारा, डोळे साधारण घारे, किंचित् पिंगट, चेहरा लाल व भव्य असा.

२ **भरणी**—स्वभाव साधारण कठोर, कर्तृत्वहीन, आळशी, बुद्धि साधारण, साधारण संपत्ति, द्रव्यावर प्रेम, दुसऱ्याचें अनुमोदन घेणारा, स्वतः जबाबदारींत न फसणारा, नौकरींत आनंद मानणारा, द्रव्य-व्यय करणारा

३ **कृत्तिका**—कठोर भाषणी, प्रकृति उष्ण, क्वचित् दंतविकारी, रागीट, देवी-गोवर वगैरे आजारांत त्रास, धैर्यवान्, स्वतःचें नांव पुढें आणणारा, खोल मनाचा.

४ **रोहिणी**—मानमान्यता पावणारा, संसाराचें ओझें चालविणारा, बुद्धि चांगली, सुखी, संपत्ति बाळगणारा, व्यवस्थेशीर राहणारा, नीतिमान्.

५ **मृग**—कर्तृत्वहीन, गर्विष्ठ, रागीट, बुद्धि साधारण, संपत्तीची आवड जास्त, ऐटींनें राहणारा, आशा-पटु, अघळपघळ बोलणारा, विचारी.

६ **आर्द्रा**—नुकसानीचे प्रसंग वारंवार येणारे व दुसऱ्याची नुकसानी करणारे, दुःखदायक, क्रोधी, मनाचा कल दुसऱ्याचें बरें न पहाण्याकडे, हेवादेवा करणारे.

७ **पुनर्वसु**—भाषाशास्त्र जाणणारा, सत्यप्रिय, भक्ति करणारा,

विद्याभ्यासंगी, प्रत्येक गोष्टींत चांगलें मन घालून काम करणारा, आकर्षणशक्ति चांगली.

८ पुष्य—सदाचारी, ईश्वरभक्ति करणारा, योग्यतेस चढणारा, लोकप्रिय, सार्वजनिक हिताचीं कामें करणारा, आपलें नांव मागें ठेवणारा, सर्वांचें हित पाहणारा, व ज्ञानानें—सात्त्विक विचारानें कामें करणारा.

९ आश्लेषा—खोटीं कामें करणारा, ठकविणारा, दुसऱ्यास त्रास देणारा, वडिलांना दुखविणारा, स्वतःची चैन पाहणारा, खेळाडू, धैर्यवान्, नेटानें कामें करणारा, परंतु भाषणांत असत्यपणा जास्त असतो.

१० मघा—मुत्सद्दी, चाणाक्ष, धोरणी, राजकारणी, धूर्त, वैभव भोगणारा, सुखी, राजकीय चळवळींत पडणारा, मानी, शत्रूस जिंकणारा व त्यांचा बीमोड करणारा, अजिंक्य, शरीरयष्टि चांगली, प्रसंगीं न खचणारा, धैर्यवान्, अधिकार चालविणारा, सर्वांवर दरारा ठेवणारा, मोठा अधिकारी, कुलदीपक, मागें नांव ठेवणारा, कर्तृत्वशक्ति चांगली, तैलबुद्धि, पराक्रमी, चांगलीं कामें करणारा.

११ पूर्वा—सज्जन, मानमान्यता चांगली, समाजाचीं कामें करणारा, संपत्तिमान्, शरीर-यष्टि चांगली, ऐश्वर्य भोगणारा, विलासी.

१२ उत्तरा—विद्या-बुद्धि कमी, अपमान पावणारा, आळशी किंवा जास्त लगट करणारा, प्रेमाचा अतिरेक व त्यापासून लौकिक जाणें, अपयशी.

१३ हस्त—शांत नम्र, ईश्वरभक्ति करणारा, देवब्राह्मणांचा पूजक, विद्वान्, गुणी, संपत्तिमान्, हिताचीं कामें करणारा, पुष्कळशा कला जाणणारा, गुणी, गुणग्राहक, नम्रताधारण करणारा, शांत.

१४ चित्रा—धर्मश्रीमंतींत राहणारा, पोकळ डौल मिरविणारा,

हौशी, मायावी, आर्जव करणारा, अधिकाराच्या जोरावर दुसऱ्यास त्रास देणारा व स्वतःचे फायदे पाहणारा; क्षुद्र मनाचा, आळशी, अव्यवस्थितपणानें वागणारा.

१५ **स्वाती**–परोपकारी, विद्वान्, साधुत्वाची हौस बाळगणारा, ईश्वरभक्ति करणारा, जपज्याप्यप्रिय, परोपकारी, शास्त्रज्ञ, न्यायी, तत्त्वज्ञानी, शांत व परोपकाराचीं कामें करणारा.

**१६ विशाखा**–स्वतः दुःखी व संकटें भोगणारा, कपटी, घातकी, दुसऱ्यास संकटांत टाकणारा व आप्तजनांची काळजी न घेणारा, लहरी, धाडसी, दयेचें नांव नको, कपटानें चालणारा, डावपेंचांनीं वागणारा, अविश्वासाचीं कामें करणारा.

१७ **अनुराधा**–सज्जन, कामी, डॉक्टरी करणारा, चिकित्सेनें पाहणारा, बोलका, भक्तिमान्, सात्त्विकतेनें वर्तन ठेवणारा, मायाळू, आप्तइष्टांची काळजी घेणारा.

१८ ज्येष्ठा–गुप्त बातमी ठेवणारा व खलबतें करणारा, खुनशी-पणानें वागणारा व सुडाची लालसा ठेवणारा, गुप्त कटांत राहणारा, आपले विचार गुप्त ठेवणारा, गूढ-विचारी, वरून डौलानें व सभ्यतेनें राहणारा पण ढोंगी साधूप्रमाणें कृत्यें करणारा, आंतून पूर्ण कृष्णकारस्थानी, व्यसनी व निर्लज्ज.

१९ **मूळ**–अतिक्रोधी, शरीर-यष्टि चांगली, बळकट व काटक, कर्तृत्वशक्ति चांगली, मोठ्या लोकांत वागणारा, डौलानें राहणारा, क्रोधी, नांवलौकिक वाढविणारा, कीर्तीस चढणारा, लढाऊ वृत्तीचा, शक्तीच्या बाहेर कामें करणारा, उलाढाली फार करणारा, प्रत्येक गोष्टींत पडणारा, पुढारीपण गाजविणारा, प्रकृति उष्ण.

२० **पूर्वाषाढा**–सुखी, ऐश्वर्य भोगणारा, भाग्यास चढणारा, नीतिमान्, सारासार विचारानें कामें करणारा, दक्ष व उत्तम

२१ उत्तराषाढा—समाधानी, यश कमी, वादी व प्रयत्नानेंच यशास येणारा, सुखी राहणारा.

२२ श्रवण—ईश्वरभक्ति करणारा, सदाचरणानें चालणारा, नीतिमान्, कर्मठ, कुलपरंपरेचीं कृत्यें करणारा व त्यांत चांगली प्रगति करणारा, दुसऱ्याविषयीं दया बाळगणारा.

२३ धनिष्ठा—अविचारी, व्यसनी, निर्दय, मतलबी, स्वार्थी-पणानें वागणारा, अविचारी कृत्यांत पडून फाजित पावणारा, सारा-सार विचार न करणारा.

२४ शततारका—विद्या—बुद्धि चांगली, धूर्तपणानें वागणारा, दूरदर्शीपणानें व दक्षतेनें वागण्याची खटपट करणारा, विचारी.

२५ पूर्वाभाद्रपदा—शोधक, विद्वान्, कल्पक बुद्धीचा, शास्त्रज्ञ, सर्वांवर उपकार करणारा, मांत्रिक, जास्त अवडंबर माजविणारा, दिखाऊपणा जास्त.

२६ उत्तराभाद्रपदा—नीतीकडे पाहणारा, विद्या मध्यम, प्रग-तीचा प्रयत्न करणारा, मार्ग आंखून चालणारा.

२७ रेवती—विद्वान्, देशभक्त, सज्जन व खर्चिक, ज्याचा आजार लांबणीवर पडतो, उष्ण—विकारी, गंभीरता ठेवणारा, साधारण सभ्य.

## चंद्र.

**चंद्राचें सामान्य स्वरूप**—हा ग्रह रवीच्या खालोखाल असून सौम्य आहे, म्हणून स्त्रीग्रह मानिला आहे. मन जसें चंचल, तसाच हाहि कलावान् व शीघ्रगतिक असल्यामुळें मनाचा व दरोबस्त मनो-व्यापारांचा हा कारक धरितात. शांत, शीतल, चंचल, आर्द्र, निशादर्शक, कफप्रकृति इ० गोष्टींचें कारकत्व याजकडे आहे. हा

कालपुरुषाच्या चतुर्थस्थानाचा म्हणजे सुखस्थानाचा किंवा मातृ-स्थानचा मालक ( कारण येथें कर्कराशि येते ) असल्यामुळें सुख, वाहनें, आई, घर, स्थलांतर, जलप्रवास वगैरेंचा निदर्शक आणि मोतीं, प्रवाही पदार्थांचा व्यापार, मुशाफरी, नावाडी–खलाशाचें काम, स्त्रियांचें काम–सुईणपण इ., पाणी वाहण्याचें काम, मोठ्या दर्जाच्या स्त्रिया व त्यांचें कारभारीपण वगैरे गोष्टींचाहि कारक आहे. मेंदू, लाळ. स्तनाचा भाग, पोट–विशेषतः हृदयाचा भाग इ. अवयवांवर ह्याचा अंमल आहे. **चंद्राचे गुण**–राज्यकारक, गौर, शुभ्रवर्ण, सत्त्वगुण–सत्य–मार्दव-स्थैर्य-दया-कोमल भाषण, इ.; नाजूक, सडपातळ, गोल व कफ–सर्दी, शिरा जास्त असणें. **देवता**–वरुण. **दिशा**–वायव्य. **वस्त्र**–शुभ्र व कोरें. **स्थान**–जल. **धातु**–चांदी. **रत्न**–मोतीं. **रस**-लवण.

१ **अश्विनी** नक्षत्रावर चंद्र असल्यास–चपल, चंचल, उत्तम लेखक, विद्वान्, पुढारी, लांबचे प्रवास करणारा, ज्याचें मन एका ठिकाणीं जास्त वेळ स्थिर राहूं शकत नाहीं असा, जलद चालणारा, मनोराज्याची भरारी मारणारा, उत्तम विचारांनीं युक्त.

२ **भरणी**–गर्विष्ठ, भोळसर, विद्येची अभिरुचि कमी, मनाचा दुर्बळ, भिक्षुक, भाषण कठोर व उतावळा स्वभाव, वारंवार दुसऱ्याचें मत घेऊन काम करणारा, स्वभाव किंचित् भित्रा व पाण्यास भिणारा.

३ **कृत्तिका**–कठोर भाषणी, शिर व नेत्ररोगी, विद्या कमी, उतावळा, विचार न करितां एकदम बोलणारा, हट्टी स्वभाव, उष्ण प्रकृति.

४ **रोहिणी**–सुस्वरूप, सुंदर व मोहक. स्त्रियांना हा चंद्र लावण्याची खाण बनवितो. शरीरबांधा गोंडस, सदाचरणी, प्रिय-

भाषणी, मनमिळाऊ, ऐश्वर्यवान्, भाग्याची चिंता करणारा, सर्व कामांत दक्ष, विद्याभ्यासंगी, कृपाळू, भाग्यास, चढणारा, कुटुंबांत प्रिय.

५ मृग—गर्विष्ठ, निरुद्योगी, कर्तृत्वहीन, ऐदी, सुस्त, आपल्याच हातांनीं आपल्या कामांत घोंटाळा उडवून घेणारा, वारंवार संकटांत पडणारा.

६ आर्द्रा—स्वभाव कडक, खर्चिक, उपद्रवी, दरिद्री, लवकर प्रसन्न होणारा, हेकेखोर.

७ पुनर्वसु—धनवान्, विद्वान्, बोलका, शास्त्रज्ञ, सुंदर, लेखक, ग्रंथकार, आंखलेले विचार, गंभीर, गायनवादनाचा शोकी, भाषापटु.

८ पुष्य—लोकप्रिय, संपत्तिमान्, महात्मा, पुण्यवान्, योगी, अधिकारी, लांबचे प्रवास करणारा, दुसऱ्यांचें हित करणारा, दूरदर्शीपणानें वागणारा, उत्तम विचाराचा, मानमान्यता पावणारा.

९ आश्लेषा—विश्वासघातकी, असत्यभाषणी, मातृदुःखी, साहसी, दुसऱ्यांना दुःख देऊन आपण सुख मानणारा, चपल कल्पनेचा, क्षणिक बुद्धीचा.

१० मघा—महत्त्वाकांक्षी, वरिष्ठपणा गाजविणारा, शत्रुहंता, पराक्रमी, राजयोगी, मोठ्या लोकांशीं स्नेह संपादन करून वागणारा, शरीरयष्टि चांगली—मजबूत, दंतविकारी, स्वतःच्या बलाच्या भरंशावर काम करणारा, स्वतंत्र विचाराचा.

११ पूर्वा—शरीर बळकट, खेळाडू, मल्ल, विद्या-बुद्धि कमी, द्रव्य-संचयाची इच्छा प्रबळ, दिखाऊपणाचीं कामें करणारा, गर्भश्रीमंत, पोकळ डौल दाखविणारा.

१२ उत्तरा—परावलंबी, दुर्बल मनाचा, भोगी व सुखी, ‘ होस हो ’ म्हणणारा.

१३ **हस्त**—सदाचारी, देवभक्त, लाजाळू, नीटनेटकेपणा कमी, अव्यवस्थित राहणारा, बुद्धि चांगली, सुस्त, आळशी.

१४ **चित्रा**—हिंमतवान्,शरीर-कांति चांगली,धैर्यवान्,धीट,विद्वान्, समंजस,भाषण-पटु,आपलें भाषण वायां न जाऊं देणारा,विनोदी, हुषार.

१५ **स्वाती**—शांत चित्ताचा, सत्यप्रिय, विद्वान्, बुद्धिमान्, सज्जन व न्यायी, लेखक, शास्त्रज्ञ, ईश्वरावर भरंवसा ठेवणारा, यज्ञयाग करणारा, पुण्य व धर्मकृत्यें करणारा, भक्तिमान्, सात्त्विक-वृत्तीचा, सर्व कृत्यांत दक्ष, सुज्ञ व विचारपूर्वक वागणारा.

१६ **विशाखा**—दुष्टमनाचा, दीर्घदेही, विद्या-बुद्धि कमी, शत्रुत्व प्राप्त करून घेणारा, दुसऱ्याचा नायनाट करण्याचे प्रयत्न करणारा; अशुद्ध अंतःकरण, द्वेषबुद्धि बाळगणारा.

१७ **अनुराधा**—कांतिमान्, प्रेमी, स्त्रीलंपट, ईश्वरभक्तींत तत्पर, सज्जन, यश संपादन करणारा, सुखी, मानमान्यता पावणारा, भक्तिमान्, सात्त्विक विचाराकडे मनें वळविणारा, उदारबुद्धीचा, विचारशील, लक्ष्यपूर्वक काम करणारा, सर्वांत मानमान्यता पावणारा,

१८ **ज्येष्ठा**—अल्पमति, संतोषी, धार्मिक कृत्यें करणारा, क्षोभी, आपले विचार गुप्त राखणारा, दुष्ट, घातकी, सूड घेणारा व सुडाची इच्छा करणारा, निर्भीडपणें बोलणारा, बेमुरवत, भीडभाड न ठेवणारा, फटकळ—परंतु मनाचा दुसऱ्यास थांग न लागूं देणारा, खोल बुद्धीचा, गहन विचाराचा.

१९ **मूळ**—मानी, धनी, सुखी, हिंसा न करणारा, स्थिर-बुद्धीचा, पराक्रमी, दीर्घप्रयत्नवादी, नशीब काढणारा, साहसी, क्रोधी, व्यापारी दृष्टीचा, उच्च ध्येय ठेवणारा, मोठ्या लोकांत वागणारा, पूर्वजांचें नांव राखणारा व नांवलौकिकास चढणारा, पराक्रमी, बापाला अनिष्ट दर्शविणारा.

२० **पूर्वाषाढा**—अनुकूल व आनंदी, उतम स्त्रीचा पति, मानी व मित्रसंपन्न, आप्तइष्टांसहित आनंदी; व्यापारी, संपत्तिमान्; शरीर बळकट व निरोगी, मोठा अधिकारी, द्रव्यप्रिय, कर्तृत्व-शक्ति चांगली, ऐश्वर्य भोगणारा, सज्जन, मानी, द्रव्य खर्च न करणारा.

२१ **उत्तराषाढा**—धार्मिक, विनीत, बहुमित्र, कृतज्ञ, भाग्य-वान्, दीर्घकालानें यश संपादन करणारा, पुष्कळ वेळां अपयश पावणारा, भाग्यास उतार व चढ लागणारा.

२२ **श्रवण**—बहुश्रुत, उदार स्त्रीचा पति, श्रीमंती भोगणारा, कीर्तिमान्, कर्मठ, ईश्वरभक्ति करणारा, सदाचरणानें वागणारा, दयाळू, गरीब लोकांवर दया करणारा.

२३ **धनिष्ठा**—दाता, संपन्न, शूर, स्थूल शरीराचा, भोजनप्रिय, अविचारानें वागणारा, धनसंचय करणारा.

२४ **शततारका**—व्यसनी, स्पष्ट बोलणारा, साहसी, दुर्दैवी, संकटें भोगणारा, कल्पकबुद्धीचा, विद्या कमी, लहरी स्वभावाचा, वरून आपलेपणा दाखविणारा.

२५ **पूर्वाभाद्रपदा**—वक्ता, सुखी, धार्मिक, शत्रुहंता, शरीर-सौंदर्य चांगलें, सुखी, सज्जन, गुणग्राहक, तैलबुद्धीचा, विचारवंत.

२६ **उत्तराभाद्रपदा**—धनी, कुशल, शोधक, विद्वान्, नादिष्ट, विद्याव्यासंगी, कायदेपंडित, सुधारणा करणारा, पुराण व शास्त्रें जाणणारा, व्यवस्थेशीर वागणारा.

२७ **रेवती**—पुष्ट, भाग्यवान्, पवित्रपणानें राहणारा, श्रीमंत, बुद्धिमान्, लोकप्रिय, समाजाचें काम करणारा, ईश्वरावर भरंवसा ठेवणारा, भक्तिमान्.

## मंगळ.

**मंगळाचें सामान्य स्वरूप**—हा दुष्ट ग्रह आहे. स्वरूप उग्र व दृष्टि क्रूर. तरुण, पित्तप्रकृति, चंचल, अंगांत रक्त अधिक, क्षात्रियवर्ण, बलवान्, तमोगुणी, लाल पदार्थांचा व दक्षिण दिशेचा मालक. मंगळाचें स्थान—अग्नि. वस्त्र—जळालेलें. धातु—सोनें, चांदी. देवता—कार्तवीर्य. सदा पराक्रम करणारा, बलवान्, शिपाई, अधिकारीवर्ग, इंजीनिअरिंग, गणिती, वगैरे.

१ **अश्विनी** नक्षत्रावर मंगळ असल्यास—राजपूजित, चपळ वागणूक, अहंपणा, उत्साही, शरीराचा रंग लाल, पिंगट केंस व डोळे, उष्णप्रकृति, शिरोभाग गरम, करारी बाण्याचा, महत्त्वाकांक्षी, अंमलदार, कसल्याहि प्रसंगास न डगमगणारा, धैर्यवान्, संकटास न जुमानणारा, गणिती, अधिकारी, दरारा बसविणारा.

२ **भरणी**—महत्त्वाकांक्षी, दुसऱ्याच्या मतानें चालणारा, प्रसंगास जसें साधेल त्याप्रमाणें बोलून मोकळा होणारा, गर्व अधिकारीवर्गाप्रमाणें करणारा, स्वार्थी, राग आणणारा व स्वतः रागवणारा.

३ **कृत्तिका**—उष्णप्रकृति, दंतविकारी, भांडखोर, चिडखोर, झगडे-तंटे करणारा, डॉक्टरी विद्येला योग्य, ऑपरेशनचें काम उत्तम करणारा, वरचेवर अपघात पावणारा, निर्भीडतेनें बोलणारा, बेपर्वा, उष्णप्रकृतीचा.

४ **रोहिणी**—विषयी, भोगी, संपत्तिवान्, शरीरसौंदर्य उत्तम, मर्दानी वळण, अंगीं मीपणा, लोकांत प्रिय, चैनीच्या पदार्थांकडे वळणारा, विलासी, प्रेमामुळें झगडे-तंटे करणारा, नीटनेटका राहणारा.

५ **मृग**—शूर पण कुटिल, बुद्धि कमी, पोकळ विद्वत्तेला मान देणारा व अवडंबर माजविणारा, गर्विष्ठ पण शूर, स्वभाव कडक, शेती व सावकारी करणारा.

६ **आर्द्रा**—विद्वत्ता व बुद्धिमत्ता चांगली, कडक प्रकृतीचा, नियमित, दुसऱ्याला त्रास देणारा, गणित जाणणारा, प्रसन्न झाल्यास पुष्कळ मदत करणारा, व आपलें सर्वस्व खर्च करणारा.

७ **पुनर्वसु**—ग्रंथकार, कडक, बौद्धिक कामाची आवड बाळगणारा, कला जाणणारा, यांत्रिक कला जाणणारा, इंजीनिअर, ज्योतिषी, शास्त्रज्ञ.

८ **पुष्य**—जास्त सत्त्वगुणी, भिडस्त, भिडेमुळें आंगावर प्रसंग येणारा, कार्डीमोड करणारा, मोठ्यांची निंदा करणारा, गर्विष्ठ, आपल्याच ऐटींत राहणारा, स्त्रियांच्या बाबतींत वर्तन चांगलें नसणारा, स्त्रिया गोड बोलून फसतात.

९ **आश्लेषा**—स्वतःवर संकटें ओढून घेणारा, दुष्ट स्वभावाचा, घातपात करणारा, घरांतील वडील मंडळींस दुःख देणारा, आपल्या भाषणानें दुसऱ्यास दुखविणारा, सडेतोड भाषण करणारा व मित्रांशीं अबोला धरणारा, प्रत्येकाशीं शत्रुत्व ठेवणारा.

१० **मघा**—महत्त्वाकांक्षी, अधिकारी, सर्वांवर दरारा ठेवणारा, क्षमा कमी, ज्यास दया नाहीं असा, शत्रूचा पाडाव करणारा, शत्रूस शरण यावयास लावणारा, मोठा मानी, धाडसी, मोठ्या लोकांशीं स्नेह संपादन करणारा, लुच्चा.

११ **पूर्वा**—उद्योगी, द्रव्यसंपादन करणारा, व्यापारी दृष्टि ठेवणारा, उच्च वैभवाची इच्छा करणारा, कारखाने कायम करणारा, शरीरानें बळकट, पूर्वीं झालेल्या पराक्रमावर भरंवसा ठेवणारा व घमेंड मारणारा.

१२ **उत्तरा**—हें नक्षत्र मंगळास फारसें महत्त्वाचें नाहीं. खटपटी, पुढें पुढें करणारा.

१३ **हस्त**—कलाकुशल, महत्त्वाकांक्षी, सज्जन, लेखन कडक,

भाषणांत टीका करणारा, सभ्य वर्तन ठेवणारा, प्रत्येक कलेंत हात घालणारा, विद्याभिरुचि मध्यम.

१४ चित्रा—स्वभाव रागीट व उग्र, दुर्गुणी, कामी, अस्थिर बुद्धीचा, क्षणांत बदलणारा, अनेक प्रकारचे उद्योगधंदे करणारा, कृतीपेक्षां भाषण जास्त.

१५ स्वाती—शक्य तों तडजोडीनें वागणारा, गणिती, विद्वान्, लोकप्रिय, भाषणानें लोकांवर छाप बसविणारा, इंजीनिअर, मागचा-पुढचा विचार करणारा व त्या अनुसंधानानें वागणारा.

१६ विशाखा—घातपात करणारा, विषारी द्रंव्याचा व्यवहार व उपयोग करणारा, प्रकृति रोगट, रोग झाल्यास लवकर नीट न होणें, अपघात व वारंवार संकटें भोगणारा व संकटांतून निभावून पुढें मार्ग शोधून काढणारा.

१७ अनुराधा—विलासी, सौंदर्यवान्, डॉक्टरीस योग्य, कामेच्छा जबर असते; बाहेरख्यालीपणा जास्त व त्यायोगें अपकीर्ति, आणि रोगहि जडण्याचा संभव असतो. इतर गुण चांगले असतात. लोकांच्या पुष्कळ उपयोगीं पडणारा, दयाळू, मोठेपणा प्राप्त करून घेणारा, विचारवंत.

१८ ज्येष्ठा—विद्या कमी, घातकी, अविचारी, अंतर्गळ व उपदंशासारखे आजार होतात. बोलण्यांत फटकळ व सूड उगविणारा, खुनशीपणानें वागणारा. हें नक्षत्र षष्ठस्थानीं असल्यास खात्रीनें रोगी व अपघातहि होतो.

१९ मूळ—साहसी, महत्त्वाकांक्षी, राजकीय उलाढाली करणारा, प्रकृति उष्ण, अग्निभय, ऑपरेशन करण्याची पाळी, शस्त्राचे आघात होणें, भाजणें, मोठें साहसकर्म करणारा, दीर्घोद्योगी, पाणदार, शक्तीची घमेंड बाळगणारा, काटक, कोणाचीहि पर्वा न करणारा,

निर्भीडपणें भाषण करणारा, अपघातानें हाडें मोडून घेण्याचा प्रसंग येणें.

२० पूर्वाषाढा—विद्या-बुद्धि मध्यम, मल्ल, लष्करी शिपाई अथवा त्यांचा अधिकारी, करारी बाण्याचा व गर्विष्ठ, ऐश्वर्य भोगणारा, व्यवस्थित राहणारा.

२१ उत्तराषाढा—मध्यम स्थितींत राहणारा, मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारा, कारागीर पण ओबडधोबड कामें करणारा.

२२ श्रवण—कर्ता पुरुष, प्रामाणिक, मानमान्यता पावणारा, संपत्ति मिळविणारा, दुसऱ्यांच्या उपयोगीं पडणारा, आचार-विचारांना विशेष महत्त्व न देणारा, व्यवहारांत योग्य रीतीनें चालणारा, समयसूचकतेनें वागणारा, विचारवंत.

२३ धनिष्ठा—मनोराज्य करणारा, श्रीमंतीची अतिशय हांव बाळगणारा, उधळ्या, अनाठायीं खर्च करणारा, अविचारी, खादाड, निर्दय, विचारशून्य, विद्या कमी, मनांतील हेतु कोणास न सांगणारा, वरून छानछोकी करणारा, बिकट परिस्थितींत सांपडणारा व त्यांत दिवाळेंहि काढणारा.

२४ शततारका—विद्वान्, बुद्धिमान्, विद्येची रुचि जास्त, शहाणा म्हणविणारा, शास्त्रीय अभ्यास करणारा व दुसऱ्यावर बोलून छाप बसविणारा. हें नक्षत्र मध्यम आहे.

२५ पूर्वाभाद्रपदा—श्रीमंत, गुणी, विद्याभ्यासंगी, गणिती, इंजीनिअर, कला-कुशल, रंगाच्या माहितीसंबंधीं शोध लावणारा, नानातऱ्हेचे धंदे करणारा.

२६ उत्तराभाद्रपदा—अधीर, बुद्धि साधारण, शांत, नानातऱ्हेचे उपभोग भोगण्याची इच्छा करणारा, मध्यमवर्गात राहणारा.

२७ रेवती—बुद्धिमान्, सुखी, ऐश्वर्य भोगणारा, आपल्या कुलांत

धांव काढणारा, उतावळा, बडबड्या, जलद काम करणारा, कुटुंबांत श्रेष्ठत्व पावणारा, विचारानें काम करणारा, मागचापुढचा विचार करणारा, सहनशील.

## बुध.

१ **बुधाचें सामान्य स्वरूप**—विद्यार्थी, कारकुनीपेशा करणारा, वर्तमानकार, देवघेवी करणारा, ज्योतिषी; बंधुसुख, मातुलसुख; शांत, कायदेपंडित, हिरवट रंगाचा, रजोगुणी, उत्तर दिशेचा मालक, दस्तऐवज करणारा. हा नपुंसक ग्रह आहे. हा ज्या ग्रहाच्या संगतीनें असेल त्याप्रमाणें गुणधर्म उत्पन्न करणारा आहे. स्त्रियांच्या ठिकाणीं प्रेम करणारा, वक्ता, वगैरे.

१ **अश्विनी**—लेखक, ग्रंथकार, शोधक दृष्टीनें पाहणारा, विद्वान्, जमाखर्च लिहिणारा, कारभारी व पुढारी, हुंडीचिठ्ठी लिहिणारा व त्यापासून फायदा करून घेणारा, समयसूचकता चांगली, व्यवहारांत लाभ करून घेणारा.

२ **भरणी**—थोडक्यांत समाधान मानणारा, राजस वृत्तीचा, समयसूचकतेनें वागणारा, वेळ-प्रसंगानुसार वाटेल तें बोलून आपलें काम करून घेणारा, विद्या थोडी, भोळसर, मनोराज्य करणारा, क्षणिक बुद्धीचा.

३ **कृत्तिका**—टीकाकार, बोलणें व लिहिणें तामसी, कठोर भाषणी, तुसड्या स्वभावाचा; दांतांतून रक्त निघणें, त्वचारोग; लहरी, फारच खोल व कठोरपणाचे विचार असतात.

४ **रोहिणी**—प्रेमी, कुटुंबांतील मुलांवर प्रेम करणारा, संसारांत दक्षतेनें वागणारा, विद्वत्तेस योग्य, प्रिय भाषण करणारा, शरीर-सौंदर्य चांगलें, सात्त्विक विचाराचा, कुटुंबांतील सर्व मंडळींची

खबरदारी व काळजी घेणारा, सालस. ह्या नक्षत्रीं स्त्रिया फारच सौंदर्यवान् व मधुरभाषणी, भाषणानें दुसऱ्यास मोहून टाकणाऱ्या, व चाणाक्ष असतात.

५ **मृग**—विद्या व बुद्धि कमी, भटकणारा, विनाकारण आपला वेळ खर्च करणारा, गर्विष्ठ, कारकून—जमाखर्च लिहिणारा, पातळ पदार्थांचा व्यापारी ( सरबतें, खाणावळ, चहा, वगैरे ).

६ **आर्द्रा**—वक्ता, बुद्धि चांगली, विद्वान्, भाषणांत कडकपणा, स्पष्टवक्ता, जशास तसें भाषण करणारा, वेळेची आंखणी करून त्याबरहुकूम वागणारा.

७ **पुनर्वसु**—कवित्व करणारा, कोमलतेनें गाणारा, गवई, ग्रंथकार, विद्या व बुद्धि चांगली, विचार खोल व उत्तम, शास्त्री, पुराणिक, हरिदास, कीर्तन करणारा, खजिनदार, बौद्धिक कामें करणारा, नीतिमान्, सात्त्विक रीतीनें वागणारा व तत्त्वज्ञानी.

८ **पुष्य**—भक्ति करणारा, देवावर भरंवसा ठेवणारा, वकील, कायदेपंडित, मोठ्या लोकांवर वजन ठेवणारा, मानी, समाजावर आपलें वजन योग्य रीतीनें ठेवणारा, ढोंगी, विद्वानांचा द्वेषी व त्यांच्यावर टीका करणारा, त्यांच्या डोळ्यांत अंजन घालणारा, कानउघाडणी करणारा.

९ **आश्लेषा**—खोटें भाषण करणारा, नकल्या व बनावट कृत्यें करणारा, बोलण्यांत डावपेंचीपणा जास्त, साधें भाषण न करणारा, भाषण रंगविणारा, शत्रुत्व उत्पन्न करून घेणारा, संकटांत पडणारा.

१० **मघा**—धीटपणानें भाषण करणारा, अंमलदार, अधिकारी, प्रज्ञावान्, सज्जन, गणिती, हिशेब ठेवणारा, कल्पक-बुद्धीचा, योग्य प्रसंगीं योग्य बोलून आपलें वर्चस्व कायम करणारा, पुष्कळ विचार योग्य वेळेवर मांडणारा.

११ **पूर्वा**—स्वार्थी, दुकानदार, विद्या व बुद्धि साधारण, विद्वान्, श्रीमंतीची इच्छा करणारा, प्रत्येक गोष्टींत काटकसर करणारा.

१२ **उत्तरा**—साधारण बुद्धीचा, मानी, मध्यम प्रतीचा व मध्यम प्रतींत राहून दिवस काढणारा.

१३ **हस्त**—ऐश्वर्यसंपन्न, धनिक, भाग्यास चढणारा, प्रत्येक कला जाणण्याची इच्छा करणारा, अपुरें काम न ठेवणारा, कला-कुशल—निपुण, हास्यमुखी मधुर-भाषणी.

१४ **चित्रा**—विनोदी, खुषमस्कऱ्या, हजरजबाबी, आळशी, दुर्गुणी, गालिच्छ कपडे वापरणारा, बाहेरख्याली करणारा, अघळ-पघळ गप्पा झोडणारा.

१५ **स्वाती**—ईश्वरभक्ति करणारा, शांत बुद्धीचा, न्यायी, समतोलपणानें वागणारा, तडजोडीकडे जास्त लक्ष्य ठेवणारा, साधुसंतांची सेवा करणारा, प्रत्येक मनुष्याचें यथायोग्य आदरातिथ्य करणारा, सज्जन.

१६ **विशाखा**—बुद्धिहीन, विचार चांगले न ठेवणारा, द्वेषानें भाषण करणारा, कुमार्गी, कायद्याचा दुरुपयोग व भलतासलता अर्थ करून स्वार्थ साधण्याची इच्छा करणारा, दुसऱ्याचें वाईट करण्याची इच्छा जास्त.

१७ **अनुराधा**—संगनमत करणारा, एकीनें आपलें काम साध-णारा, वैद्य, औषधी क्रिया जाणणारा, धूर्त, विचारानें बोलणारा.

१८ **ज्येष्ठा**—हट्टी स्वभावाचा, गुप्त खलबतें करणारा, विचारा-विरुद्ध, विचार गुप्त ठेवणारा, लहरी, सुडाची इच्छा करणारा, मनांतून द्वेष करणारा.

१९ **मूळ**—साहसी, दीर्घ प्रयत्न करणारा, उच्च ध्येयाचा, जमाखर्च ठेवणारा, व्यापारांत मन घालणारा, डोकेबाज व

सावकाश भाग्य उदयास आणणारा, दैववान् व मितभाषणी ह्याचा प्रत्येक विचार उच्च कल्पनेनें भरलेला असतो. दुसऱ्यावर दया करणारा, धैर्यवान्, साहसी व तेजस्वी.

२० **पूर्वाषाढा**—धनवान्, द्रव्य शिल्लक ठेवणारा, ऐश्वर्यवान्, विद्या मध्यम, मोठ्या मंडळींत वागणारा, विचारवंत, दुसऱ्यावर अधिकार चालविणारा, काटकसर करणारा.

२१ **उत्तराषाढा**—विद्या अल्प, प्रयत्नाला यश कमी, प्रयत्नवादी, सारखा प्रयत्न करण्याचे विचार करणारा, उशीरां भाग्योदय पावणारा, साधारण कल्पनेचा, मध्यम प्रतींत राहणारा.

२२ **श्रवण**—सच्छील वर्तनाचा, शास्त्री, देव व साधुसंतांची भक्ति करणारा, परोपकारी, सत्कर्म करणारा, कर्मठ, उत्तम विचारांनीं युक्त, सारासार विचार करणारा.

२३ **धनिष्ठा**—मानसिक दुःख करणारा, व्यसनी, धन-संपत्ति स्वतःच्या चैनींत खर्च करणारा, विद्या कमी, निर्दय, उपकार न करणारा, स्वतःपुरतें पाहणारा.

२४ **शततारका**—कायदेपंडित, दुसऱ्याच्या उपयोगीं न पडणारा, स्वतःचा मानमरातब कसा राहील तें पाहणारा, जास्त वर्णन करणारा.

२५ **पूर्वाभाद्रपदा**—कल्पक बुद्धीचा, शोधक, विद्याभ्यासंगी, परोपकारी, सारासार-विचार करणारा, योग्य विचारानें राहणारा, समाजप्रिय.

२६ **उत्तराभाद्रपदा**—अधीर बुद्धीचा, उतावळा, विद्या व बुद्धि मध्यम, थोडासा परोपकार करावा या हेतूनें वागणारा.

२७ **रेवती**—सुखी, धनवान्, लेखक, बुद्धिमान्, वक्ता, ग्रंथकार,

भाषांतर करणारा, कायदे जाणणारा, ऐश्वर्य भोगणारा, विलासी, चैनींत वेळ घालविणारा, रेखीव भाषण करणारा.

## गुरु.

**गुरूचें सामान्य स्वरूप**—संतति, ज्ञान, संपत्ति, राज्यपद, वेदान्त, सुखी, धर्मशील, ऐश्वर्य भोगणारा, लोककल्याणाचीं कामें करणारा, सदा शुभदायक, हत्ती-घोडे व दास-दासी बाळगणारा, तीर्थ-यात्रा करणारा, समाजांत वजनदार गणला जाणारा; न्यायी व सत्त्वगुणी. गुरु हा ईशान्य दिशेचा मालक आहे.

१ **अश्विनी**—नामांकित, सुप्रसिद्ध माणूस, प्रामाणिकपणानें वागणारा, नीतिमान्, लेखक, ग्रंथकार, भाषांतर करणारा, विद्येचें पुनर्जीवन करणारा, विद्वान्, कर्ता, पुढारी, लोकांना मार्गदर्शक, धर्मशास्त्र जाणणारा, भीतीपासून मुक्त करणारा, उदार, धर्म-कृत्यें करणारा.

२ **भरणी**—संततिवान्, सुख भोगण्याची इच्छा करणारा, व्यवहारांत भारदस्तपणानें वागणारा व विद्वान्.

३ **कृत्तिका**—मोठ्या लोकांचा द्वेष करणारा, विद्वत्ता दाख-विणारा, द्रव्याचा व्यय—धर्मकृत्यांत खर्च करणारा, कडक लेख लिहिणारा, निर्भीड बोलणारा, विद्वानांशीं द्वेष करणारा.

४ **रोहिणी**—सात्त्विक व शांत, गुणी, सुंदर, ऐश्वर्य भोगणारा, विलासी, बुद्धिमान्, सालस, प्रेमी, लोकप्रिय, विद्वत्तेनें सर्व लोकांस वश करून घेणारा, उच्च ध्येयाचा, जें ऐश्वर्य मनांत आलें तें भोग-ण्याची इच्छा करणारा, धनसंचयी, स्त्रीप्रिय.

५ **मृग**—बुद्धि कमी, प्रथम सात्त्विक विचार येऊन लगेच तामसी वृत्तीवर येणारा, प्रसंग साधारण जाणणारा, द्वेषी.

६ आर्द्रा–बुद्धि मध्यम, द्वेष न करणारा, विचारी व दुसऱ्याला विचारून कामें करणारा.

७ पुनर्वसु–बुद्धि चांगली, विचार पोक्त, बौद्धिक कामें करणारा, कवि, समतेनें वागणारा, भाग्यवान्.

८ पुष्य–गुरु-पुष्ययोग हा सर्व प्रसिद्ध व अति उत्तम योग आहे. विद्या-बुद्धि चांगली, सुख भोगणारा, धन-संचय करणारा, दास-दासी बाळगणारा, व्यवहारास योग्य.

९ आश्लेषा–द्वेषी, आंतल्या गांठीचा, विद्या व बुद्धि मध्यम, धूर्त, समयानुरूप बोलून वेळ मारून नेणारा.

१० मघा–महत्त्वाकांक्षी, विद्या चांगली, बुद्धिमान्, ऐश्वर्य भोगणारा, मोठ्यांची मैत्री संपादन करणारा, व्यवहार-चातुर्य दाखविणारा, कर्ता पुरुष, धूर्त व विचारपूर्वक कामें करणारा, नांवलौकिकास येणारा, प्रसिद्ध पुरुष.

११ पूर्वा–धनाढ्य, मुनीम, द्रव्यावारी रखवालदारी, जबाबदारीनें व्यापार चालविणारा, श्रीमंतीस योग्य, कर्ता पुरुष, धर्म-श्रद्धा चांगली.

१२ उत्तरा–मध्यम वर्गांत सभ्यतेनें दिवस काढणारा, मानी, गर्विष्ठ, आपल्यापुरतें पाहणारा, मध्यम स्थितींत राहणारा, हलगर्जीपणानें वागणारा.

१३ हस्त–सुखी, ऐश्वर्याची इच्छा करणारा, जेवढें प्राप्त होईल तेवढें हस्तगत करून घेणारा, कलाकुशल, विलासी.

१४ चित्रा–अस्थिर बुद्धीचा, विद्वत्तेची नुसती इच्छा करणारा, एक विचार कायम न ठेवणारा, विचित्र स्वभावाचा, लहरी, आळशी, क्रूर, अविचारी.

१५ स्वाती–नीतिमान्, ईश्वरभक्ति करणारा, तडजोडीनें वाग-

णारा, समान विचारानें कामें करणारा; शरीर लांबट व पाणीदार, दिसण्यांत उत्तम, शास्त्रज्ञ, वाचनप्रिय.

१६ **विशाखा**—दुसऱ्याचें उणें पाहणारा, टीका करणारा, द्वेषाग्नि पसरविणारा, मैत्रींत मोडा घालण्याचें—लावालावीचें (चहाडीचें) काम करणारा, स्वतःची काळजी न बाळगणारा, विचारशून्य, कारणापुरती ओळख ठेवणारा.

१७ **अनुराधा**—सात्त्विक प्रेमाचा, आपल्यापेक्षांहि जास्त योग्यतेच्या स्त्रीची आवड धरणारा, प्रिय भाषणी, तात्त्विक विचाराचा, प्रेमाच्या गोष्टी सांगणारा, ज्यांत सात्त्विकपणा जास्त असे पूजापाठ वगैरे करणारा, सुखी, मनोराज्य करण्याची संवय जास्त असा.

१८ **ज्येष्ठा**—हलक्या मनाचा, परंतु वरून सभ्यपणानें भाषण करणारा, बुद्धि तीव्र, भाषण जोरदार, विचार अघळपघळ मांडणारा, धनसंचय करणारा, कष्ट भोगणारा, कठोर शब्दांनीं उत्तर देणारा.

१९ **मूळ**—उच्च पद पावणारा, कर्ता पुरुष म्हणविणारा, स्वतःच्या बलावर उदयास येणारा, अधिकार गाजविणारा, जोखमीचीं कामें आंगावर घेऊन तीं पार पाडणारा, साहसी, मंडळींत आपल्या भाषणाचें वजन राखणारा, सौख्य भोगणारा, मोठ्या लोकांच्या सहवासांत रात्रंदिवस असणारा, व्यापारांत कुशल, द्रव्य शिल्लक ठेवणारा, सत्कार्यावर द्रव्य खर्च करणारा, विचारशील.

२० **पूर्वाषाढा**—विद्या-बुद्धि चांगली, राजाश्रयाला राहणारा, विद्याव्यासंगी, संपत्तिमान्, विद्वान्, सुखी.

२१ **उत्तराषाढा**—मध्यम लोकांत दिवस काढणारा, विद्या-बुद्धि मध्यम, आपलें घर सांभाळून चालणारा, सात्त्विक विचारानें वागणारा, दुसऱ्याचें मत घेऊन काम करणारा.

२२ श्रवण—ईश्वरभक्ति करणारा, जपजाप्यावर विश्वास ठेवणारा, सदाचारसंपन्न, विद्वान्, शास्त्री, पुराणिक, व्यवहारांत योग्य वर्तनानें वागणारा, सात्त्विक गुणांनीं राहणारा, सुखी, विचारानें कामें करणारा, पोक्त—विचारी, समाजांत वजन ठेवणारा, बौद्धिक कार्याकडे लक्ष, ऐश्वर्य भोगणारा, दूरचे प्रवास करणारा, दुसऱ्या देशीं नांवलौकिकास येणारा व आपलें नांव मागें ठेवणारा, निःस्पृह रीतीनें वागणारा.

२३ धनिष्ठा—साहसी, दुसऱ्याचें नुकसान करणारा, वाईट संगतीनें दुर्गुण शिकणारा, दुसऱ्याच्या मतानें वागणारा, हट्टी, वरून गोड बोलून गळा कापणारा, अविश्वासू, दुराग्रही, स्वार्थी, स्वतःच्या हितासाठीं दुसऱ्याचें नुकसान करणारा, द्रव्याच्या उलाढाली करणारा, सट्टे करणारा, मागचा-पुढचा विचार कमी असा.

२४ शततारका—गुणी, विद्या-बुद्धि कमी, मध्यम वर्गांत राहणारा, खटपटी, खबरदारी ठेवणारा, कष्टाळू, पुष्कळ गुण अवगत करणारा, परंतु त्या गुणांचा समाजास कांहीं उपयोग नाहीं असा. लहरी स्वभावाचा.

२५ पूर्वाभाद्रपदा—कल्पकबुद्धीचा, विद्याभ्यासंगी, शोधक-दृष्टीनें पाहणारा, बौद्धिक कामांत प्रगति चांगली मिळविणारा, सार्वजनिक काम करणारा, समयसूचकतेनें वागणारा, न्यायी व शास्त्रीय अभिरुचि जास्त बाळगणारा, पापास भिणारा, सर्वांचें हित करणारा, द्रव्य संपादन करणारा, सुखी, सुख भोगणारा, विचारवंत, कुटुंबांत वडील म्हणविणारा.

२६ उत्तराभाद्रपदा—उतावळा, धनवान्, सुखी, अधीर स्वभावाचा, बडबड्या, बोलण्यांत घाई करणारा, आपलें काम गडबडीनें करून घेणारा, स्वार्थी.

२७ **रेवती**—विद्वान्, सज्जन, सुखी, ऐश्वर्य भोगणारा, न्याय जाणणारा, सारासार विचार करणारा, शोधक दृष्टीनें पाहणारा, अधिकारी, राजपूज्य, सर्वांचा सांभाळ करणारा, जबाबदारी घेणारा, धनसंचयी.

## शुक्र.

**शुक्राचें सामान्य स्वरूप**—विलासी, उत्तम कांति, सुंदर, शृंगाराची हौस बाळगणारा, यांत्रिक-विद्याभ्यासंगी, चित्रकला जाणणारा, नाटक-सिनेमा इ. चा हौशी, छानछोकीनें वागणारा, तरुण व तरुण स्त्रियांची आणि विवाहसुखाची आवड असलेला, कवि, नाटककार व मोहकपणाचीं कामें करणारा. अग्नेय दिशेचा मालक व रजोगुणी.

१ **अश्विनी**—प्रवासी, विद्वान्, बुद्धिमान्, महत्त्वाकांक्षी, कला जाणणारा, विनोदी, नाटककार, कवि, इंजीनिअर, कुशलतेनें कामें करणारा, सुंदर, हास्यमुख, आनंदी, सुख भोगणारा, ग्रंथांचीं भाषांतरें करणारा व नवीन ग्रंथ रचणारा, कादंबरीकार, विचारशील, सर्वांस प्रिय.

२ **भरणी**—विषयी, स्त्रीलोलुप, स्त्रियांचें ऐकणारा, विद्या मध्यम, नेभळट विचाराचा, ' होस हो ' म्हणणारा, रंगेल, स्त्रियांत गप्पा मारणारा, बाहेरख्यालीपणांत वेळ घालविणारा, सुखी, द्रव्य मिळविण्याची खटपट करणारा.

३ **कृत्तिका**—दंतविकारी, प्रेमांत भंग पावणारा, कुटुंबांत बे-बनाव, स्त्रीशीं न पटणारा, क्वचित् द्विभार्या-योगाचा, कामवासना जबर व विषयलंपट. स्त्री असल्यास स्वभाव कडक, फटकळ बोल-णारी व नवऱ्याची पर्वा न करणारी. रसायनाचे व्यवहार करणारा,

डॉक्टर, धोबी, रंगारी, ड्रायव्हर, कॉंपाऊंडर इ. नेहमीं ज्यांचा रसायनांशीं संबंध येतो अशा लोकांना हें ठीक नाहीं.

४ **रोहिणी**—गौरवर्ण, शांत, सत्त्वगुणी, बुद्धिमान्, सुंदर व स्त्रीप्रिय, विलासी, ऐश्वर्य भोगणारा, शरीरसौंदर्य उत्तम, मोहक, प्रिय भाषणी, दंतपंक्ति उत्तम, सर्व तऱ्हेचे भोग भोगणारा, धन-संचय करणारा. स्त्रियांना वरील योग सौंदर्यास उत्तम व गाणारी, विलासी, पतीला वश करण्याचा गुण उत्तम व भाग्यशाली.

५ **मृग**—विद्या-बुद्धि कमी, रागीट, चाणाक्ष, समयसूचकता चांगली, स्त्रियांच्या बाबतींत दृष्टि कडक व रोखठोकपणा, दया करणारा. स्त्रियांच्या संबंधांत वरील योग वाईट ठिकाणीं झाल्यास त्या व्यभिचारी निघतात.

६ **आर्द्रा**—विद्वत्ता चांगली असते. स्वभाव कडक, भाषण कडक व स्पष्ट, बहुगुणी, पुष्कळ व्यवसाय करणारा, द्विभार्या. स्त्रियांना हा योग असल्यास—भाषण सडेतोड व अघळपघळ बोलण्याची संवय, व्यवस्थितपणानें राहणारी व प्रेमभंगाचे प्रसंग येणारी.

७ **पुनर्वसु**—कवि, ग्रंथकार, गाणारा, बौद्धिक कामें करणारा, नीतीनें वागणारा, सात्त्विक स्वभावाचा, नाटकांतील पार्टी, कला जाणणारा, आपल्या भाषणाची दुसऱ्यावर छाप टाकणारा, फोटो-ग्राफी व सिनेमा यांचा धंदा करणारा. स्त्रियांस हा योग असल्यास आपल्या भाषणानें दुसऱ्यास मोह पाडणाऱ्या, व्यवस्थित राहणाऱ्या व विचारानें काम करणाऱ्या.

८ **पुष्य**—ईश्वरभक्ति, दयाळू, लोकांचें कल्याण करणारा, धनाढ्य, ऐश्वर्यसंपन्न, सुखी, नीतीनें चालणारा, कायदा जाणणारा, योगाभ्यासी, द्विभार्या-योगाचा. स्त्रियांस हा योग असल्यास पतीवर

जास्त प्रेम ठेवणारी, सेवाचाकरींत तत्पर राहणारी, पूजापाठ करण्यांत गुंतलेली, विचारशील, भक्तिमान् व न्यायी.

९ **आश्लेषा**—आंतल्या गांठीचा, गुप्त मसलती, रागीट, धूर्त, प्रेमामुळें घातपात करणारा, अल्पबुद्धीचा, बहुभार्या करणारा, स्त्रीबाज, आपली चलाखी दाखविणारा, व्यसनी, विषयासक्त, स्त्रियांशीं कठोर वर्तन ठेवणारा. स्त्रियांना हा योग असल्यास आंतून विचार एक व बाहेरून दाखविणें निराळें, भाषणांत डावपेंच, दुर्गुणी, पर्वा न ठेवणारी, दक्षतेनें दुसऱ्यावर छाप बसविणारी, खोटी धमकी देणारी, अविचारी, वाईट वर्तनाची.

१० **मघा**—सुखी, साहसी, महत्त्वाकांक्षी; हुकमत चालविणारा, दरारा ठेवणारा, उच्च योग्यतेस चढणारा, विचारशील, स्त्रियांवर वाईट नजर ठेवणारा, त्यांच्या पाळतीवर असणारा, मागचा-पुढचा विचार न करणारा. स्त्रियांना हा योग असल्यास साहस व कष्टाळूपणा अधिक, घरांतील कामें करणारी, दगदग सोसणारी, नवऱ्याची पर्वा न करणारी, त्याला मुठींत ठेवणारी, सर्व अधिकार चालविणारी.

११ **पूर्वा**—विद्या-बुद्धि चांगली, नीटनेटका, व्यवस्थितपणानें राहणारा, सुंदर, फॅन्सी व देखण्या वस्तूंचा संग्रह करणारा, मोतीं व जवाहीर यांचा व्यापारी, इनामदार, ऐश्वर्यवान्, मंडळींत मानमान्यता चांगली, कलाकुशल, चैनींत वेळ घालविणारा. स्त्रियांना हा योग असल्यास सुस्वरूप, दागदागिन्यांची हौस व छानछोकीनें राहणें, सुखांत काळ घालविणें व पतीची सेवा करणें.

१२ **उत्तरा**—सुखी, देवाची भक्ति करणारा, शांत स्वभावाचा, कलाकुशल, विचारशील, पालन करणारा, सर्व कामांत दक्षता ठेवणारा, गुणी, मानी व समतेनें वागणारा.

१३ **हस्त**—विलासी, गुणवान्, भाषाशैली उत्तम, विनोदी,

शरीरसौंदर्य चांगलें, ऐश्वर्य भोगणारा, गरिबांचा वाली, दयाळू, दुसऱ्यावर प्रेम करणारा, सुखी.

१४ **चित्रा**—तापट स्वभावाचा, स्त्रियांसंबंधीं वाईट विचार मनांत आणणारा, बाहेरख्यालीपणांत पैसा खर्च करणारा, अस्थिर बुद्धीचा, विचार न करणारा, भाषण बदलणारा, वेडेंवांकडें लिहिणारा, मध्यम वर्गांत राहणारा.

१५ **स्वाती**—नीतिमान्, सुखी, युक्तिबाज, समतेनें वागणारा, गुणज्ञ, इंजीनिअर, नवीन शोध लावण्याची खटपट करणारा, ईश्वरावर भरंवसा ठेवणारा, बौद्धिक कार्यांत पडणारा. स्त्रियांस हा योग असल्यास गुण-ग्राहक, गृहकृत्यांत दक्ष, सुखी, रूपसंपन्न वगैरे.

१७ **विशाखा**—क्षणिक सुखाला भुलणारा, अविचारी, विषयवासना अधिक, बेफिकीरपणानें वर्तन ठेवणारा, वाईट वासनेचा. स्त्रियांना हा योग असल्यास—वाईट मार्गाला लागणाऱ्या किंवा दुसऱ्यास कुमार्गास लावणाऱ्या, वडिलांची पर्वा न करणाऱ्या व बेगुमानपणें-स्वच्छंदानें वागणाऱ्या, विषयी.

१७ **अनुराधा**—कलाकुशल, विद्या-बुद्धि चांगली, प्रेमी, बाहेरख्यालीपणा जास्त, विषयासक्त, राख राखणारा अथवा दोन तीन स्त्रिया करणारा, विलासाची आवड जास्त, मोहित होणारा, धन शिल्लक न ठेवणारा, उधळ्या. स्त्रियांना हा योग ठीक नाहीं. व्यभिचार घडतो किंवा दुसऱ्याचा हात धरून जाते, मान-अपमान याचा विचार राहत नाहीं. बाकी इतर गुण ठीक असतात.

१८ **ज्येष्ठा**—विरोधी, प्रेमांत भंग, पतिपत्नी-विरोध, वारंवार अबोला, हट्टी स्वभाव, खुनशीपणा, विचार कमी, गुह्यविकार, द्विभार्या-योग, मित्रत्वांत विरोध उत्पन्न करणारे, मर्यादा न ठेवणारे.

१९ मूळ—साहसी, रागीट, हट्टी, महत्त्वाकांक्षी, राजकीय उलाढाली करणारा, राजाश्रयाला राहणारा, यांत्रिक कला जाणणारा, ड्रायव्हर, जोडकामें ( मेकॅनिकल ) करणारा, विचारी, शरीर बांधेसूद व उत्तम. स्त्रियांना हा योग असल्यास कलाकुशल, शिवणकाम, कशिदा व इतर कामें उत्तम करणाऱ्या, निर्भीड वर्तनाच्या, स्पष्टवक्त्या.

२० **पूर्वाषाढा**—धन संपादन करणारा, सुखी, विद्या-बुद्धि साधारण, व्यापारी-वर्गाला जास्त आवडणारा, समयसूचकतेनें वागणारा, जशास तसें वर्तन ठेवणारा, विचारी.

२१ **उत्तराषाढा**—विद्या व बुद्धि मध्यम, संसारापुरतें बघणारा, आपमतलबी, स्वतःपुरतें पाहणारा. स्त्रियांना हा योग असल्यास घरगुती कामापुरतें ज्ञान चांगलें असतें. बाहेरच्या गोष्टींकडे लक्ष देत नाहींत. स्वतःस हुशार म्हणविणाऱ्या व विचारानें वागणाऱ्या.

२२ **श्रवण**—सच्छील वर्तनाचा, विद्वान्, शास्त्री, वैदिक, कर्ता, आपलें नांव वाढविणारा, कुलदीपक, जपजाप्य करणारा, सर्वांस आवडणारा, सदाचारी, अघळपघळ भाषण करणारा, दुसऱ्यावर दरारा ठेवणारा, विचारी. स्त्रियांना हें नक्षत्र उत्तम आहे.

२३ **धनिष्ठा**—आंतल्या गांठीचा, अतिप्रसंगी, निर्दय, अविचारानें कामें करणारा, विषयासक्त, परदार-रत, व्यभिचाराकडे प्रवृत्ति जास्त, वरकांतीं सभ्यता दाखविणारा किंवा पैशाच्या जोरावर गर्व करणारा, काम निघेपर्यंत ‘होय होय’ करणारा व पुढें एकदम बदलणारा. ह्या योगावरील स्त्रियांचा स्वभाव विचित्र असतो. क्षणांत बदलतात व क्षणांत जमतें घेतात; अस्थिर बुद्धीच्या, अविचारी, बेगुमानपणानें राहणाऱ्या व स्वैरवर्तनी.

२४ **शततारका**—साधारण सभ्यपणानें वागणारा, कुटुंबांतील

मंडळीवर प्रेम करणारा, मध्यम वर्गांतून पुढें येण्याचा मार्ग काढणारा, शांत स्वभावी, वरचेवर खटके उडणारा, संकटाला तोंड देणारा, प्रिय भाषण करणारा.

२५ पूर्वाभाद्रपदा–कल्पक, विद्याव्यासंगी, शोधक दृष्टीनें पाहणारा, बौद्धिक कामांत लक्ष्य घालणारा, कीर्ति संपादन करणारा; कवि, विद्वान्, प्रसंगीं विनोद करणारा, ग्रंथकार. ह्या योगावरील स्त्रियांना घरांतील वळण चांगलें असतें; विचारी, उपदेशी, पूजापाठ व नीतीनें राहणाऱ्या, आनंदी स्वभावाच्या, बोध सांगणाऱ्या व दैवावर भरंवसा ठेवणाऱ्या.

२६ उत्तराभाद्रपदा–चित्रकलेंत निपुण, कल्पक विचाराचा, सूक्ष्म दृष्टीनें पाहणारा, विचारपूर्वक कामें करणारा, किंचित् उतावळा स्वभाव, खाण्यापिण्याकडे लक्ष्य ठेवणारा, स्वतःच्या ऐषआरामांत आनंद मानणारा.

२७ रेवती–सुखी, विलासी, बुद्धिमान्, विद्वान्, ग्रंथकार, स्त्रियांच्या कपड्यालत्त्यांत सुधारणा–फॅशन्–करणारा, फॅन्सी वस्तु वापरण्यास लावणारा, प्रेममय भाषण करणारा, आपलें हित साधून घेणारा. हा योग स्त्रियांना मध्यम आहे. बहुधा ऐश्वर्य भोगण्याकडे त्यांचा कल असतो. इतकेंच नव्हे, तर कित्येक स्त्रियांना तर नट्टापट्टा करून राहण्याची संवय असते.

## शनि.

शनीचें सामान्य स्वरूप–आयुष्य, मृत्यु, दारिद्र्य, निर्दय, मत्सरी, द्वेषबुद्धि, कैदी, लोहार, छापखाने, रॉकेल, पेट्रोल, लोखंडाचा कारखाना; नीचपणाचीं कामें करणारा, फसव्या, विश्वासघातकी, आळशी, व्याधिग्रस्त, पीडित; दुःख देणारा, गुप्त कार्यें

करणारा, जुगारी, वगैरे. हा पश्चिम दिशेचा मालक असून तमोगुणी आहे.

१ **अश्विनी**—मंदबुद्धीचा, दुःख भोगणारा, बोलतांना अडखळणारा, विद्या मध्यम, कारकुनी करणारा, लेखक, मेहनती, मुलांबाळांचें सुख कमी, मध्यम प्रतींत दिवस घालविणारा.

२ **भरणी**—कठोर भाषण करणारा, विद्या-बुद्धि कमी, हालअपेष्टेंत दिवस घालविणारा, नांवलौकिक गमावून पुन्हां नांवलौकिकासाठीं झटणारा, आज्ञाधारक, भित्रा, अविचारी, विषयी—परदाररत.

३ **कृत्तिका**—रोगग्रस्त, नेहमीं कांहींतरी व्यथा असतेच. संकटें भोगणारा; उपदंशविकार अथवा शरीरावर आघात, जखमा वगैरे होणें; गळूं, नारू वगैरे दीर्घकालपर्यंत रक्तस्राव करणारे रोग होणें, विद्या मध्यम, खटपटी, उष्णप्रकृति, उपद्व्यापी, नाहीं त्या उलाढाली करणारा, निर्भीड.

४ **रोहिणी**—निरर्थक बडबड करणारा, लांबलचक भाषण करण्याची संवय, भाषणांत व्यंग, द्रव्य जमा करण्याची लालसा जास्त, हिळूनमिळून राहण्याची खटपट करणारा, देव-घेव करणारा, जें मिळेल त्यांतच सुख मानणारा, आप्तइष्टांना आवडणारा, आदरातिथ्य करणारा, कुटुंबाची काळजी घेणारा.

५ **मृग**—विद्या व बुद्धि कमी, वडिलांची कीर्ति गाणारा, स्वतः कार्यांत भाग घेणें नको, मेहनतहि नको, सुस्त; स्वतःचें नुकसान करून घेणारा, दुःखी, कुटिल, चहाडखोर, कपटी, द्रव्यासाठीं नीच कृत्यें करणारा, निष्ठुरपणाच्या कामांत पुढें.

६ **आर्द्रा**—चाणाक्ष, क्रूर, रागीट, कपटी, दुसऱ्याचें काम नीट करणारा, स्वतःच्या कामांत हलगर्जीपणा करणारा, 'लोकां सांगे

ब्रह्मज्ञान । आपण कोरडा पाषाण ' याप्रमाणें सर्व कृति, लवकर प्रसन्न होणारा, आपली स्तुति करणारा व ती ऐकण्यांत आनंद मानणारा.

७ **पुनर्वसु**–कवि, ग्रंथकार, विद्वान्, विद्या-बुद्धि चांगली, नीतीनें राहणारा, अघळ-पघळ गप्पा मारणारा, चेंगट स्वभावाचा, नादिष्ट, चिकाटीनें कामें करणारा, हातीं घेतलेलें काम शक्य तों पार पाडण्याची धडपड करणारा, विचारी, शांत व सावकाश आपलें काम पूर्ण करून घेणारा, खोल मनाचा, आपला हेतु लवकर न सांगणारा, मनांत डाव ठेवणारा, अपमान झाला तरी सहन करून गप्प बसणारा व प्रसंगोपात त्याचा बदला म्हणून योग्य रूपांत संभावना करणारा, विचारी, स्वतः चुकींत न सांपडणारा.

८ **पुष्य**–कायदेपंडित, निर्व्यसनी, भाषणचातुर्य दाखविणारा, साहसी, सहनशील, सात्त्विक विचाराचा, परोपकाराचीं कामें करणारा, धनसंचय करणारा, नीतिमान्, मानमरातब ठेवून घेणारा; निर्व्यसनी, स्वतःसाठीं कशाचीहि उपेक्षा न करणारा, सुख भोगणारा, कुटुंब-वत्सल गृहस्थ.

९ **आश्लेषा**–दुष्ट स्वभावाचा, कपटी, घातक-विचाराचा, मागचापुढचा विचार न करणारा, आंतल्या गांठीचा, गहन विचाराचा, चपळ कल्पनेचा, हुशार, मातेचा छळ करणारा; सावत्र, दत्तक अथवा सख्खीं कोणी असोत त्यांचा द्वेष करणारा, त्रासदायक, स्वतःपुरतें पाहणारा, भांडखोर, दुष्ट अंतःकरणाचा, सन्निध असलेलें द्रव्य खर्चीं घालणरा, निर्धन.

१० **मघा**–राजपूज्य, अंमलदार, निर्भीड वर्तनाचा, सडेतोड भाषण करणारा, न्याय व कायदा जाणणारा, न्यायी, जज्ज असल्यास न जुमानणारा, स्वइच्छेनें शिक्षा देणारा, स्वतंत्र विचाराचा, चिकाटीनें काम तडीस नेणारा, मोठमोठ्या प्रसंगीं पुढें होणारा,

क्वचित् आत्मघातकी बनणारा, स्वतास शत्रू अधिक, दक्षतेनें काम करूनहि अपयश घेणारा, कुटुंबांत दरारा ठेवणारा, पराक्रमी, शत्रूस जिंकणारा, वेळेवर युक्ति काढणारा, समाजावर व सर्वांवर दरारा ठेवणारा; विचारी, कर्ता पुरुष वगैरे म्हणविणारा. ह्या योगावरील स्त्रियांना वरील गुण दोषरूप होतात.

११ पूर्वा—द्रव्यसंचय करणारा, धनाढ्य, विचारवंत, श्रीमंतीची इच्छा करणारा, शारीरिक कामें करणारा, गुणी, सुखी, सौख्य मध्यम भोगणारा, नीतीनें चालणारा.

१२ उत्तरा—महत्त्व नाहीं अशीं कामें करून अपयश घेणारा; गुणहीन, विचारहीन, शत्रू अधिक व नवनवे शत्रू उत्पन्न करून घेणारा, श्रीमंतीचा पोकळ डौल मिरविणारा, वृथा ऐट, श्रीमंतीच्या शेवटास लागलेला, स्वत: कार्य न करणारा, आळशी, दूरदृष्टि ठेवणारा व त्यांतच फशीं पडणारा; संकटें भोगणारा, दु:खी व उतावळा.

१३ हस्त—विद्या-बुद्धि चांगली, कायदा जाणणारा, लेखक, कलाकुशल, दुसऱ्यास आपल्यासारखें करून घेणारा, संपत्तिवान्, दूरदर्शीपणानें वागणारा, विचारशील, जशास तसें वर्तन ठेवणारा.

१४ चित्रा—आळशी, व्यभिचारी प्रवृत्ति, दुर्गुणी, अव्यवस्थित राहणी, अस्थिरमनाचा, कोणाचेंहि भाषण न ऐकणारा, विचित्र विचाराचा, क्षणांत बदलणारा, स्वार्थी.

१५ स्वाती—सात्त्विकरीतीनें राहणारा, भक्तिमान्, समतोलपणानें तडजोड करणारा, शांत, परोपकार करणारा, इनामदार, अधिकारी, न्यायाधीश, गरिबांना मदत करणारा, मोठ्या मंडळींत मान-सन्मान पावणारा.

१६ विशाखा—साहसी, कटुभाषण करणारा, मनांत डाव ठेव-

णारा, कपटी, दुसऱ्यास दुःखांत टाकणारा, घातपात करण्यांत आनंद मानणारा, शत्रुत्व माजविणारा, स्वतःचें वाईट करून घेणारा, अपयशी, अविचारी, स्वार्थी.

१७ **अनुराधा**—विषयी, कपटी, दुसऱ्याच्या द्रव्याची इच्छा करणारा, स्त्रियांना फसविणारा, त्यांना घेऊन परदेशीं जाणारा, लुबाडणारा, स्त्रियांच्या विषयीं वाईट बुद्धि व त्यांत प्रसंगीं बदनामी, वरून सभ्यपणानें वर्तन ठेवणारा, दांभिक, भाषणांत कपट ठेवणारा; रॉकेल, पेट्रोल, मादक पदार्थांचा व्यापारी, निंद्य वस्तूचा व्यापार करणारा, कलह लावणारा व स्वतः नुकसानी सोसणारा, अनाठायीं द्रव्याचा व्यय करणारा.

१८ **ज्येष्ठा**—हट्टी स्वभावाचा, खुनशी, गुह्येंद्रियाला पीडा—पुष्कळ दिवस टिकणारे रोग असणारा, काबाडकष्ट करणारा, दुःखमय आयुष्य कंठणारा, हालअपेष्टा भोगणारा, निर्लज्ज, दीनावस्था दाखविणारा, विद्या-बुद्धि कमी.

१९ **मूळ**—साहसी, राजकीय उलाढाली करणारा, मोठमोठे धंदे करणारा, स्वतःच्या शक्तीबाहेर वाटेल तें काम करणारा, व्यापाराकडे जास्त कल ठेवणारा, नुकसानी झाल्यास त्याची पर्वा न करणारा, हट्टी, चिकाटीनें कामें करणारा, कर्तापुरुष म्हणविणारा, आपला नांवलौकिक वाढविणारा, स्त्रियांच्या बोलण्यास फशीं पडणारा.

२० **पूर्वाषाढा**—सुख भोगणारा, धन-संचय करणारा, कुटुंबास सुख देणारा, गुणवान्, खटपटी, प्रत्येक कामांत यश संपादन करणारा, विचारवंत, लोखंडाचा व्यापारी.

२१ **उत्तराषाढा**—विद्या-बुद्धि मध्यम, मध्यम वर्गांत राहणारा, व्यापारी दृष्टि ठेवणारा, समाजप्रिय, समाजाच्या उपयोगीं पडणारा, यशस्वी रीतीनें काम पार पाडणारा, पुढचा-मागचा विचार करणारा.

२२ श्रवण—देवभक्त, अंधश्रद्धा ठेवणारा, कर्मठ, पूजापाठाचें स्तोम माजविणारा, शास्त्री, धर्माचीं कामें करणारा, समाजासारखें बोलणारा, ‘ होस हो ’ म्हणून मोकळा होणारा, सुखी, द्रव्य संपादन करणें हेंच ध्येय ठेवणारा, तात्पुर्ता विचार करणारा, जपजाप्य करीत राहणारा.

२३ धनिष्ठा—खादाड, धष्टपुष्ट, अविचारी, दुष्ट, दया न करणारा, कोणाच्याहि बलाबलाचा विचार न करणारा, उधळपट्टी करणारा, भांडखोर, फटकळ, उत्तराला उत्तर देणारा, निर्धन, व्यसनी, कुटुंबपोषणाची काळजी न घेणारा, हलगर्जीपणानें वर्तन ठेवणारा, स्वतःच्या शक्तीचा विचार न करणारा, मोठमोठ्या उलाढाली करणारा.

२४ शततारका—विद्वान्, कायदा जाणणारा, चैनींत राहणारा; मध्यम वर्गांत मानमान्यता बरी असते.

२५ पूर्वाभाद्रपदा—बौद्धिक कामें करणारा, विद्या-व्यासंगी, शोधक, विचारशक्ति उत्तम, नांवलौकिक वाढविणारा, कर्ता पुरुष, संपत्तीचा योग्य उपभोग घेणारा, व सर्वांस समत्वानें पाहणारा.

२६ उत्तराभाद्रपदा—सज्जन, परोपकारी, बुद्धिमान्, उतावळा, अधीर बुद्धीचा, काम करतांना अडखळणारा, एखादें काम अपुरें सोडणारा.

२७ रेवती—सुखी, ऐश्वर्य भोगणारा, धर्माचरणानें वागणारा, श्रीमंत, लोकांना मदत करणारा, सामाजिक गोष्टींचा विचार करणारा, पुढारी, जबाबदारीचीं कामें अंगावर घेणारा, विचारशील, परोपकारी बुद्धीचा, दानधर्म करणारा.

# हर्शल व नेपच्युन.

**हर्शल**—हा ग्रह सन १७८१ मध्यें सांपडला. ह्या ग्रहासंबंधीं अजून पुष्कळ शोध व्हावयाचे आहेत. ह्याचे साधारण गुण शनी-प्रमाणें दिसतात. तरी त्याहूनहि निराळे अनुभव येतात. **हर्शलचीं फलें**—अनिश्चितपणा, चंचलवृत्ति, विक्षिप्तपणा, अकस्मात् गोष्ट होणें, विलक्षण कार्य घडणें, कल्पनेबाहेरचे गुण, तर्कशक्ति अचाट, विलक्षण डोक्याचा, न ऐकिलेले चमत्कार करणें अथवा तशा विद्येची आवड धरणें, अकस्मात् अपघातानें मृत्यु. रेल्वे-मोटार-ट्रॅम-विजेचे दिवे व विद्युत्प्रवाह यांवर हर्शलचा ताबा आहे; व हर्शलचे रोगहि चमत्कारिक व कल्पनेच्या बाहेरचे, क्षणांत बदलणारे, व ज्यांचें निदानच करवणार नाहीं असे असतात. विचित्र स्वभाव, लहरी, क्षणांत श्रीमंत व क्षणांत दरिद्री. ज्या गोष्टी कल्पनेबाहेर अशांचा कारक हर्शल आहे. हा ग्रह पृथ्वीच्या ६४ पटीनें मोठा आहे व हा ग्रह सूर्यापासून १७७ कोटि मैल आहे. यासंबंधीं शोध व अनुभव घेणें चालू आहेच. त्याची गति ७ वर्षाला एक राशि व ८४ वर्षांनीं त्याचा पूर्ण फेरा होतो.

**नेपच्युन**—ह्या ग्रहाचा शोध सन १८४६ मध्यें लागला. शेवटीं जर्मनीच्या वेध-शाळेंतून त्याचा विचार निश्चित झाला व त्याची गतिहि सरासरी १४ वर्षें ठरली. त्यास राशिभ्रमण करण्यास १६८ वर्षें लागतात, व त्याचा व्यास पृथ्वीच्या ८३ पट मोठा आहे. हा ग्रह सूर्यापासून २७७ कोटि मैल लांब आहे. याचे गुणधर्म—सूचकपणा, अलौकिक सामर्थ्य, ज्ञानी वगैरे. यासंबंधीं अद्यापि नक्की कांहीं ठरलें नाहीं. अनुभव येईल तसतसें ठरवावयाचें.

**नुकताच सन १९३० मध्यें आणखी एका म्हणजे बाराव्या**

ग्रहाचाहि शोध लागला आहे. त्याचें नांव प्लूटो असें आहे. त्याची गति, त्याचें अंतर व त्याचे गुणधर्म ठरविणें चाललें आहे.

त्याशिवाय आणखी एका म्हणजे १३ व्या ग्रहाचाहि जर्मनींत शोध चालू आहे. प्लूटोच्या पुढेंहि एखादा ग्रह असावा, असें बऱ्याच वेधशाळांचें मत झालें आहे. ह्या विश्वांत १२।१३ च काय पण शेंकडों ग्रह असे आहेत कीं ज्यांची कल्पना आपणांस होणें शक्य नाहीं. त्यांचा शोध मानव कितीसा करणार ? व त्यांचा थांग तरी काय लागणार ? या विश्वासंबंधीं कल्पनाच होणें शक्य नाहीं. यासाठीं मोठमोठे योगी, महान् महान् मुनी व थोरथोर अवतारी पुरुष होऊन त्यांनीं सुद्धां ' या अनंत विश्वाची नुसती कल्पना देखील करवत नाहीं,' असे उद्गार काढले. पुढें सर्वत्र अंधार ! अशा ठिकाणीं बुद्धि तरी काय काम देणार ? असो. हें विश्व म्हणजे विश्वच आहे. पंचतत्त्वांचाच सर्व पसारा आहे. त्यांचाच थांग व कल्पना होणें कठीण आहे. हें विश्व विश्वस्वरूप व सर्व विश्व विश्वच आहे ! !

हर्शल व नेपच्युन या दोन ग्रहांसंबंधीं श्री. कै. गणकभास्कर **वि. गो. नवाथे** यांनीं त्यांचे कल्पिलेले नाक्षत्रिक गुण दिले आहेत ते व त्यांचीं साधारण अनुभविक फलें खालीं देत आहों.

१ **अश्विनी**—या नक्षत्रांत दोन्ही ग्रह असतां चंचलता व अस्थिरपणा उत्पन्न करणारे व बेत वारंवार बदलत जाणारे; शांतपणापासून ढळविणारे गुण जास्त; स्वच्छंदी; तत्त्वज्ञानी, शास्त्री, वेदज्ञ, मेंदूचा विकार असणारे, वगैरे वगैरे.

२ **भरणी**—विनाकारण देशांतर करणारा, चंचल वृत्तीचा, निरर्थक वेळ घालविणारा, शीघ्रकोपी, रागाच्या भरांत वाटेल तें करणारा.

३ **कृत्तिका**—अपघातांत सांपडणारा, दुःखी, नेहमीं संकटांत सांपडणारा, शरीराची खराबी करून घेणारा, तामसी वृत्तीचा.

४ **रोहिणी**—विलक्षण बुद्धीचा, नाना तऱ्हेचे शोध लावणारा, गूढज्ञान उघडकीस आणणारा, मनमिळाऊ, नेहमीं व्यवसायांत राहणारा, आपली उन्नति करणारा.

५ **मृग**—कुटिल, अविचारानें वागणारा, गर्व करणारा, दुसऱ्याच्या चुका काढणारा, महत्त्वाकांक्षी, प्रसंगावधान ठेवणारा, घातकी, अविश्वासू.

६ **आर्द्रा**—मध्यम विद्वत्तेचा, धाडसी, रागीट व सडेतोड भाषण करणारा, निर्भीड वर्तनाचा.

७ **पुनर्वसु**—ग्रंथकर्ता, एखादी संस्था कायम करणें, कायदेपंडित, खटपटी, बौद्धिक कार्याकडे लक्ष्य लावणारा.

८ **पुष्य**—ईश्वरभक्ति करणारा, सुखी, परोपकारी, गुप्तविद्येचा नादी, मन वेधेल अशीं कामें करणारा, सात्त्विक, समाजाला उपयोगी पडणारा, धनसंचय करणारा.

९ **आश्लेषा**—कपटी, आंतल्या गांठीचा, घातपात करण्याची इच्छा ठेवणारा, धाडसी, विक्षिप्त वृत्तीचा, धूर्त, शत्रूस फसविणारा, आपलें वर्चस्व ठेवणारा.

१० **मघा**—उलाढाली करणारा, महत्पदाची इच्छा करणारा, अधिकारी, प्रसिद्ध व्यक्ति, तैलबुद्धीचा, साहसाचीं कामें करणारा, प्रसंगीं न डगमगणारा, क्रूर.

११ **पूर्वा**—व्यापारी, सुखी, मानमान्यता पावणारा, समत्वानें वागणारा, गरीब लोकांस मदत करणारा.

१२ **उत्तरा**—साधारण मनुष्यांत गणना, उपजीविकेचा धंदा सांभाळून कुटुंबाकडे लक्ष्य ठेवणारा.

१३ **हस्त**—कलाकुशल, कल्पक बुद्धीचा, विचारशक्ति चांगली, सुखी, ऐश्वर्यवान्, पुढील कार्यावर दृष्टि ठेवणारा.

१४ **चित्रा**—स्त्रियांसंबंधीं वर्तन घोंटाळ्याचें असतें,आपली स्थिति सुधारून उच्च प्रतीला पोंचावें, ही अपेक्षा जास्त असते. तापट स्वभावाचा, अंगीं दुर्गुण फार, लहरी स्वभाव.

१५ **स्वाती**—सत्त्वगुणी व पुष्कळ गुण अंगीं असतात. न्यायाची आवड जास्त असते. तडजोडीनें व समतोलपणानें विचार करणारा, बुद्धिमान्, विद्वान्, चाणाक्ष, कल्पना लढविणारा व नेहमीं विचार-तरंगांत पोहणारा, चपल व अति चंचल, नादिष्ट, एखादें काम अपुरें सोडणारा, नेहमीं विश्रांति घेण्याची इच्छा करणारा.

१६ **विशाखा**—दुसऱ्याचा व आपला नाश करणारा, विषासमान भाषण करणारा, घातक विचारांना महत्त्व देणारा, मनांत काळें व विषारीपणा ठेवून बाहेर समत्व दाखविणारा, शत्रूचीं पाळें-मुळें खणून काढणारा, उद्योगी. अशीं माणसें गुप्त पोलिसच्या कामीं बरीं असतात.

१७ **अनुराधा**—प्रेमासक्त, पण क्षणांत प्रेमळ भाषण व थोड्याच वेळांत कठोर; प्रेमभंग, स्त्रीला घालवून देणारा. स्त्री असेल तर पतीला सोडून जाणारी अथवा विवाह होऊन सुद्धां वितुष्ट येणारी. समाजांत मनसोक्त वर्तन, लहरी, अस्थिर, केव्हां सुखी व केव्हां दुःखी, साहसी.

१८ **ज्येष्ठा**—हट्टी, कारस्थानी, कुटिल नीतीचा, विचार गुप्त ठेवणारा, विलक्षण कारस्थानी, हट्टानें दुःख भोगणारा, देशांतर करणारा, क्षणिक विचाराचा.

१९ **मूळ**—बापास वाईट, अशक्य गोष्टी शक्य करणारा, कल्पनातीत गोष्टी घडवून आणणारा, धैर्यवान्, आपली योग्यता वाढ-

विणारा, दरारा ठेवणारा सामाजिक व राजकीय उलाढालींत भाग घेऊन क्रांति घडवून आणणारा, कर्तापुरुष होणारा, मोठमोठ्यांवर दरारा ठेवणारा व दुसऱ्यासाठीं दुःख भोगणारा, तडजोडीनें वागणारा, वचनांवर विश्वास ठेवणारा व छातीठोक पुढें उभा राहणारा.

२० **पूर्वाषाढा**—धनवान्, बुद्धिमान्, बलवान्, सर्व गोष्टीचा सारासार विचार करणारा, सर्वांस सुख देण्याची भावना ठेवणारा, कुलांत नांव काढणारा.

२१ **उत्तराषाढा**—खटपटी, विद्या-बुद्धि कमी, प्रत्येक कामांत अपयश पावणारा व मागून सावध होणारा, मध्यम कीर्ति, कष्टाळू, मेहनत करून द्रव्यसंचय करणारा, सुख थोडें व दुःख जास्त.

२२ **श्रवण**—धार्मिक कामांत पडणारा, व्याख्यानें देणारा, उपदेशक, समाज-सुधारणा करणारा व स्वतःचें हित पाहणारा, तात्त्विक दृष्टीचा, शास्त्री, निरीश्वरवादी, सुखी, धनसंपन्न.

२३ **धनिष्ठा**—अविचारी, लहरी, अस्थिर मनाचा, दुर्गुणांनीं भरलेला, उधळपट्टी करणारा, सारासार-विचार न ठेवणारा, उलाढाल्या.

२४ **शततारका**—विद्या-बुद्धि मध्यम, प्रथम सपाटून काम करणारा व पुढें सोडून देणारा, मनोराज्य करणारा, कल्पनेप्रमाणें कार्याला लागणारा, चंचल विचाराचा, सुखाची व दुःखाची पर्वा न करणारा.

२५ **पूर्वाभाद्रपदा**—शोधक दृष्टीनें पाहणारा, कल्पक, विद्याव्यासंगी, बौद्धिक कामांत सुधारणा करणारा, समाज-कार्याचें ध्येय ओळखून चालणारा, सुखी, विचारी, कीर्ति संपादन करण्याची खटपट करणारा.

२६ **उत्तराभाद्रपदा**—सुखी, द्रव्यसंचय करणारा, अधीर

मनाचा, उतावळा, सर्व गोष्टींचा क्षणिक विचार करणारा, क्वचित् जुळा जन्म, मताचे संघ करणारा.

**रेवती**—उत्तम गुणाचा, गुणग्राहक, विचारवंत, सुखी, धन व ऐश्वर्य भोगणारा, विद्वान्, लहरी, क्षणिक विचार करणारा, समय-सूचकता चांगली, सारासार-विचारी, सज्जन.

## नवीन १२ वा ग्रह प्लूटो.

ह्या नवीन १२ व्या ग्रहाचा शोध सन १९३० च्या मार्च महिन्यांत लोवेलच्या वेधशाळेच्या दुर्बिणींतून लागला. याच्या गुणधर्मासंबंधीं अजून नक्की शोध झालेला नाहीं.

## नक्षत्रांचे गुणधर्म.

१ **अश्विनी**—चंचल, सदा फिरणारा, लांबलांबचे प्रवास करणारा, बुद्धिमान्, विद्याव्यासंगी, तत्त्वज्ञानी, लेखक, ग्रंथकार, पुढारी, जलद चालणारा व जलद लिहिणारा, लवकर लवकर कामें करणारा, सार्वजनिक कामांत पडणारा; उपदेशक. बांधा सडपातळ व उष्ण-प्रकृतीचा. ह्या नक्षत्रांत रवि, चंद्र, गुरु असून लग्न-त्रिकोण, दशम-त्रिकोण अथवा सप्तम-त्रिकोण असल्यास भाग्यवान् व नामांकित होतो.

२ **भरणी**—विद्या-बुद्धि कमी, परदाररत, दुसऱ्याच्या बुद्धीनें चालणारा, प्रसंगीं 'होस हो' म्हणून मोकळा होणारा, स्वार्थाकडे जास्त लक्ष ठेवणारा, पिढीजाद कामें करणारा, नवीन परिस्थिति निर्माण करण्याची शक्ति नसणें, धैर्यहीन, दुसऱ्याला पुढें करून काम साधणारा, दक्ष, वेळ-प्रसंग पाहणारा, गोड बोलल्यास फसणारा व रागीट. या नक्षत्रांत मंगळ फारच कठिण प्रसंग आणतो. हें नक्षत्र लग्नांत अथवा पंचमस्थानीं असावें.

३ **कृत्तिका**—हें अग्नि-नक्षत्र आहे. प्रकृति उष्ण, दांत व नाकां-

तून रक्त पडणें, शिरोभागीं व्रण, विद्वत्ता कमी, तामसी, दुसऱ्यास कठोर बोलणारा, गर्वाचें भाषण करणारा, उपद्रवी, हलक्या वृत्तीचा, साहसी, थंड पाणी व थंड पदार्थ प्रिय. या नक्षत्रीं मंगळ व हर्शल असून लग्नांत असल्यास शिरोभागावर व्रण अगदीं खात्रीनें असतो. तसेंच मूळव्याध, शस्त्रक्रिया, व अग्निभय हीं होण्याचा संभव असतो. ज्वर आल्यास जास्त दिवस टिकणें व पुष्कळ चढणें, कठिण प्रसंग ओढवणें, इ. ह्या नक्षत्रांत मंगळ, शनि, राहु, हर्शल हे असल्यास शरीराची नासाडी व खराबी करतात.

४ **रोहिणी**—सुंदर, सौंदर्यवान्, शांत, प्रेमळ, बुद्धिमान्, विलासी, शरीराचा प्रत्येक भाग गोंडस, शुद्ध अंतःकरणाचा, स्त्रीप्रिय व ममताळू. या नक्षत्रांत चंद्र किंवा शुक्र असल्यास स्त्रिया सौंदर्यवान् असतात. नांवलौकिकाला साजेशीं कामें करणारा, कुटुंबांतील मंडळी-वर प्रेम करणारा. या नक्षत्रांत चंद्र, शुक्र, गुरु असून हें नक्षत्र लग्न, त्रिकोण, दशम व चतुर्थ या ठिकाणीं असल्यास चांगलें फलद्रूप होतें.

५ **मृग**—कुटिल, कामातुर, रोगी, विद्या-बुद्धि मध्यम, शेती करणारा, गांवढळ, काबाडकष्टी, मध्यमवर्गी. यांत बुध, गुरु, शुक्र हे साधारण बरे असतात, शनि, मंगळ व हर्शल यांचीं फलें चांगलीं येत नाहींत.

६ **आर्द्रा**—लेखक, स्वभाव कडक, टीकाकार, बुद्धि चांगली असते, पण विसरभोळेपणा असतो. उग्र गुणांकडे प्रवृत्ति जास्त असते. मंगळ, शनि या नक्षत्रीं बरे नसतात.

७ **पुनर्वसु**—विद्वान्, बौद्धिक कामें करणारा, शास्त्र, ग्रंथकार, नीतिमान्, कलाकुशल व गाणारा, पुष्कळ गुण जाणणारा, सत्त्वगुणी. यांत बुध, शुक्र, गुरु, चंद्र हे चांगले असतात. त्रिकोणीं व लग्नीं यांचीं फलें चांगलीं अनुभवास येतात.

८ **पुष्य**—परोपकारी, नीतिमान् , ईश्वरभक्ति करणारा, समाज-कार्य करणारा, ऐश्वर्यवान्, धनसंचय करणारा, कायदेपंडित. यांत शनि असल्यास कायदेपंडित होतो; व गुरु, शुक्र, रवि ह्यांस या नक्षत्रांत जास्त महत्त्व आहे. हें दशमांत बलिष्ठ असून चांगलें फलद्रूप होतें.

९ **आश्लेषा**—दुष्ट नक्षत्र आहे. कोपी, कृतघ्न, घातपात करणारा, धूर्ततेनें वागणारा, धैर्यवान्, निष्ठुर, ठक, हानिकारक, नीतिभ्रष्ट, अविचारी, वाईट गुणांचा. हें क्रूर नक्षत्र आहे. यांत मंगळ, हर्शल, शनि, राहु हे चांगले नाहींत. ६-८-१२ या स्थानीं हें नक्षत्र असल्यास संकटें भोगावीं लागतात.

१० **मघा**—हें तीव्र नक्षत्र आहे. दुसऱ्यांवर हुकमत चालविणारा, दरारा ठेवणारा, महत्पदाची इच्छा करणारा, उच्चध्येयाचा, ताबेदारी न करणारा, स्वतःच्या बलानें पुढें येणारा, राजकीय उलाढाली करणारा, मानी, स्वावलंबी, कर्तृत्वशक्ति असणारा, गंभीर. यांत सूर्य, मंगळ, शनि, हर्शल हे बलवान् असतात. दशमांत हें उत्तम फलद्रूप होतें.

११ **पूर्वा**—शरीर-संपत्ति चांगली व मजबूत, धनाढ्य, द्रव्यावर प्रेम करणारा, बुद्धिवान्, सार्वजनिक कामें करणारा, प्रसिद्धीस येणारा, श्रद्धाळू, खटपटी, परावलंबी. यांत मंगळ, सूर्य, गुरु हे चांगले असतात.

१२ **उत्तरा**—दीर्घ कालानें यशास येणारा, विद्या-बुद्धि कमी, गुण साधारण असतात. यांत ग्रहांना जास्त महत्त्व नाहीं.

१३ **हस्त**—कलाकुशल, ग्रंथकार, कवि, ईश्वरभक्ति करणारा, नीतिमान्, शरीरसौंदर्य चांगलें, गुणज्ञ, सन्मार्गी, धर्मावर श्रद्धा चांगली, कायदा जाणणारा, सुखी, ऐश्वर्य भोगणारा, लोकप्रिय,

नांवलौकिक वाढविणारा. या नक्षत्रांत गुरु, मंगळ, शुक्र, सूर्य हे चांगले असतात. लग्नीं व सप्तम स्थानीं चांगले गुण अनुभवास येतात.

१४ **चित्रा**—हें क्रूर नक्षत्र आहे. दुर्गुणी, तामसी वृत्तीचा, परस्त्रीरत, निर्लज्ज, विद्या—बुद्धि कमी, अधीर, अस्थिर मनाचा. यांत मंगळ, शनि, चांगलीं फळें देत नाहींत.

१५ **स्वाती**—सुखी, सत्त्वगुणी, विद्वान्, न्यायप्रिय, समतोलपणानें वागणारा, क्षमाशील, सदाचरणी, लेखक, ग्रंथ रचणारा, सत्यप्रिय, सर्व लोकांस आवडणारा. यांत शनि, शुक्र, बुध हे चांगलें फल देतात.

१६ **विशाखा**—हें तीक्ष्ण व राक्षसी नक्षत्र आहे. दुष्ट, स्वभाव विषासमान, कडक भाषण करणारा, घात व सूड उगविणारा, कपटी, विद्या—बुद्धि कमी, वाईट गुणांनीं युक्त, अविश्वासू. यांत पापग्रह वाईट फलें देतात. घात, शारीरिक व्यथा, संकटें वगैरे यांस ऊत येतो. हें शाखाहीन नक्षत्र आहे.

१७ **अनुराधा**—यांत विषयासक्तपणा जास्त दिसतो. सज्जन, धनवान्, लोकप्रसिद्ध, प्रेमळ, परोपकार करणारा. सर्व गुण उत्तम असतात, परंतु विषयासंबंधीं दुर्गुण आढळतात. बाहेरख्यालीपणा जास्त असतो. यांत शुक्र, मंगळ असतां कामेच्छा जास्त असते. गुरु, चंद्र, बुध यांचे गुण चांगले अनुभवास येतात. 'शनि—न हर्शल हे नासाडी करितात.

१८ **ज्येष्ठा**—हें तीव्र व राक्षसी नक्षत्र आहे. हट्टी, खुनशी, घातपात, व्यभिचार, सूड उगविण्याची इच्छा, हलकटवृत्तीचा, आपले बेत गुप्त ठेवणारा, कष्ट सोसणारा, महाकारस्थानी, मोठमोठ्या

उलाढाली करणारा, सामर्थ्यवान्. हें नक्षत्र चांगलें बलवान् आहे. सामर्थ्य व कर्तृत्वशक्ति चांगली. यांत शुभग्रह—गुरु, शुक्र, सूर्य, बुध, चंद्र इ. असल्यास उत्तम कार्याकडे प्रवृत्ति असते. पापग्रह मंगळ, शनि, हर्शल, राहु हे असल्यास घातपात, दुष्ट, खुनशी वगैरे स्वभावाकडे प्रवृत्ति असते. मूळव्याध, उपदंशासारखे रोग जडतात.

१९ **मूळ**—रागीट, साहसी, तेजस्वी, योद्धा, महत्त्वाकांक्षी, स्वावलंबी, स्वतःच्या सामर्थ्यानें उदयास येणारा, बापापेक्षां सवाई व बापालाच घातक, कुलदीपक, कर्ता-पुरुष, कर्तृत्वशक्ति असणारा, समयसूचकतेनें वागणारा, प्रत्येक कार्यांत दक्षता ठेवणारा. नैसर्गिक रीत्या यांत जिवावरचे प्रसंग व संकटें, अपघात, हाडें मोडणें, शस्त्रांनीं जखम होणें इ. बरेच वाईट धर्महि आहेत. यांत मंगळ, हर्शल हे फारच वाईट फलें देतात. गुरु, शुक्र, शनि, सूर्य यांचीं फलें चांगलीं अनुभवास येतात. हें लग्नीं, दशमांत व सप्तम स्थानीं बलवान् असतें.

२० **पूर्वाषाढा**—धनवान्, बलवान्, सुखी, आहे त्यांत सुख मानणारा, विद्या—बुद्धि चांगली, आपल्या समाजांत मानमान्यता चांगली, द्रव्यावर प्रेम करणारा, द्रव्य खर्च करणारा, पैसा पैसा जमा करणारा, जाणूनबुजून चुका करणारा, लहरी इ. यांत गुरु, चंद्र, शनि, चांगले असतात; व मंगळ, राहु, नेपच्युन, हर्शल हे वाईट फलें देतात. हें मध्यम मानाचें नक्षत्र आहे.

२१ **उत्तराषाढा**—राजसगुणी, यश-कीर्ति संपादण्याकडे लक्ष्य पूर्ण असतें. कामें करून दाखविणारा, समाजांत योग्य असा. यांत शनि, राहु, हर्शल हे चांगले असतात; व मंगळ, सूर्य, शुक्र हे वाईट फलें देतात.

२२ **श्रवण**—हें देव-नक्षत्र आहे. सदाचार-संपन्न, सात्त्विक-वर्तनाचा, ईश्वरभक्ति करणारा, विचारी, वैदिक, शास्त्री, शरीर-सौंदर्य चांगलें, गुणज्ञ, सर्वांवर दया करणारा, कीर्तिमान्, लौकिक वाढविणारा, समाज-कार्य करणारा, समयसूचकता चांगली, शुद्ध अंतःकरणाचा, कुटुंबवत्सल. यांत शनि, गुरु, बुध यांचीं फलें चांगलीं येतात; व मंगळ, सूर्य यांचीं फलें मध्यम. हें नक्षत्र लग्न, दशम व सप्तम या स्थानीं चांगलें असतें.

२३ **धनिष्ठा**—हें क्रूर व राक्षसी नक्षत्र आहे. याचा पूर्वार्धभाग दुष्टपणाचा जास्त व उत्तरार्ध-भाग सौम्यपणाचा आहे. ईश्वरभक्त, सच्छील वर्तन, वैदिक, अशीं मिश्र फलें येतात. याचा मुख्य स्वभाव दुष्ट, निर्दय, अविचारी, बलात्कार करणारा, गर्विष्ठ, आपल्या घमें-डींत राहणारा, सारासार व बलाबल याचा विचार न करणारा, बोजड शरीराचा, मोठमोठ्या उलाढाल्या करणारा व त्यांतच दुःख भोगणारा, व पुन्हां सावरून उठणारा, चिकाटीचा. शनि, गुरु, मंगळ हे या नक्षत्रीं बलवान् असतात, परंतु दुःखें देतात.

२४ **शततारका**—साधारण बुद्धीचा, आपल्या कुटुंबांत सभ्य, घरगुती व प्रापंचिक कामें उत्तम करणारा, कायद्यानें बोलणारा व कायदा जाणणारा, मध्यम वर्गांत राहणारा. यांत ग्रह मध्यम असतात.

२५ **पूर्वाभाद्रपदा**—धनवान्, बुद्धिमान्, सत्त्वगुणी, शोधक, गणिती, विद्या-व्यासंगी, कल्पक बुद्धीचा, बौद्धिक कामें करणारा व पुढाकार घेणारा, कीर्ति संपादन करणारा व चतुर, समय-सूचक-तेनें बोलणारा. यांत सर्व ग्रह बलवान् असतात. गुरु, मंगळ, शुक्र, बुध, शनि, सूर्य व हर्शल हे यांत बलवान् असतात. मंगळ व

हर्शल शरीरास त्रासदायक होतात. शनि, मंगळ, बुध हे चांगली बुद्धि देतात. हें दशमांत व मूल त्रिकोणीं व पंचमांत असावें.*

२६ **उत्तराभाद्रपदा**—अधीर व चंचल वृत्तीचा, विचार बदलणारा, जशी वेळ पडेल तसें बोलणारा, योग्य विचार न करणारा, क्षणिक विचाराचा. यांत शुभग्रह मध्यम फलें देतात.

२७ **रेवती**—धनवान्, ऐश्वर्य भोगणारा. बुद्धिमान्, चतुर, सत्यप्रिय, कायदेपंडित, सत्कर्मे करणारा, देव—साधुसंत यांवर भर ठेवणारा, सर्वांवर प्रेम करणारा, समाजप्रिय, यांत शुभग्रह चांगलीं फलें देतात. गुरु, मंगळ, सूर्य, हर्शल हे शुभ-दायक आहेत व शनि, शुक्र, बुध, राहु, नेपच्युन हे संकट व आणीबाणीची वेळ आणून सोडतात. परंतु त्यांतून निभावून नेतात. हें नक्षत्र लग्न व पंचम या स्थानीं चांगलें असतें.

## तीक्ष्ण अथवा राक्षसी नक्षत्रें.

कृत्तिका, आश्लेषा, चित्रा, विशाखा, ज्येष्ठा, मूळ, धनिष्ठा व शततारका हीं आठ नक्षत्रें दुष्ट स्वभावाचीं असल्यामुळें या नक्षत्रांतून सूर्यादि पाप-ग्रहांचे योग, प्रतियोग हे झालेले असोत किंवा पुढें होणारे असोत ते घातुकच आहेत. तसेंच भरणी व मघा हीं नक्षत्रें देखील दुष्ट स्वभावाचीं आहेत. त्यांत भिन्न धर्म व समान बुद्धीचे गुण असल्याकारणानें त्यांचे गुण राक्षसी नक्षत्राइतके तीव्र नाहींत. तथापि ह्या दोन नक्षत्रीं पाप-ग्रहांचे योग चांगले नाहींत.

---

* **दैव-रहस्य, दैव-विचार** इ०चे कर्ते व आमचे स्नेही रा. **काटवे** यांचें मतें 'या नक्षत्राचीं फलें पूर्ण वाईट अनुभवास येतात.' आम्हीं साधारण ग्रंथोक्त फलें दिलीं आहेत. तरी अभ्यासक व ज्योतिष-जिज्ञासू यांनीं अनुभव घ्हावा.—**कर्ता**.

उदाहरणार्थ—आग लावणें, भयंकर दुखापती होणें, जखमा होणें, रक्ती मूळव्याध, हार्टफेल—हृदयाची क्रिया बंद पडून मृत्यु येणें, अपघात, भाजणें, शस्त्रास्त्र इ., पाण्यांत बुडणें, सन्निपात व ग्रंथिक सन्निपात यांनीं मृत्यु येणें, विषमज्वर येणें व तो बराच वेळ राहणें, वगैरे वगैरे. ह्या दुष्ट नक्षत्रांतून होणारें पापग्रहांचें भ्रमण त्या त्या वेळीं त्रासदायक होतें व त्यामुळें मृत्यु अथवा अपघात होत असतो.

अशा नक्षत्रांतून पापग्रहांचें भ्रमण व प्रतियोग होत असल्यास परमेश्वरी कृपेनेंच प्राणी बचावतो. पण बचावला तरी त्यास भयंकर दुःख किंवा त्रास झाल्याशिवाय रहात नाहीं. उदाहरणार्थ—प्लेग, मोटारचे अपघात, विजेचे झटके, सन्निपात ज्वर अथवा ऑपरेशन वगैरे किंवा अशाच रोगांतून उठणाऱ्या गृहस्थाकडे पहावें म्हणजे झालें.

## नक्षत्रांचे वर्ग व त्यांचे धर्म.

नक्षत्रांचे तीन वर्ग आहेत: देवगणी सात्त्विक, मनुष्यगणी राजस व राक्षसगणी तामसी. नक्षत्रांच्या गुणांवरून हे वर्ग झाले आहेत.

| देवगण. | मनुष्यगण. | राक्षसगण. |
|---|---|---|
| १ अश्विनी. | २ भरणी. | ३ कृत्तिका. |
| ५ मृग. | ४ रोहिणी. | ९ आश्लेषा |
| ७ पुनर्वसु. | ६ आर्द्रा. | १० मघा |
| ८ पुष्य | ११ पूर्वा | १४ चित्रा |
| १३ हस्त | १२ उत्तरा | १६ विशाखा |
| १५ स्वाती | २० पूर्वाषाढा | १८ ज्येष्ठा |
| १७ अनुराधा | २१ उत्तराषाढा | १९ मूळ |
| २२ श्रवण | २५ पूर्वाभाद्रपदा | २३ धनिष्ठा |
| २७ रेवती | २६ उत्तराभाद्रपदा | २४ शततारका |

सन १९३१ च्या रॉफेलच्या पंचागांत नक्षत्रांचे गुणधर्म खालीं दिल्याप्रमाणें दिले आहेत. हे प्रत्यक्ष वेधावरून ठरविलेले आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ अश्विनी | १० मघा | १९ मूळ | → केतूच्या | धर्माप्रमाणें |
| २ भरणी | ११ पूर्वा | २० पूर्वाषा. | → शुक्र | " |
| ३ कृत्तिका | १२ उत्तरा | २१ उ. षा. | → सूर्य | " |
| ४ रोहिणी | १३ हस्त | २२ श्रवण | → चंद्र | " |
| ५ मृग | १४ चित्रा | २३ धनिष्ठा | → मंगळ | " |
| ६ आर्द्रा | १५ स्वाती | २४ शततारका | → राहु | " |
| ७ पुनर्वसु | १६ विशाखा | २५ पूर्वाभा. | → गुरु | " |
| ८ पुष्य | १७ अनुराधा | २६ उत्तराभा. | → शनि | " |
| ९ आश्लेषा | १८ ज्येष्ठा | २७ रेवती | → बुध | " |

यांचीं फलें अजून अनुभवास यावयाचीं आहेत. जिज्ञासूंनीं अनुभव पहावा.

**देवगणी मनुष्य**—आपल्यावर कसलाहि कठिण प्रसंग किंवा संकट आल्यास त्यांत न घाबरतां, स्वत: न डगमगतां व दुसऱ्यास न दुखवितां आपलें काम समय-सूचकतेनें पार पाडून संकटाच्या परिस्थितींतून मुक्त होतात. आपल्या बुद्धीनें युक्ति शोधून संकटाला तोंड देऊन त्यांतून आपला मार्ग काढण्याचें ह्यांच्या अंगीं उत्तम कौशल्य असतें. शांतवृत्तीनें आजूबाजूच्या परिस्थितीवर पूर्ण दृष्टि ठेवणारे; सत्यभाषणी, विद्वान्, आचारशुद्ध, ईश्वरभक्त; प्रेम, औदार्य, लोककल्याण, भूतदया, दैवी सामर्थ्य, गुरुत्व, सारासार विचार असणारे, साधुसंत, धर्मोपदेशक, विद्वान्, लोकांना सन्मार्गाला लावणारे; दानशूर, यमनियम पाळणारे, परमार्थी, संपत्तीला तुच्छ मानणारे, समा

धानी, लोक-कल्याणार्थ स्वतःचा बळी देण्यास तयार, समयसूचक, धैर्याची खाण, सामाजिक कल्याणाचा उत्तम मार्ग आंखून देणारे, दुसऱ्यांचें कल्याण करणारे, मोठ्या योग्यतेस चढणारे व न्यायी, हे देवगणाचे मुख्य धर्म आहेत. देवगणी मनुष्यगणांशीं योग्य मैत्री ठेवून त्यांचें कल्याण करितो व त्यांच्याशीं त्याचें जमतें. देवगणीचें राक्षस-गणाशीं कधीं पटत नाहीं. मैत्री झाल्यास एक-मेकांशीं जमणें शक्य नसतें. तंटे-झगडे व संकटें येतात. दोघांनाहि सुख नसतें.

**मनुष्यगणी मनुष्य**—यांच्यावर संकट किंवा कठिण प्रसंग आल्यास हे फारच घाबरून जातात व धांवपळ करितात, दुसऱ्याची मदत घेतात, संकटाच्या भीतीनें भांबावून जातात व आजारीहि पडतात. सहनशीलपणा बिलकुल नसतो. फारच कठिण प्रसंग आल्यास कित्येक देशांतर करितात व कित्येक आत्महत्या करितात, आणि सर्वांसच संकटीं लोटतात. त्यांना आपणावर ब्रह्मांडच लोटलें कीं काय असें वाटतें! यांचे गुण—पूर्ण स्वार्थ, कुटुंबावर प्रेम, जन्मभर द्रव्याच्या पाठीमागें लागलेला! स्वतःचा फायदा पाहणारा, दुसऱ्याचें नुकसान अथवा फायदा याची कल्पना न करणारा, ऐषआराम—स्वतःचें सुख पाहणारा, चैनी,आनंदी,विषयी, आपल्या कामापुरतें प्रेम करणारा, दूरदर्शी, स्वार्थ-बुद्धि, नौकरी करून पैसा मिळविणारा, समाजांत आपला मान-सन्मान रहावा ही अपेक्षा! राजकीय उलाढाली करणारा, स्वार्थ साधून समाज-सेवा, देवाची भक्ति कामापुरती, जपजाप्य करणारा, पोषाख व्यवस्थेशीर, दासदासी-गाडीघोडा व इतर

वैभवाची इच्छा करणारा, समाजांत पुढें पुढें करून नांवलौकिक मिळवण्याची खटपट करणारा, कुटुंब-सोयरेधायरे यांच्यावर प्रेम करणारा, खाऊनपिऊन चैन करणारा, संसार हेंच स्वर्गसुख मानणारा, आप्त-इष्ट यांनीं वेष्टिलेला व लोभी. मनुष्यगणी व देवगणी यांचें चांगलें सूत व मैत्री जमते. राक्षसगणी व मनुष्य-गणी यांची मैत्री व संगत फारच घातक आहे. राक्षसगणी मनुष्यगणास मारून टाकतो व त्यास स्वतःचा दास बनवितो. तसेंच मनुष्यगणी त्याजपाशीं गेल्यास त्याला लुबाडून घेतो, त्याला थारा देत नाहीं. उलट राक्षसगणीच त्याला आपल्या कह्यांत ठेवितात. नानातऱ्हेचे भेदक शब्द बोलून त्यास दुखवितात व मनुष्य-गणीचा संहार व छल करितात, हा अनुभव पुष्कळांना आहे.

**राक्षसगणी मनुष्य**—स्वभाव कडक, धाडसी, कसाहि प्रसंग आल्यास घाबरत नाहींत. दुसऱ्याचा नाश व छल करणें; खून, मारामाऱ्या, घातपात करण्याकडे नेहमीं प्रवृत्ति असणें, दुसऱ्यांना उपद्रव देऊन स्वतःचा कार्यभाग आनंदांत करून घेणें किंवा स्वतःच्या सुखासाठीं दुसऱ्यावर वाटेल तसें आक्रमण करणें, दुसऱ्यास छळणें; विश्वासघात, चोरी, ठकबाजी, अत्याचार करणें व यांतच मोठा परा-क्रम केला म्हणून आनंद मानणें, वाटेल त्या मार्गानें पैसा काढणें, कोणाच्याहि कह्यांत न वागणें, उर्मटपणाचें वर्तन ठेवणें, महाचाणाक्ष, महत्त्वाकांक्षी; तंटा-झगडा करणें, वाममार्गी विचार, कुरापत काढणें, निष्ठुरपणानें भाषण करणें; आचार-विचार न ठेवणारा, मनोसक्त वर्तन करणारा; व्यसनाधीन, नीतिभ्रष्ट, सर्व प्रकारचे दुष्ट व खोडसाळ तेवढे गुण नैसर्गिक असतात. राक्षसगणी

मनुष्यगणी मनुष्यास बळेंच आपल्या कह्यांत ठेवतात, त्यांना त्रास देतात, मारहाण करितात, निष्ठुरपणानें बोलतात; व देवगणांसहि ते छळतात आणि त्यांच्यावर अत्याचार करितात. परंतु देवगणी हे महा-धूर्त असल्यानें राक्षसगणाचा कावा ओळखून त्याप्रमाणें वागून त्यांस तोंडघशीं पाडतात. आणि राक्षसगणांचें कारस्थान बाहेर पाडून त्यांनाच संकटांत लोटून देवगणी विजयी होतात.

देवगणांची(सात्त्विकी वृत्तीची) संख्या फार थोडी आहे. त्यांचा धर्म—सर्वांवर दया व सात्त्विक वर्तन.

मनुष्यगणी संख्या विपुल आहे. त्यांची राजसवृत्ति असते आणि संसारांतील व सर्व राज्यांच्या उलाढाली, कारस्थानें, स्वार्थ, स्वतःचें हित साधणें वगैरेकडे त्यांची प्रवृत्ति असते.

राक्षसगणी संख्या जास्त आहे. पूर्ण स्वार्थी, खादाड; घातपात, मारामाऱ्या, स्वतःच्या स्वार्थासाठीं दुष्ट कृत्यें करणें, इ. त्यांची नैसर्गिक वृत्ति असते. हलकट धंदे करणारे, मनाचे हलके, कठोर, बेइमान, कापट्य करून फसविणें इ. दुष्ट गुण म्हणून जेवढे तेवढे सर्व यांत भरलेले असतात.

येणेंप्रमाणें नक्षत्रांचा विचार साधारण त्यांच्या गुण-धर्मानुसार केला आहे. याशिवाय अद्यापि अचल तारे देखील पुष्कळ आहेत, त्यांतील थोड्या म्हणजे ४१ताऱ्यांचा विचार **नाक्षत्रफल** या पुस्तकांत कै. श्री. गणक-भास्कर **वि. गो. नवाथे** यांनीं केला आहे, तो जिज्ञासूंनीं अवश्य पहावा.

---

## नाक्षत्रिक कुंडली सोप्या पद्धतीनें मांडण्याचें खुलासेवार कोष्टक.

( या कोष्टकाच्या आधारें सोप्या रीतीनें व थोड्या वेळांत नाक्षत्रिक कुंडली मांडतां येते. )

**नाक्षत्र-कुंडली म्हणजे नवांश कुंडली आहे, हें ध्यानांत ठेवावें.**

| अं. | क. | चरण | नक्षत्र | राशि | अं. | क. | चरण | नक्षत्र | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २० | १ | अश्विनी | मेष | ३ | २० | ३ | मृग | मिथुन |
| ६ | ४० | २ | | | ६ | ४० | ४ | | |
| १० | ० | ३ | | | १० | ० | १ | आर्द्रा | |
| १३ | २० | ४ | | | १३ | ० | २ | | |
| १६ | ४० | १ | भरणी | | १६ | ४० | ३ | | |
| २० | ० | २ | | | २० | ० | ४ | | |
| २३ | २० | ३ | | | २३ | २० | १ | पुनर्वसु | |
| २६ | ४० | ४ | | | २६ | ४० | २ | | |
| ३० | ० | १ | कृत्तिका | | ३० | ० | ३ | | |
| ३ | २० | २ | कृत्तिका | वृषभ | ३ | २० | ४ | पुनर्वसु | कर्क |
| ६ | ४० | ३ | | | ६ | ४० | १ | पुष्य | |
| १० | ० | ४ | | | १० | ० | २ | | |
| १३ | २० | १ | रोहिणी. | | १३ | २० | ३ | | |
| १६ | ४० | २ | | | १६ | ४० | ४ | | |
| २० | ० | ३ | | | २० | ० | १ | आश्लेषा | |
| २३ | २० | ४ | | | २३ | २० | २ | | |
| २६ | ४० | १ | मृग | | २६ | ४० | ३ | | |
| ३० | ० | २ | | | ३० | ० | ४ | | |

| अं. | क. | च. | नक्षत्र | राशि | अं. | क. | च. | नक्षत्र | राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २० | १ | मघा | सिंह | १६ | ४० | ३ | | |
| ६ | ४० | २ | | | २० | ० | ४ | | |
| १० | ० | ३ | | | २३ | २० | १ | विशाखा | |
| १३ | २० | ४ | | | २६ | ४० | २ | | |
| १६ | ४० | १ | पूर्वा | | ३० | ० | ३ | | |
| २० | ० | २ | | | ३ | २० | ४ | विशाखा | वृश्चिक |
| २३ | २० | ३ | | | ६ | ४० | १ | अनुराधा | |
| २६ | ४० | ४ | | | १० | ० | २ | | |
| ३० | ० | १ | उत्तरा | | १३ | २० | ३ | | |
| ३ | २० | २ | उत्तरा | कन्या | १६ | ४० | ४ | | |
| ६ | ४० | ३ | | | २० | ० | १ | ज्येष्ठा | |
| १० | ० | ४ | | | २३ | २० | २ | | |
| १३ | २० | १ | हस्त | | २६ | ४० | ३ | | |
| १६ | ४० | २ | | | ३० | ० | ४ | | |
| २० | ० | ३ | | | ३ | २० | १ | मूळ | धन |
| २३ | २० | ४ | | | ६ | ४० | २ | | |
| २६ | ४० | १ | चित्रा | | १० | ० | ३ | | |
| ३० | ० | २ | | | १३ | २० | ४ | | |
| ३ | २० | ३ | चित्रा | तूळ | १६ | ४० | १ | पूर्वाषा. | |
| ६ | ४० | ४ | | | २० | ० | २ | | |
| १० | ० | १ | स्वाती | | २३ | २० | ३ | | |
| १३ | २० | २ | | | २६ | ४० | ४ | | |

| अं. | क. | चरण | नक्षत्र | राशि |
|---|---|---|---|---|
| ३० | ० | १ | उ. षा. | |
| ३ | २० | २ | उ. षा. | मकर |
| ६ | ४० | ३ | | |
| १० | ० | ४ | | |
| १३ | २० | १ | श्रवण | |
| १६ | ४० | २ | | |
| २० | ० | ३ | | |
| २३ | २० | ४ | | |
| २६ | ४० | १ | धनिष्ठा | |
| ३० | ० | २ | | |
| ३ | २० | ३ | धनिष्ठा | कुंभ |
| ६ | ४० | ४ | | |
| १० | ० | १ | शतता | |
| १३ | २० | २ | | |
| १६ | ४० | ३ | | |
| २० | ० | ४ | | |
| २३ | २० | १ | पूर्वाभा. | |
| २६ | ४० | २ | | |
| ३० | ० | ३ | | |

| अं. | क. | चरण | नक्षत्र | राशि |
|---|---|---|---|---|
| ३ | २० | ४ | पूर्वा भा. | मीन |
| ६ | ४० | १ | उत्तरा भा. | |
| १० | ० | २ | | |
| १३ | २० | ३ | | |
| १६ | ४० | ४ | | |
| २० | ० | १ | रेवती | |
| २३ | २० | २ | | |
| २६ | ४० | ३ | | |
| ३० | ० | ४ | | |

## नक्षत्रांचे शर, दिशा, क्रांति व वार्षिक गति.

| | नक्षत्र | सूर्यसिद्धांत शर अंश | सूर्यसिद्धांत शर कला | ग्रहलाघव शर अंश | दिशा शर | लल्लकृत ताऱ्यांची संख्या | क्रांति अंश | | क्रांति क. | क्रांति वि. | वार्षिक गति विकला | वार्षिक गति सू. क. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अश्विनी | १० | ० | १० | उ. | ३ | उ. | २० | २६ | १३ | १७ | ७ |
| २ | भरणी | १२ | ० | १२ | उ. | ३ | उ. | २१ | २ | १४ | १४ | १४ |
| २ | कृत्तिका | ५ | ० | ५ | उ. | ६ | उ. | २३ | ५२ | १६ | ११ | २ |
| ४ | रोहिणी | ५ | ० | ५ | द. | ५ | उ. | १५ | २६ | ४२ | ८ | ८ |
| ५ | मृग | १० | ० | १० | द. | ३ | द. | ८ | १७ | १७ | ४ | २ |
| ६ | आर्द्रा | ९ | ० | ११ | द. | १ | उ. | १६ | २७ | ५५ | २ | ९ |
| ७ | पुनर्वसु | ६ | ० | ६ | उ. | ४ | उ. | ३२ | ३ | २५ | ७ | ६ |
| ८ | पुष्य | ० | ० | ० | उ. | २ | उ. | १८ | ३४ | ३८ | ११ | ४ |
| ९ | आश्लेषा | ७ | ० | ७ | द. | ५ | उ. | ६ | १४ | ८ | १३ | ९ |
| १० | मघा | ० | ० | ० | द. | ५ | उ. | १२ | २० | २१ | १७ | ५ |
| ११ | पूर्वा | १२ | ० | १२ | उ. | २ | उ. | १५ | ५० | ४२ | १९ | ० |

| | नक्षत्र | सूर्यसिद्धांत शर अंश | सूर्यसिद्धांत शर कला | ग्रहलाघव शर अंश | दिशा शर | लल्लकृत ताऱ्यांची संख्या | क्रांति अंश | क्रांति कला | क्रांति वि. | वार्षिक गति विकला | वार्षिक गति सू. क. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | उत्तरा | १३ | ० | १३ | उ. | २ | उ. १४ | ५९ | ४९ | २० | ० |
| १३ | हस्त | ११ | ० | ११ | द. | ५ | द. ५० | १७ | ५७ | २० | ० |
| १५ | चित्रा | २ | ० | २ | द. | १ | द. १० | ४५ | ५४ | १८ | ८ |
| १५ | स्वाती | ३७ | ० | ३७ | उ. | १ | उ. १९ | ३४ | १८ | १६ | ८ |
| १६ | विशाखा | १ | ३० | १ | द. | ४ | द. १९ | ३० | १९ | १६ | ३ |
| १७ | अनुराधा | ३ | ० | २ | द. | ४ | द. २२ | २४ | २३ | १० | ३ |
| १८ | ज्येष्ठा | ४ | ० | ३ | द. | ३ | द. २६ | १५ | ५२ | ८ | ० |
| १९ | मूळ | ९ | ० | ८ | द. | ११ | द. ३७ | २ | ५९ | २ | १ |
| २० | पूर्वाषा. | ५ | ३० | ५ | द. | २ | द. २५ | २७ | ५४ | २ | ० |
| २१ | उ. षा. | ५ | ० | ५ | द. | २ | द. २७ | ४ | १३ | ३ | ५ |
| २२ | अभिजित् | ६० | ० | ६२ | उ. | ३ | उ. ३८ | ४२ | ४३ | २ | ९ |
| २३ | श्रवण | ३० | ० | ३० | उ. | ३ | उ. ८ | ३९ | ५९ | ९ | ० |
| २४ | धनिष्ठा | ३६ | ० | ३६ | उ. | ४ | उ. १५ | ३८ | ३६ | १२ | ९ |

| | नक्षत्र | सूर्यसिद्धांत शर अंश | कला | ग्रहलाघव शर अंश | दिशा शर | लल्लकृत ताऱ्यांची संख्या | क्रांति अंश | कला | वि. | वार्षिक गति विकला | सू. क. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ | शततारका | ० | ३० | ० | द. | १०० | द. ७ | ५९ | ३ | १९ | ० |
| २६ | पूर्वाभा. | २४ | ० | २४ | उ. | २ | उ. १४ | ४७ | ४५ | १९ | ३ |
| २७ | उ. भा. | २५ | ० | २७ | उ. | २ | उ. १४ | ४५ | ३९ | २० | ० |
| २८ | रेवती | ० | ० | ० | उ. | ३२ | उ. १४ | ३२ | १५ | १९ | ३ |
| | झीटापीशिय. | | | | | | उ. ७ | १० | २५ | १९ | १ |
| १ | अगस्त्य | ८० | ० | ७५ | द. | | | | | | |
| २ | व्याध | ४० | ० | ४० | द. | | | | | | |
| ३ | अग्नि | ८ | ० | ८ | उ. | | | | | | |
| ४ | ब्रह्मा | ३० | ० | ३० | उ. | | | | | | |
| ५ | प्रजापति | ३८ | ० | ३९ | उ. | | | | | | |
| ६ | अपांवत्स | ३ | ० | ३ | उ. | | | | | | |
| ७ | आपस | ५ | ० | ३ | उ. | | | | | | |

## सप्तर्षींचे क्रांतिवृत्ताचे अंश व गति.

| सप्तर्षि | क्रांति अ. | क्रांति क. | क्रांति वि. | वार्षिक गति वि. | वार्षिक गति सू. क. | वराहसंहिता-काराचे मतें |
|---|---|---|---|---|---|---|
| पुलह | उ. ५६ | ४७ | २४ | १९ | २ | उ. ५० |
| क्रतु | उ. ६२ | ९ | ४१ | १९ | ३ | उ. ६५ |
| पुलस्त्य | उ. ५४ | ७ | २ | २० | ० | उ. ५० |
| अत्रि | उ. ५७ | २७ | १८ | २० | ० | उ. ५६ |
| अंगिरा | उ. ५६ | २२ | १९ | १९ | ५ | उ. ५७ |
| वसिष्ठ | उ. ५५ | १९ | १८ | १८ | ८ | उ. ६० |
| अरुंधती | उ. ५८ | १२ | ७ | १७ | ६ | उ. × |
| मरीचि | उ. ४९ | ४१ | ३१ | १७ | ९ | उ. ६० |
| | | | | | | |
| उत्तरध्रुव | उ. ८८ | ५३ | ५२ | १८ | ३ | |
| गर्ग | उ. १९ | ० | ४७ | ८ | १ | |
| प्राची नध्रुव | उ. ६४ | ४४ | १९ | १७ | २ | |
| गौतम ऋ. | द. १९ | ३५ | ५४ | ९ | ९ | |
| कुबेर | द. १६ | २८ | २२ | १६ | ५ | |
| अगस्ति | द. ५२ | ३९ | १३ | १ | ९ | |

वरील नक्षत्रें व सप्तर्षि यांच्या अंशांसंबंधीं बराच मतभेद आहे. परंतु ध्रुव व झीटापीशियम् यांसंबंधीं मात्र एकमत आहे. यांस सायन व निरयनवादीहि आपल्या ग्रंथांत नमूद करितात.

म्हणजे झीटापीशियम्‌संबंधीं मात्र मतभेद नाहीं. नक्षत्रांचे अंश, कला व क्रांति यांसंबंधीं सूर्यसिद्धांत जुना व नवा, ब्रह्मगुप्त, द्वितीय आर्यसिद्धांत, सार्वभौमसिद्धांत, लल्ल, सुंदरसिद्धांत व ग्रहलाघव या सर्वांत मतभेद आहेत व याच कारणास्तव नुकताच प्रसिद्ध झालेला करणग्रंथ तात्पुर्ता सर्व-मान्य म्हणून प्रसिद्ध केला गेला आहे. तो मात्र अलीकडील पद्धतीच्या मानानें पुष्कळ सोपा झाला आहे.

रेवती नक्षत्राचा योगतारा यासच इंग्रजींत 'झीटापीशियम्' असें म्हणतात, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ही योग-तारा सर्वमान्य आहे व निःशर आहे. निःशराचीं तीन नक्षत्रें आहेतः—रेवती, पुष्य आणि मघा. ( ही तीन नक्षत्रें निःशर आहेत, पण यांसंबंधींहि मतभेद आहेच. )

याशिवाय म्हणजे नक्षत्रांशिवाय ज्यांची गति फारच सूक्ष्म आहे असे अचल तारेहि बरेच आहेत. ग्रहांच्या गुणधर्मांप्रमाणें अचल ताऱ्यांचींहि फलें पाहण्याचा प्रघात आहे. गणकभास्कर कै. **नवाथे** यांनीं **नाक्षत्र-फल** या पुस्तकांत त्यांच्या गुणधर्मांचें वर्णन केलें आहे, व त्यांचीं फलेंहि दिलीं आहेत. सवडीनुसार अचल ताऱ्यांसंबंधींचें स्वतंत्र पुस्तक लिहिण्याचा विचार आहे, व तें लवकरच प्रसिद्ध व्हावें, अशी अपेक्षा आहे. योग केव्हां येईल तें पहावें !

## क्रूर नक्षत्रांचीं द्वादशभावगत फलें.—

जन्मलग्न-कुंडलीमध्यें क्रूर नक्षत्रें ज्या भावामध्यें पूर्ण असतात त्या भावासंबंधीं तीं अनिष्ट फलें उत्पन्न करितात.

**लग्नांत**—क्रूर नक्षत्र असून त्यावर पापग्रह असल्यास शारी-

रिक पीडा, अपघात होणें, रोग जडणें, वगैरे पाप-ग्रहांच्या गुणां-प्रमाणें फल मिळतें; व गोचरीचा एखादा ग्रह क्रूर नक्षत्रांतून वक्री वा स्तंभी होत असल्यास आजार, अपघात, कष्ट, वगैरे फल मिळतें.

**द्वितीयस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास कुटुंबांत झगडे, तंटे व द्रव्यासंबंधीं जिकीरींत दिवस जाणें, नवराबायकोचें सुख-दुःख, द्रव्यसंचय न होणें, विद्या—बुद्धि कमी, अविचारी भाषण करणें इ. आणि त्या नक्षत्रांत मूळचा एखादा पापग्रह असल्यास वाईट फलाला जास्त ऊत येतो. वक्री वगैरे असल्यास धनस्थानांतील फलासंबंधाची हानि करितो; व गोचरीच्या पापग्रहाचें भ्रमण होत असल्यास ती वेळ म्हणजे वाईट फलासंबंधीचा काल समजावा.

**तृतीयस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास बंधुभागिनी, पराक्रम, खटपट, प्रयत्न, औषधीक्रिया वगैरेसंबंधीं बाधकत्व व बंधुसुख कमी; भयंकर साहस करणारा, खून-मारामाऱ्या वगैरे, वेळीं विष-प्रयोगाची बुद्धि होणें. क्रूर नक्षत्रावर मूळचा पापग्रह असल्यास तृतीय भावाच्या फलासंबंधीं हानि करितो व त्याच वेळेस पाप-ग्रहाचें भ्रमण झाल्यास नाशकारक होतें.

**चतुर्थस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास स्थावर इस्टेट, शेती, घर, बागाईत, आई, स्वतःची उन्नति, मित्र, वाहनांचें सुख, वगैरेसंबंधींचा विचार उत्पन्न होतो. क्रूर नक्षत्र असून त्यांत पापग्रह असल्यास तो त्याच्या कारकत्वासंबंधीं हानिकारक होतो. गोचरीनें पापग्रह भ्रमण करीत असल्यास घर, शेतीवाडी, गहाण व विक्री, आईचा मृत्यु, सुखांत आपत्तिकारक प्रसंग किंवा सुखास कायमचेंच आंचवणें वगैरे होतात.

**पंचमस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास पुत्रसंतति, बुद्धिमत्ता, विद्या, शास्त्र, गर्भ वगैरेसंबंधीं हानिकारक फलें येतात. त्यांत पाप-

ग्रह असल्यास जास्त जोर येतो व त्यांतूनहि पापग्रहाचें भ्रमण व त्यांत तो स्तंभी वक्री इ. झाल्यास परीक्षेंत अपयश, गर्भपात, संततीवर संकटें, स्वतःच्या चुका होणें, मित्रापासून फसवणूक वगैरे म्हणजे पंचमस्थानच्या सर्व कारक गोष्टींची हानि होते.

षष्ठस्थानांत—क्रूर नक्षत्र असल्यास शत्रु, मातुलसुख, जनावरें, रोगविचार, उपदंश, दीर्घकाल टिकणारे रोग, नौकरचाकर, यांचा विचार पडतो. या स्थानीं क्रूर नक्षत्रांत पापग्रह असल्यास शत्रु उत्पन्न होतात; आप्तइष्ट बुडवितात, नौकरचाकर यांत बेबनाव, पापग्रह ज्या गुणधर्मांचे असतील त्या गुणांप्रमाणें रोग जडतात. उपदंश, मूळव्याध, वगैरे कायमचे रोग उत्पन्न होतात. गोचरीच्या ग्रहांचें भ्रमण चालू असल्यास त्या कालांत वरील गुण हटकून प्रत्ययास येतात. मंगळ व शनि क्रूर नक्षत्रीं असल्यास दीर्घकाल टिकणारे रोग व भयंकर झगडे वगैरे होतात.

सप्तमस्थानांत—क्रूर नक्षत्र असल्यास स्त्रीसुख, विवाह, दुकानदारी, कोर्टांतील खटले, चोरी, प्रवास, भागीदार वगैरेंवर त्याचा परिणाम होतो. क्रूर नक्षत्र बलवान् असल्यास स्त्रीसुख मिळत नाहीं. काडीमोड व झगडे वगैरे होतात. व्यापारांत तूट व भागीदारांशीं बेबनाव, तंटे-झगडे, फसवणूक इ. घडून येतात. क्रूर नक्षत्रांत एकादा पापग्रह वक्री असल्यास स्त्रीसुखांत व्यत्यय व तंटे-झगडे, विनाकारण प्रवास वगैरे सर्व संकटमय गोष्टी होतात. त्यांतून निभावणें फारच कठिण जातें. त्यांत गोचरीचा एखादा पापग्रह वरील नक्षत्रांतून भ्रमण करीत असल्यास अधिकच संकटें उत्पन्न होतात. वरील योग स्त्रियांस फारच वाईट आहे. पतिसुख नसतें; पातिव्रत्य राहणें कठीण जातें; वैधव्ययोगासारखे योग येतात. एकूण चोहों-

बाजूनें संकटमय स्थिति उत्पन्न होते. चंद्र व शुक्र क्रूर नक्षत्रीं असल्यास स्त्रियांना फार वाईट.

**अष्टमस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास मृत्यूसारखे प्रसंग व आजार, गुह्यरोग, विषारी जनावरांची पीडा, मृत्युपत्राचें धन, अकल्पित द्रव्य-प्राप्ति, लांच खाणें वगैरे वगैरे गोष्टी होतात. क्रूर नक्षत्रांत पापग्रह असल्यास मृत्युप्रद वेदना, सर्प-विंचु-वाघ वगैरे जनावरांच्या दंशांतून पार पडणें, वारसा न मिळणें, वारशांत झगडा उत्पन्न होणें, अकल्पित प्राप्तीचा प्रसंग असून तो न साधणें, सट्टे व रेसेस यांत नुकसानी इ. ओढवतात. त्याच नक्षत्रांत एखादा गोचरीचा ग्रह भ्रमण करीत असल्यास वरील योगाला जास्तच पुष्टि मिळते. मृत्यु येतो, हुंडा व स्त्रीच्या मालकीचें द्रव्य सर्व खर्ची पडतें, संकटमय स्थिति प्राप्त होते. शनीचें क्रूर नक्षत्रांतून भ्रमण व तो वक्री, स्तंभी, असा योग असल्यास मृत्यु, जाळपोळ, बुडणें, अपघात होणें, वगैरे वगैरे सर्वच संकटमय होतें. शनि व मंगळ हे क्रूर नक्षत्रीं असल्यास फारच मारक होतात.

**नवमस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास धर्म, धर्मश्रद्धा, लौकिक, स्वतःचें भाग्य, भाग्योदय, नातवंडें, वडिलांच्या मृत्यूचा विचार, तीर्थयात्रा, धर्मकृत्यें वगैरेंवर परिणाम होतो. नुसतें क्रूर नक्षत्र असल्यास वरील सर्व कार्यांत साधारण अडथळे येतात व त्रासानें कार्य होतें. क्रूर नक्षत्रांत एखादा पापग्रह असल्यास धर्मावर श्रद्धा नसते. लौकिकाची चाड रहात नाहीं. अभागी—नोकरींत प्रमोशनचें तर नांवच नसतें! प्रत्येक कार्याला प्रथमपासूनच अडथळा सुरू होतो. अशाच स्थितीमध्यें पुन्हां एखादा गोचरीचा पापग्रह—शनि, मंगळ, राहु, हर्शल, वगैरे आल्यास स्वतःस अब्रूची चाड रहात नाहीं, धर्मांतर करण्याची पाळी अथवा धर्मभ्रष्टता, नांवलौकिक जाणें,

भाग्यास उतरती कळा लागणें, वडिलांचा मृत्यु, वगैरे अनिष्टें ओढवतात. या स्थानीं मूळ, मघा व भरणी हीं नक्षत्रें मात्र कर्तृत्व-शक्ति देणारीं व भाग्यास नेणारीं आहेत. ह्या तीन नक्षत्रांतून शुभ-ग्रहाचें भ्रमण असल्यास सर्व भाग्यकारक गोष्टींस जोर चढतो.

**दशमस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास कर्म, पितृसुख, धंदा, अधिकार, राज्यप्राप्ति, अब्रू, मान-मरातब, मुत्सद्दीपणा, ह्यांसंबंधीं विचार उत्पन्न होतो. दशमांत क्रूर नक्षत्र बलवान् असून त्यांत पापग्रह असल्यास प्रत्येक कामांत व्यत्यय येतो; व गोचरीचाहि एखादा पापग्रह त्यांतून भ्रमण करीत असल्यास किंवा पापग्रहांची युति होत असल्यास धंदा बुडतो, अब्रू जाते, अधिकार नष्ट होतो, पितृसुख लागत नाहीं, प्रत्येक कामांत अपयश येतें. बाकी नुसतें क्रूर नक्षत्र असल्यास मनुष्य धडाडीनें कार्य करणारा व धैर्यवान्, पुढें सरसावणारा, प्रसिद्धीस येणारा, असा असतो. शुभग्रह असतां कार्यास धडाडीनें सुरवात करितो, परंतु कार्याचा शेवट गोड होत नाहीं. शेवटीं शेवटीं कार्य बिघडतें व अपयश येतें. पदभ्रष्ट वगैरे होण्याचा योग येतो. सूर्य, शनि, मंगळ हे क्रूर नक्षत्रीं असल्यास अब्रूवर घाला, पदभ्रष्टता, अधिकार नष्ट होणें वगैरे होतात. शुभग्रह असल्यास थोडासा सौम्यपणा येतो.

**एकादशस्थानांत**—क्रूर नक्षत्र असल्यास लाभ, प्राप्ति, मिळकत, ऐश्वर्यलाभ, वाहनसुख, द्रव्यप्राप्ति वगैरे वगैरे विचार उत्पन्न होतात. क्रूर नक्षत्रीं पापग्रह असल्यास लाभ होण्यांत व्यत्यय, मैत्रींत वितुष्ट, ऐश्वर्यहानि, व मित्रांची गोड बोलून फसवणूक. एखादा पापग्रह व शुभग्रह असल्यास मित्र संभावितपणा दाखवून त्रासवितात किंवा बुडवितात. विश्वासघात, नौकरीमध्यें प्रमोशनला चाट, बाहेरील येणें बडणें, इ. होतात. मिळकतींत बऱ्याच उलाढाली होतात. द्रव्य

लाभाची जन्मभर काळजी असते. राजा असला तरी मनासारखें ऐश्वर्य मिळत नाहीं. असा बराचसा दोष राहतो. शुभग्रह असल्यास अर्धवट प्राप्ति, प्रत्येक लाभासंबंधीं थोडेंबहुत प्राप्त व्हावें, बाकीचें बुडीत खातें! अशा प्रकारचा योग अनुभवास येतो. लाभांत चंद्र, बुध, शुक्र, गुरु, हे चार उत्तम असतात. बाकी पापग्रह चांगले नाहींत.

द्वादशस्थानांत—क्रूर नक्षत्र असल्यास व्यय, कर्जबाजारीपणा, शिक्षा, कैद, गहाळ होणें, सर्व तऱ्हेचा खर्च, मृत्यूनंतर मोक्ष अथवा नरक वगैरेंचा विचार उत्पन्न होतो. क्रूर नक्षत्रीं पापग्रह असल्यास जन्मभर कर्जबाजारीपणा राहतो व त्यांत स्तंभी, वक्री इ. असल्यास विनाकारण द्रव्यव्यय, अनाठायीं पैसा बुडणें, ठेवी गहाळ होणें, पूर्ण दिवाळखोर होणें, भिकेस लागणें, शिक्षा, कैद व चौरी वगैरे करणें अथवा लोकापवाद येणें, रोगाचा परिणाम मृत्यूंत होणें; हातची सर्व इस्टेट गमावणें, कर्ज वगैरे दुसऱ्यास दिलेलें द्रव्य परत न येणें; मृत्यूच्या वेळचे आजार व यातना इ. अनिष्ट गोष्टी होतात. शुभग्रह असल्यास मध्यम फल. क्रूर नक्षत्र व्ययांत ठीक नाहीं. शुभनक्षत्र व देव-नक्षत्र ठीक असतें.

### साधारण योग ( नक्षत्राच्या चरणपरत्वें ).

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लाभयोग. | ६० अंश | १ ल्या चरणापासून. | १८ वे | न. चरण |
| केंद्र ,, | ९० ,, | १ ,, ,, | २७ वे | ,, |
| त्रिकोण ,, | १२० ,, | १ ,, ,, | ३६ वे | ,, |
| ६-८ योग | १५० ,, | १ ,, ,, | ४५ वे | ,, |
| प्रतियोग | १८० ,, | १ ,, ,, | ५४ वे | ,, |

देव-नक्षत्रापासून राक्षसी नक्षत्राच्या चरणावर केंद्र वगैरे योग होत असल्यास योग पूर्ण होत नाहीं. तंटे-झगडे व नाशकारक गोष्टी होतात.

राक्षसी नक्षत्रापासून देव-नक्षत्रावर योग होत असल्यास तो याग तंट्या-झगड्यांनीं लाभ-दायक म्हणजे आधीं कडू व शेवट गोड असा होतो. उदा०—कृत्तिका नक्षत्राच्या द्वितीय चरणापासून पुनर्वसूच्या ३ ऱ्या व ४ थ्या चरणावर एखादा शुभग्रह लाभयोग करीत असल्यास शेवट आधीं कडू व नंतर गोड असा होतो.

मनुष्यनक्षत्रा पासून राक्षसी नक्षत्रावर योग होत असल्यास शेवट भयंकर होतो. अशा योगावर दिलेली ठेव व रक्कम बुडते. विश्वास-घात, खून, मारहाण, वगैरे होतात. उदाहरणार्थ—रोहिणी नक्षत्रापासून मघा ह्या राक्षसी नक्षत्रांत केंद्रयोग होतो. असा योग व त्यांत पापग्रह राक्षसी नक्षत्रांत आल्यास अशुभ समजावें.

याच्या उलट राक्षसी नक्षत्रापासून मनुष्य-नक्षत्रावर योग असल्यास त्रासदायक आणि दगदगीनें व काबाडकष्टानें लाभ होतो; आणि जिकीरींत दिवस जातात.

देव-नक्षत्रें व मनुष्य-नक्षत्रें चांगलीं व उत्तम फलें देतात. तीं शुभकारक होतात. प्रत्येक योगांत योगापासून व योगापर्यंत शुभनक्षत्र व पाप-ग्रह ह्यांची सांगड कशी आहे, याचा विचार करावा. प्रत्येक नक्षत्रांतून प्रत्येक ग्रहाचें भ्रमण शुभ अथवा अशुभ, याचा विचार करावा. एकाच राशींत अशुभ, शुभ अशीं मिश्र नक्षत्रें असतात. तरी त्यांचा विचार अंशावरून गुण पाहण्यापेक्षां नक्षत्राच्या गुणधर्माप्रमाणें केल्यास ग्रहांचे धर्म व नक्षत्रांचे धर्म यांचा विचार सहज लक्ष्यांत येतो व त्यायोगें फलित फारच सोपें जातें.

**मनुष्य-नक्षत्रांत**—शुभग्रह चांगलीं फळें देतात व नपुंसक ग्रह मध्यम फलें देतात. पाप-ग्रह प्रत्येक कार्याचा नाशक आहे.

**देव-नक्षत्रांत**—शुभग्रह असल्यास फलें उत्तम, जोरदार व शुभफलदायकच होतात; आणि फलाला योग्य असा ओघ योग्य

वेळीं येतो. लाभयोग असल्यास लाभ उत्तम प्रकारें होतो. केंद्रयोग–सुख, प्रवास, धंदा व शरीरसौख्य; आणि राजयोगासारखे योग उत्तम फलें देतात. त्यांचा शेवट व प्रारंभ उत्तमच असतो. उलट, देवनक्षत्रांत क्रूर ग्रह–मंगळ, हर्शल, शनि वगैरे असल्यास प्रत्येक योगाचा शेवट कष्टसाध्य व त्रासदायक होतो. झगडे व दगदगीचे प्रसंग येतात आणि सर्व योग अर्धवट येतात. मनासारखा एकहि लाभ किंवा कार्य होत नाहीं व त्याचा परिणाम मनावर होऊन जिवाला फार कष्ट होतात.

**राक्षसी नक्षत्रांत**–शुभग्रह फळें अगदींच टाकाऊ देतात असें नाहीं. 'परंतु दगडापेक्षां वीट मऊ' या नात्यानें कठीण प्रसंग आल्यास त्यांतून कष्टानें निभावून नेतात, एवढेंच. स्त्रीग्रह किंवा नपुंसक ग्रह असल्यास कार्यनाशक होतात. कोणतेंहि कार्य सुरू केल्यास साधारणपणें त्याचा शेवट कांहीं चांगलासा होत नाहीं. अशुभ फलें ठेवलेलीं. राक्षसी क्रूर नक्षत्रांत पापग्रह असल्यास कार्यनाश होतो. कार्याचा आरंभ व शेवट सर्वच कार्य खटखटीनें होतें. कार्याचा शेवट भयंकर होतो. क्रूरपणासारखीं फलें प्राप्त होतात. खून, मारहाण, अपघात, दगलबाजी, चोरी वगैरे वाईट फलें प्राप्त होतात. एकंदरींत शेवट चांगला होत नाहीं. त्या त्या नक्षत्रांत असलेल्या ग्रहाच्या धर्माप्रमाणें फलें मिळतात. याचा अनुभव जिज्ञासू वाचकांना त्यांनीं नाक्षत्रिक कुंडली पाहण्याचा अभ्यास ठेविल्यास सहज मिळण्यासारखा आहे. अस्तु.

समाप्त.

## नाक्षत्रिक कुंडलीचा* खुलासा.

### श्रीशिवाजीमहाराजांचे सायन ग्रह

| | | अं. क. | | |
|---|---|---|---|---|
| लग्न—कर्क | | ६—७ | | |
| सू. | मेष | २५—४९ | कृत्ति. | १ |
| चं. | वृषभ | १६—२५ | रोहि. | २ |
| मं. | कुंभ | २५—४६ | पू.भा. | २ |
| बु. | वृषभ | ९—१७ | कृत्ति. | ४ |
| गु. | धन | ०—५ | मूळ | १ |
| शु. | कुंभ | ११—५२ | शतता. | २ |
| श. | कन्या | २३—३८ | चि.व. | १ |
| रा. | सिंह | १३—३३ | पूर्वा. | १ |
| के. | कुंभ | १३—३३ | शतता. | ३ |
| ह. | सिंह | २७—२८ | पूर्वा. | ४ |
| ने. | तूळ | २९—३० | विशा. | ३ |

प्रथम सर्व ग्रहांचे स्पष्ट ग्रह (सायन अथवा निरयन) करून घ्यावेत व मागील कोष्टकांत सूर्य मेष राशीचा २६-४९ म्हणजे कृत्तिका नक्षत्राच्या प्रथम चरणीं आहे, असें समजावें.


लग्न कर्क राशीचें ६ अं. ७ कला आहे. व कोष्टकांत वरील अंश पुष्य नक्षत्राच्या प्रथम चरणांत येतात आणि कुंडलींतील प्रत्येक भाव ९ चरणांचा पूर्ण होतो, म्हणून पुष्याचे ४ चरण व आश्लेषाचे ४ चरण व मघा १ चरण मिळून प्रथम भाव पूर्ण झाला. आणि द्वितीय भाव मघाच्या दुसऱ्या चरणापासून म्हणजे मघाचे २ चरणापासून सुरू झाला असें समजावें. कुंडली पहा. नक्षत्राच्या पुढें मांडलेले अंक चरणांक आहेत व ग्रहांच्या पुढेंहि नक्षत्रांचे चरणांक आहेत.

---

* ज्योतिर्माला वर्ष ९ अंक ३–४ यांत श्रीशिवाजीमहाराजांची सायन कुंडली व तिचें वर्णन आहे, परंतु तींत बराच फरक आहे. त्यांत जन्म ता. १० एप्रिल सन १६२७ आहे.

# श्रीछत्रपती शिवाजी महाराज

## यांची सायन नाक्षत्रिक कुंडली.





श्रीशिवाजीमहाराजांचा जन्म ता. १७ माहे एप्रिल सन १६२७ सकाळीं १० वाजून १० मिनिटें. ह्या जन्माबद्दल मतभेद आहे. तरी तूर्त वरील तारिखच धरून कुंडली दिली आहे. ही कुंडली योगमाला (नवाथे कृत) यांतून सायनची घेतली आहे. जिज्ञासूंनीं ती मूळ कुंडली पहावी.

---

# कै. लोकमान्य बा. गं. टिळक

यांची सायन नाक्षत्रिक कुंडली. जन्म ता. २३ जुलै १८५६ इ.
इ. घ. ६।५ शके १७७८ आषाढ व. ६

लग्न सिंह ७।४०
मघा तृतीय चरण
र. सिं. ०।१८
चं. मेष १।३१
मं. तूळ २५।३०
बु. कर्क १३।१
गु. मेष १।७
शु. सिं. ११
श. कर्क ७।१६
रा. मेष ११।१८
के. तूळ ११।१८
ह. वृषभ २४।२४
ने. मीन २०।२२ R




वरील कुंडली ज्योतिर्माला सन १९१८ वर्ष ४ अंक ९ यामधून घेतली आहे व त्याचें वर्णन श्री. दाजी नागेश आपटे B.A.LL.B बडोदें यांनी केलें आहे तें जिज्ञासूंनीं अवश्य पहावें. व त्यावर ज्योतिर्मालाकारांनींहि पुढें २-४ वर्षांच्या अंकांत लो. टिळकांचे ग्रह व कुंडली देऊन माहिती दिली आहे तीहि पहावी.


---///---

# महात्मा गांधी यांची सायन नाक्षत्रिक कुंडली.

लग्न तूळ २७।४४
सायन

र. स्वाती १ चरण
चं. पूर्वा ३ "
मं. ज्येष्ठा १ "
बु. अनुराधा १ "
गु. रोहिणी ४ "
शु. अनुराधा ४ "
श. मूळ ४ "
रा. मघा २ "
के. धनिष्ठा ४ "
ह. आश्लेषा २ "
ने. भरणी २ वक्री


—॥—




जन्म शके १७९१ भाद्रपद कृ. १२ शनिवार इ. घ. ३।२२ ता. २ आक्टोबर १८६९ जन्मस्थळ पोरबंदर. वरील सायन कुंडली कै. नवाथे यांचा जातकसंग्रह भाग २ अ. २ रा. ता. १९।१२-१९२१ या अंकांतून घेतली आहे. त्यांत त्याचें विवरण आहे तें पहावें.

---

हें पुस्तक प्रेसमध्यें असतां महात्मा गांधी यांची तुरुंगांतून सोमवार ता. ८ मे सन १९३३ रोजीं रात्रौ ९ वाजतां बिनशर्त मुक्तता झाल्याची अमृतवार्ता आली तेव्हां पासूनच महात्मानींचें फिरून ता. २८ मे पर्यंतचें स्वहतर प्रायोपवेशन सुरू झालें तें सोमवार ता. २९ रोजीं १२ वाजून २० मि. नींयशास्विलेनें पार पडलें. ज्योतिष-जिज्ञासूंच्या मनरंजनार्थ सुटकेची कुंडली देत आहों.



# नेपोलियन बोनापार्ट

## -सायन नाक्षत्रिक कुंडली-


### जन्म ता. १५ ऑगस्ट स. १७६९ सकाळीं ९-२२

लग्न तूळ २७।०

—x—

र. सिं. २२।४४
चं. मकर २८।५
मं. कन्या ११।५७
बु. सिं. ६।२
गु. वृश्चिक १५।९
शु. कर्क ७।०
श. कर्क २५।४६
रा. धन २३।२७
के. मिथुन २३।२७
ह. वृषभ १२।३१
ने. कन्या १०।१

—॥—




वरील कुंडली योगमाला (नवाथे) यांतून घेतली आहे. त्यांत त्याचें साधारण चरित्र व ग्रहयोग यांचें वर्णन दिलें आहे व हर्शल-नेपच्युन पुस्तकांतहि सायन प्रमाणेंच वर्णन केलें आहे.

—॥—

# रशियाचा झार बादशहा.


## -जन्म ता. १८ मे सन १८६८ इ.-

## - सायन नाक्षत्रिक कुंडली -

लग्न कन्या ८।३२

| | | |
|---|---|---|
| र. | वृषभ | २७।४१ |
| चं. | मेष | १।५० |
| मं. | मेष | २७।४१ |
| बु. | मिथुन | १।३५ |
| गु. | मेष | ६।० |
| शु. | कर्क | १२।३८ |
| श. | धन | २।४६ |
| रा. | कन्या | ०।१ |
| के. | मीन | ०।१ |
| हृ. | कर्क | १०।२८ |
| ने. | मेष | १६।२२ |

—॥—




झार बादशहाची कुंडली के. नवाथे यांचे कुंडली विज्ञान अंक ११ ता. २५ आक्टोबर स. १९२६ वर्ष १४ पहा. त्यांत त्याची चरित्रात्मक कुंडली व त्याचा शेवट वगैरे दिला आहे आणि "हर्शल नेपच्युन" यांचेंहि फलवर्णन दिलें आहे.

———॥———

# जर्मनीचा कैसर बादशहा (महायुद्धाचा उत्पादक)


## ~ जन्म ता. ७ जानेवारी सन १८५९ इ. ~

## ~ सायन नाक्षत्रिक कुंडली ~

लग्न कर्क ११।५५

र. कुंभ ७।१
चं. वृश्चिक २६।४८
मं. मीन २६।४१
बु. मकर १३।२७
गु. मिथुन ११।४१ R
शु. धन २४
श. सिं. १।२ R
रा. मीन १।४१
के. कन्या १।४१
ह. वृषभ २१।३४ R
ने. मीन २२।५७

—॥—




वरील कुंडली 'हर्शल व नेपच्यून' या पुस्तकांतून घेतली आहे. त्याचें वर्णन त्या पुस्तकांत आहे.

—॥—

# श्री. बाळासाहेब पंत प्रतिनिधि, सं. औंध.


जन्म शके १७१० कार्तिक शु. ९ शनिवार ता. २४ आक्टोबर १८६८ रात्रौ ९।३० वा.

## ~ सायन नाक्षत्रिक कुंडली ~

लग्न कर्क ३।१२

| | | |
|---|---|---|
| र. | वृश्चिक | १।३३ |
| चं. | कुंभ | ३।३० |
| मं. | सिंह | १२।१३ |
| बु. | वृश्चिक | २१।५४ |
| गु. | मेष | ६।२२ व |
| शु. | कन्या | १७।३४ |
| श. | धन. | ४।५ |
| रा. | सिंह | २२।२० |
| के. | कुंभ | २२।२० |
| ने. | मेष. | १५।२१ |
| ह. | कर्क. | १७।३३ व |

— /// —




वरील कुंडली सायन प्रमाणें "कुंडली विज्ञान" अंक १२ वा ता. २५।११।२६ वर्ष १४ वें यांतून घेतली आहे. तिचें वर्णन त्यांत आहे तें पहावें.

—— /// ——

# श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, बडोदें.

## जन्म ता. ११ मार्च सन १८६३ रात्रौ २।१३ वा.


## ~ सायन नाक्षत्रिक कुंडली ~

लग्न मकर ३।२९

—— ॥ ——

सू. मीन. २०।२५
चं. धन १।५८
मं. मिथुन ३।२६
बु. कुंभ २३।१०
गु. कन्या
शु. मेष. ११।४७
श. तूळ १।३१
रा. धन ११।५
के मिथुन ११।५
ह. मिथुन १६।५०
ने. मेष ३।१०

—— ० ——




ही कुंडली "हर्शल व नेपच्युन" या पुस्तकांतून सायन-पध्दतीप्रमाणें घेतली आहे. त्याचें वर्णन त्या पुस्तकांत आहे तें पहावें.


—— ॥ ——

# श्री. लक्ष्मीबाई राणीसाहेब, झांशी. (सन १८५७)

## जन्म ता. १९ नोव्हेंबर सन १८३५ सकाळीं ४-४९ मि.

## - सायन नाक्षत्रिक कुंडली -

| | | |
|---|---|---|
| लग्न | तूळ | २३।२४ |
| सू. | वृश्चिक | २५।५५ |
| चं. | वृश्चिक | ७।५५ |
| मं. | धन | ६।२५ |
| बु. | वृश्चिक | १०।१९ |
| गु. | कर्क | १५।१ |
| शु. | वृश्चिक | १०।४३ |
| श. | तूळ | २८।० |
| रा. | वृषभ | २९।११ |
| के. | वृश्चिक | २९।११ |
| ह. | कुंभ | २७।३५ |
| ने. | कुंभ | १।६ |




ही कुंडली 'हर्शल व नेपच्युन' पुस्तकांत सायन पद्धतीनें दिली आहे. त्यांतून ही घेतली आहे.

---॥---

# श्रीमत् शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी). करवीर

## - जन्मशके १८०१ वैशाख कृ. १४ ता. २० मे सन १८७९ -


## - सायन नाक्षत्रिक कुंडली -

लग्न कर्क ३।१०

—०—

सू. वृषभ २८।४१
चं. वृषभ १६।२१
मं. मीन १५।४५
बु. वृषभ ३।३८
गु. मीन ९।५३
शु. कर्क ७।५
श. मेष १२।१८
रा. मकर २७।५७
के. कर्क २७।५७
ह. कन्या ०।१९
ने. वृषभ ९।३३

—०—




ही कुंडली 'जातक संग्रह' (कै. नवाथे) भाग २ संग्रह १०१ ता. २० मार्च सन १९२२ या अंकांत आली असून त्यांत कुंडलीचें चरित्रात्मक विवरण आलें आहे तें वाचकांनीं पहावें.

— ।।। —


# श्रीबाजीरावपटवर्धन (प्रसिद्धमहाडकरज्योतिषी.)

## ~ जन्म ता. २४ मे सन १८६५ ~

## ~ सायन नाक्षत्रिक कुंडली ~

लग्न धन २७।४६

| | | |
|---|---|---|
| सू. | मिथुन | ३।१० |
| चं. | वृषभ | २१।२० |
| मं. | सिंह | ०।१ |
| बु. | वृषभ | १०।० |
| गु. | धन | २६।० |
| शु. | वृषभ | १।६ |
| श. | तूळ | २४।० |
| रा. | तूळ | २८।० |
| के. | मेष | २८।० |
| ह. | मीन | २७।४५ |
| ने. | मेष | ९।० |




हीकुंडली "योगमाला" (कै. नवाथेकृत) यांतून घेतली आहे.


# कै. गणक भास्कर विष्णु गोपाळ नवाथे, ज्योतिषी.

## — जन्म ता. २६ मे सन १८६८.

## — सायन नाक्षत्रिक कुंडली —

लग्न कुंभ २७।३७

| | | |
|---|---|---|
| सू. | मिथुन | ६।९ |
| चं. | सिंह | ६।४२ |
| मं. | वृषभ. | ३।० |
| बु. | मिथुन. | १८।० |
| गु. | मेष | ७।३३ |
| शु. | कर्क | १८।५० |
| श. | धन | २।१०R |
| रा. | कन्या | १।१८ |
| के. | मीन. | १।१८ |
| ह. | कर्क | १०।५२ |
| ने. | मेष | १६।० |




"कुंडली विज्ञान" अंक ६ वर्ष १४ ता २५-५-२६ यांत चरित्रात्मक कुंडली दिली आहे ती पहावी.


— ॥ —

# कै. हरि नारायण आपटे (कादंबरीकार)

## – जन्म ता. ८ मार्च १८६४ रात्रीं १-४४ –

## – सायन नाक्षत्रिक कुंडली –

लग्न मकर ३।८
सू. मीन १७।३४
चं. मीन १३।२३
मं. मकर २९।१८
बु. कुंभ २५।१२
गु. वृश्चिक २७।३२
शु. कुंभ १३।४८
श. तूळ १७।४५
रा. वृश्चिक २१।५५
के. वृषभ २१।५५
ह. मिथुन २१।२५
ने. मेष ५।५




ही कुंडली कै. नवाथे यांच्या 'जातकसंग्रहा' वरून भाग २ संग्रह १ ता. ९।१२।२१ वरून घेतली आहे. त्यांत त्यांची चरित्रात्मक कुंडली दिली आहे.


# श्री. नारायण श्रीपाद राजहंस (बालगंधर्व)

## - जन्म ता. २६ जून १८८८ संध्याकाळीं ६ वा. -

## - सायन नाक्षत्रिक कुंडली -

लग्न धन २८।२६

सू. कर्क. ५।१९
चं. कुंभ १०।३९
मं. तूळ १८।५०
बु. कर्क २२।५३ R
गु. वृश्चिक २७।३६ R
शु. कर्क. १।५
श. सिंह ५।३२
रा. सिंह १।४८
के. कुंभ १।४८
ह. तूळ १३।८
ने. मिथुन १।५




ही कुंडली के. नवाथे यांच्या जातक संग्रह भाग २ संग्रह ३ ता. ३१।१२।२१ यांतून घेतली आहे. त्यांत त्यांची चरित्रात्मक कुंडली दिली असून चित्ताकर्षक गुण वगैरेंचें वर्णन आहे तें वाचकांनीं अवश्य पहावें.

# पिता. (एक मध्यम स्थितींतील गृहस्थ व त्याचा पुत्र*)

जन्म ता. २८ सप्टेंबर १८९३ रात्रौ १ वा. शके १८१५ भाद्रपद कृ. ४ गुरुवार

## - सायन नाक्षत्रिक कुंडली -

लग्न कर्क २६।१

सू. तूळ ५।५२

चं. वृषभ १४।५१

मं. कन्या २७।४३

बु. तूळ १२।२८

गु. मिथुन १।२० R

शु. वृश्चिक १४।२

श. तूळ १४।३५


रा. मेष २०।१०

के. तूळ २०।१०

हृ. वृश्चिक ८।५५

ने. मिथुन १३।३१ R

—॥—




सोबत स्वतंत्र पानावर थोडेंसें चरित्र दिलें आहे तें पहा.

—॥—

* कुंडली पुढील पानावर.


# पुत्र. (नांव वसंत.)

जन्म कार्तिक शु. ११ श. १८५२ ता. २/३ नोव्हेंबर १९३० रात्रौ २।३५

## - सायन नाक्षत्रिक कुंडली -

लग्न कन्या १६।२६

सू. वृश्चिक १।४३
चं. मीन २८।४५
मं. सिंह ५।५७
बु. वृश्चिक ७।५
गु. कर्क २०।२८
शु. धन ७।२३ R
श. मकर ७।३२
रा. मेष २२।४५
के. तूळ २२।४५
ह. मेष १२।२२ R
ने. कन्या ५।२५




— /// —

सदर कुंडली फॉर्मच्या छपाईचें ठिकाण:- डेक्कन प्रिंटिंग वर्क्स, पुणें २

# थोडेंसें चरित्र.

जन्म उच्च स्थिति असतांना झाला. २।३ वर्षांचा झाल्यावर वडील मरण पावले. पुढें आजोबांनीं सांभाळ केला. १३ व्या वर्षीं लग्न झालें. १६ वे वर्षीं आई मरण पावली. २१ व्या वर्षीं आजा मरण पावला, व नवराबायकोच्या संसारास सुरुवात झाली आणि एकाच वर्षांत सर्व इस्टेट वगैरे गमावून बसला व स्वतंत्र धंदा करूं लागला. २९ व्या वर्षीं तीर्थयात्रा म्हणजे बद्रिनारायणाची सफर केली. पुढें स्वतःपुरतें कमावून उदरनिर्वाह करूं लागला व ता. १६।१०।१९३०-आश्विन कृ. ९ श. १८५२ रोजीं १५।२० हजारांची वडिलार्जित गेलेली स्थावर इस्टेट परत मिळाली म्हणजे हा मुलगा जन्मण्याच्या आधीं १६ दिवस सर्व इस्टेट हातीं आली. हा वेळपर्यंत ३ मुली व ५ मुलगे झाले. त्यांतून पहिली मुलगी मृत आहे. हा मुलगा ८ वा आहे. धर्माकडे खर्च पुष्कळ झाला आहे. पुष्य नक्षत्र व्ययांत आहे. व तेंच नक्षत्र मुलाच्या लाभांत उदय पावत आहे; व त्याप्रमाणें गेलेली सर्व इस्टेट परत १६।१७वर्षांनीं मिळाली. हा योगायोग और आहे. दशमांत भरणी व कृत्तिका नक्षत्र आहे. म्हणून अधिकारीवर्गाशीं न पटणें व स्वतंत्र विचाराचा.

फलज्योतिषावरील नवीन ग्रंथ! विक्रीस तयार!

# कालनिर्णयपद्धति

अथवा

## जातकचंद्रिका-टीका

— लेखक —

डॉ. काशिनाथ विष्णु माणगांवकर, L. C. P. S.

'होराशास्त्र' कर्ते

**ज्ञानप्रकाश (२१-४-३३)**:—जन्मकुंडलीवरून फलित वर्तविणें हाच या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय आहे. कुंडलीवरून आयुष्यांत घडणारे शुभाशुभ योग काढणें व योग घडवून आणणारे काळ ठरविणें असे या शास्त्रेचे दोन भाग आहेत. प्रस्तुत पुस्तकांत योगफलाचा काळ कसा निर्णित करावा याचेंच विवेचन असल्यानें यास कालनिर्णयपद्धति हें नांव देण्यांत आलें आहे. यांतील एकंदर ७८ श्लोकांवर विवरणात्मक टीका देण्यांत आली आहे. आणि ती देतांना निरनिराळ्या सिद्धांताचें विशदीकरण व्हावें यासाठीं कित्येक व्यक्तींच्या कुंडल्याहि यांत देण्यांत आल्या आहेत.

वि. ग. भागवत आणि मंडळी,

बुकसेलर्स, पुणें, नं. २.

सन १९३३ ] [ किंमत १२ आणे

डॉ. काशिनाथ विष्णु माणगांवकरकृत

# होराशास्त्र

किंमत १२ आणे.

## या पुस्तकासंबंधीं कांहीं अभिप्राय

**केसरीः**—( १-३-३२ ) प्रश्नकुंडलीच्या शुद्ध पायापासून तों प्रश्नफलाच्या कळसापर्यंत या पुस्तकांत संगतवार विवेचन केलें आहे.

**बलवंतः**—( १६-३-३२ ) प्रस्तुत ग्रंथाची रचना पाश्चात्य ज्योतिषग्रंथ आधारभत धरून केली आहे. जिज्ञासूंना मोठ्या आनंदानें हें पुस्तक संग्रहीं ठेवण्यास आम्ही शिफारस करतों.

**महाराष्ट्रः**—( १-५-३२ ) या पुस्तकांत प्रश्नकुंडली मांडण्याची मुद्देसूद माहिती, ग्रहांदिकांचे स्वभावविशेष, निरनिराळीं आवश्यक कोष्टकें वगैरे गोष्टींचें विवेचन मोठ्या टापटिपीनें आणि अभ्यासपूर्वक केलेलें आहे.

**ज्ञानप्रकाशः**—( ९-२-३२ ) प्रतिपाद्य विषयाची चांगल्या रीतीनें फोड होऊन वाचकांस त्याचा चांगल्या रीतीनें उमज पडावा, अशीच पुस्तकाची रचना करण्यांत आलेली आहे.

**यशवंत—पुणें जानेवारी १९३२ः**—ज्योतिषशास्त्रांत प्रश्नकुंडली हा एक महत्त्वाचा भाग असूनहि त्यांत असावा तितका शास्त्रीय अभ्यास नसलेल्या ज्योतिषांचीच भरभराट दिसून येते. प्रस्तुत ग्रंथांत डॉ. माणगांवकर यांनीं या भागाचें सांगोपांग विवचन केलें आहे. ग्रंथ छोटाच पण संग्राह्य आहे.

**किर्लोस्कर खबर-एप्रिल १९३२ः**—या ज्योतिषविषयक पुस्तकांत ७ प्रकरणें दिलीं असून राशींचें व ग्रहांचें स्वरूप, त्यांचे दृष्टियोग इ. माहिती दिलेली आहे व शेवटीं पाश्चात्य ज्योतिः पंडित बेथेम व क्लॉडिअस टॉलमी यांचीं सिद्धांत-शतकें देण्यांत आलीं आहेत. तद्विषयक अभ्यासंना हें पुस्तक मार्गदर्शक होईल.

फलज्योतिषाचा नवीन अपूर्व ग्रंथ विक्रीस तयार

# दैव-विचार [ किं. ८१२

लेखक--ह. ने. काटवे

## विषयानुक्रमणिका

१ उपोद्घात. २ दैव म्हणजे काय ? ३ दैवाची उत्पत्ति. ४ दैवाचा परिपाक कसा होतो ? ५ दैवाची दिशा न समजल्यामुळें चुकणारें फलज्योतिष. ६ फलज्योतिष्यांस विनंति. ७ गमतीचे विचार व ठोकताळे. ८ उपसंहार.

श्री. ज. स. करंदीकर, बी. ए., एल्एल्. बी.,
संपादक, केसरी, पुणें, यांचा अभिप्राय.

" रा. काटवे यांच्या या पुस्तकावरून ते परप्रत्ययनेयबुद्धीचे ज्योतिषी नसून स्वतंत्र विचार करण्याची धडाडी त्यांच्या अंगीं असल्याचें दिसून येतें. पत्रिकेंत कित्येक शुभयोग उघड उघड दिसत असून शुभफल कां मिळत नाहीं यासंबंधानें त्यांनीं जीं कारणें दिलीं आहेत तीं अंशत: खरीं आहेत.

रा. काटवे यांनीं लो. टिळकांच्या कुंडलीवरून सायनवाद्यांना जे प्रश्न केले आहेत आणि सायनवाद हा आग्रहमूलक असून फलज्योतिषांच्या मूलतत्त्वास तो कसा सोडून आहे याविषयीं जें विवेचन केलें आहे, तें अत्यंत मार्मिक आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं ' ज्योतिष्यांस विनंति ' म्हणून ज्या कांहीं सूचना केल्या आहेत त्या मननीय आहेत. एकंदरींत रा. काटवे यांची शोधक बुद्धि या शास्त्रांत बरीच खोल जाऊं लागली असून त्यावरून अनेक नवे शुभाशुभ योग उघडकीस येतील. "

महाराष्ट्रांतील विद्वान् व तज्ज्ञ ज्योतिषी, ग्रंथकार व प्रमुख पत्रकर्ते यांनीं दिलेले

## ' दैवविचार ' पुस्तकांवरील

# अभिप्राय

**केसरी ( २९-११-३१ )**—पुस्तक फलज्योतिषासंबंधाचें आहे. परंतु तें कोणत्याहि जुन्या ग्रंथाचें भाषांतर नसून रा. काटवे यांनीं स्वतःच्या अनुभवानें बसविलेले कित्येक नियम दिले आहेत. या पुस्तकांत दिलेले नियम सगळेच जुने असतील असें नाहीं. अर्थातच असल्या पुस्तकांतून नव्याजुन्यांची सरमिसळच असते. ज्याप्रमाणें कित्येक डॉक्टर किंवा वैद्य जुन्या ग्रंथांतल्या औषधांच्या पाठांत स्वतःच्या अनुभवानें कांहीं फेरबदल करून स्वतःचें अनुभवसिद्ध असें औषध बनवितात, त्याप्रमाणेंच काटवे यांनीं जुने ग्रंथ व स्वतःचा अनुभव यांच्या संमिश्रणानें हें पुस्तक लिहिलें आहे.

प्रास्ताविक भागांत दैव म्हणजे काय याचा ऊहापोह करून प्रत्येक प्राणिमात्राच्या पाठीशीं आठ प्रकारचें दैव लागलेलें असतें असें म्हटलें आहे व त्याला मातृकर्म, पितृकर्म, संततिकर्म इत्यादि संज्ञा दिल्या आहेत. परंतु फलज्योतिषांत जन्मकुंडलीच्या आधारानें प्रत्येक ग्रहाच्या शुभाशुभ फलांचा विचार करीत असतां त्यांतील अमुक ग्रहाच्या अशुभ फलाला अमक्या व्यक्तीचें कर्म अशी संज्ञा देण्याचें स्वारस्य काय तेंच लक्षांत येत नाहीं. ज्याला रा. काटवे हे ' मातृकर्म ' अशी संज्ञा देतात तो ' चंद्र ' बिघडणार किंवा ' पितृकर्म ' म्हणतात तो ' रवि ' बिघडल्याचा परिणाम आहे एवढाच त्याचा अर्थ होतो. तेव्हां फलज्योतिषाच्या वादांत पूर्वकर्माच्या आणखी एका नव्या वादाची भर घालण्यांत तात्पर्य काय? असो. पूर्वकर्म म्हणून असो अगर केवळ ग्रहाच्या शुभाशुभ स्थानाचा परिणाम आयुष्यांत कोणत्या प्रकारानें दिसून येतो त्यांचीं रा. काटवे यांनीं दिलेलीं उदाहरणें या शास्त्रावर विश्वास नसणारांनींहि तपासून पहावीं. रा. काटवे यांच्याजवळ अशा प्रकारच्या कुंडल्यांचा बराच मोठा संग्रह असून जिज्ञासूंना त्यांचा उपयोग होण्याजोगा आहे.

या छोट्या पुस्तकांत कै. लोकमान्य टिळकांच्या कुंडलीचा सूक्ष्म विचार केला असून तीवरून सायन कुंडलीपेक्षां निरयनपद्धतीची कुंडलीच कशी तंतोतंत जुळते हें दाखविलें आहे; आणि सायनवाद्यांना निरुत्तर करण्याजोगे कांहीं मार्मिक प्रश्नहि

विचारले आहेत. आमच्या मतें या सायननिरयन वादाचा निर्णय जन्मकुंडलीवरून करण्यापेक्षां तो रोजच्या शुभाशुभ मुहूर्तावरून करावा. या पुस्तकांतील पांचव्या व सहाव्या प्रकरणांत फलज्योतिषांस जी विनंति केली आहे, आणि कांहीं अनुभव नमूद केले आहेत ते सर्वांनीं लक्षांत घेण्याजोगे आहेत. हें पुस्तक छोटेंसेंच (पृष्ठसंख्या ६९) असलें तरी तें तज्ज्ञांच्या विचारांस चालना देणारें आणि अतज्ज्ञांच्या जिज्ञासेची अभिवृद्धि करणारें असें आहे.

**प्रभात (७-४-२९)**—या पुस्तकांत ज्योतिषविषयाची मांडणी अगदीं नवीन तऱ्हेनें केलेली आहे. ज्योतिषी लोकांना असे प्रसंग वारंवार येतात कीं, कोणीहि एकाद्या पृच्छकानें आपली कुंडली घेऊन यावें, आणि घराच्या बाबतींत अगर पत्नीच्या बाबतींत अगर धंद्यासंबंधीं एखाद्या प्रश्नाबद्दल नेमकें विचारावें. सामान्य ज्योतिषी असला तर त्याला अशा एका प्रश्नासाठीं कोणत्या ग्रहांचा विचार करून उत्तर द्यावें याची फार पंचाईत पडते. परंतु अशा प्रकारची अडचण दूर करण्यासाठीं श्री. काटवे यांनीं प्रस्तुत पुस्तकानें मानवी दैवाचे आठ प्रकार करून त्या प्रत्येकाचें कारकत्व एकेका स्वतंत्र ग्रहाकडे सोंपविलेलें आहे. त्यांनीं आपल्या पुस्तकांत १ स्वतःचें दैव म्ह० शनि, २ घराण्याचें कर्म० म्ह० राहु, ३ मातृकर्म म्ह० चंद्र, ४ पितृकर्म म्ह० रवि, ५ पत्नीकर्म म्ह० शुक्र, ६ संततिकर्म म्ह० गुरु, ७ मैत्रीविचार म्ह० बुध, आणि ८ स्थावर इस्टेटीचा विचार करावचाचा म्हणजे मंगळ, अशा आठ प्रकारांत प्रत्येक माणसाचें सर्व दैव सांठविल्याचें सांगितलें आहे आणि यांपैकीं कोणत्याहि प्रकारचा प्रश्न असला तरी त्याबद्दलच्या एका कारक ग्रहाचा विचार केला म्हणजे तेवढ्यावरूनच ताबडतोब उत्तर सांगतां येतें असें प्रतिपादन केलेलें आहे.

प्रस्तुत पुस्तकांत अशा निरनिराळ्या प्रश्नांची उत्तरें त्या त्या प्रश्नाच्या एकेका कारक ग्रहावरून देण्याच्या पद्धति उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलेल्या आहेत. वास्तविक कोणत्याहि एका प्रश्नाचें उत्तर सर्वस्वीं त्याच्या एकाच कारक ग्रहाच्या विचारावरून देणें ही पद्धति बिनचूक आहे असा विश्वास मनाला पटत नाहीं. सर्वसामान्यतः ज्योतिषी लोकांचा असाच अनुभव आहे कीं, कोणत्याहि एका प्रश्नाचें निश्चित उत्तर देण्यास एकाहून जास्तच ग्रहांचा नेहमीं विचार करावा

लागतो आणि म्हणूनच श्री. काटवे यांचें वरील मत एका नवीन पद्धतीवर उभारलेलें आहे असें वाटतें.

याशिवाय हर्शल व नेपच्यून या दोन ग्रहांना श्री. काटवे यांनीं प्रस्तुत पुस्तकांत कोणत्याच गोष्टीचें कारकत्व दिलेलें नाहीं. अर्थात् ते दोन्ही ग्रह मनुष्य प्राण्याच्या कोणत्याहि परिस्थितीवर कसलाच अंमल चालवूं शकत नाहींत असेंच त्यांचें मत दिसतें. परंतु तें मत कितीजणांस पसंत पडेल हा प्रश्नच आहे. कारण हर्शल व नेपच्यून या दोन ग्रहांमुळें इतर ग्रहांच्या फलादेशांत फरक पडल्याचे अनुभव पटल्यावांचून रहात नाहींत. असो.

प्रस्तुत पुस्तकाच्या अखेरीस, फलज्योतिष चुकण्याचीं जीं सविस्तर कारणें दिलेलीं आहेत तीं मात्र अभ्यासकांनीं खरोखर विचार करण्याजोगीं आहेत. या शिवाय 'स्वनःचे अनुभव' म्हणून जे ठोकतोळे दिलेले आहेत तेहि संग्राह्य आहेत.

प्रस्तुत पुस्तकांतील ३१ व्या पृष्ठावर श्री. नवाथेप्रभृति सायनमतवादी ज्योतिषांस श्री. काटवे यांनी कांहीं वेचक प्रश्न विचारले आहेत आणि नक्षत्रांचे बाबतींत ते प्रश्न विचारणीयहि आहेत. कारण संपातापासून आश्विन्यारंभ मानण्याची चाल आपल्या भारतवर्षांत प्रचलित होती कीं काय व त्यामुळें आकाशांतील नक्षत्रांच्या जागा आपापल्या तारकसमूहांना सोडून संपाताच्या पाठीमागें धांवत होत्या कीं काय, हा विचार करून सायनमतवादी ज्योतिषांनीं अश्विनींचा आरंभ संपाताच्या चंचल तालावर सर्व आकाशभर वाटेल तितका नाचवीत नेणें योग्य कीं अयोग्य हें नीट लक्षांत घेणें जरूरीचें आहे.

असो. श्री. काटवे यांच्या पुस्तकांतील हा सायननिरयन वाद वगळला तर कित्येक गोष्टी ज्योतिषाच्या अभ्यासकांस चिंतन करण्याजोग्या आहेत; आणि म्हणून प्रत्येक ज्योतिषाच्या अभ्यासकानें हें पुस्तक संग्रहीं ठेवून अवश्य वाचावें अशी आमची सूचना आहे. श्री. काटवे यांच्या ज्योतिषशास्त्राच्या हौसेबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों.

**ज्ञानप्रकाश** ( २८-११-३० )—हें सत्तर पानांचें पुस्तक रा. हणमंतसा नेमासा काटवे ( विद्यार्थी-ज्योतिषी, मु. शहापूर-बेळगांव ) यांनीं केलें आहे. मनुष्याची पत्रिका पाहून फलें सांगितलीं तर तीं पुष्कळ वेळां जमत नाहींत. याचें कारण काय असावें या दृष्टीनें संशोधन करतां पत्रिकेवर पूर्वसुकृत-

दुष्कृतांचाहि परिणाम होत असला पाहिजे अशी पुस्तककर्त्यांची कल्पना होऊन त्यांनीं बऱ्याचशा पत्रिकांचें परीक्षण केलें व आपल्या उपपत्तीस पोषक असा पुरावा जमा केला. प्रस्तुत पुस्तकांत त्यांनीं कित्येक माणसांच्या पत्रिका देऊन अष्ट ग्रहांत दैवाचें मिश्रण कसें असतें हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें पतिपत्नी, पितापुत्र वगैरे एकत्र राहणाऱ्या माणसांच्या दैवांचा त्यांच्या सहवासांत असणाऱ्या माणसांच्या जीवनक्रमावर परिणाम होतो हीहि उपपत्ति त्यांनीं प्रस्तुत पुस्तकांत कांहीं पत्रिकांच्या आधारें मांडली आहे. दोन वर्षांपूर्वीं त्यांना ही कल्पना आली; त्याच वेळीं 'दैवरहस्य' नांवाचें एक पुस्तक त्यांनीं प्रकाशित केलें. पण त्यांत या विषयाची केवळ रूपरेषा दर्शविण्यांत आली होती. प्रस्तुत पुस्तकांत तोच विषय जरा विस्तृत रीतीनें निदर्शित केला आहे. ज्योतिषाचे व्यासंगी व त्याबद्दल सश्रद्ध असणारे गृहस्थ यांना हें पुस्तक निःसंशय विचारप्रवर्तक होण्यासारखें आहे.

प्रिं. **गोविंद सदाशिव आपटे,** एम्. ए., वेधशाळा, उज्जयिनी—

दैवविचार व रहस्य या दोन्ही पुस्तकांत रा. हणमंतसा नेमासा काटवे यांनीं आपले अनुभव ग्रथित केले आहेत. कुंडलींत चतुर्थस्थानचें महत्त्व इतर भावांपेक्षां अधिक आहे व पत्रिकेंत कांहीं चांगले किंवा वाईट योग एकदम पाहणाऱ्यास दिसत असून प्रत्यक्ष फल याच्या उलट असतें याचें गूढ जीवात्म्याला आठ प्रकारचें दैव कसें भोगावें लागतें व संचित व क्रियमाण यांच्याशीं दैवगती कशी निगडित आहे हें दाखविण्याचा ग्रंथकारांनीं बराच चांगला प्रयत्न केला आहे. रवि, राहु व शनी यांच्या फलिताची विशेष चर्चा केली आहे. **सायनवाद्यांची असंबद्धता प्रसंगवशात् चव्हाट्यावर आणली आहे. सदरील दोन्ही पुस्तकांपासून चांगली करमणूक होते व कांहीं नवीन ज्ञानहि प्राप्त होतें. निदान स्वतंत्रपणें विचार करण्याची इच्छा होते यांत संशय नाहीं.** ज्योतिषी फल सांगतांना कित्येक वेळां कसे अविचारी असतात, हेंहि त्यांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. त्यांनीं दिलेल्या नियमांसंबंधीं इतकें मात्र म्हणावेंसें वाटतें कीं, तसे नियम ठरविण्यास थोड्या कालांतील उदाहरणें पुरेशीं होतील कीं नाहीं याबद्दल मला शंका वाटते.

राजज्योतिषी **श्रीनिवास महादेव पाठक,** जातक तत्त्व व हिंदी पामिस्ट्रीचे कर्ते, रतलाम संस्थान.—श्री. काटवेलिखित दैवविचार हें पुस्तक मीं साद्यंत पाहिलें.

पुस्तक ज्योतिषि लोकांच्या उपयोगी, मननीय आणि संग्रह करण्यायोग्य आहे. याचे विचार लेखकानें बरे केले आहेत.

**महेश्वर गणेशभट्ट ठाकूर**, ज्योतिषि, मुक्काम आमोणें, पो. डिचोली, प्रांत गोंवा ( २-१२-३० )—ज्योतिषि लोकांत अत्यंत खळबळ उडवून नवी दिशा व नवें धोरण दाखविणारा व ग्रहयोगांवर विशेषेंकरून शनीवर निर्भीड चर्चा करणारा असा हा ग्रंथ आहे. याला जुन्या ग्रंथांच्या आधारांपेक्षां नवा काल, नवा अनुभव व नवी पद्धति यांचाच भक्कम आधार असल्यानें जुन्या पद्धतीच्या ज्योतिषांस जरी वाचण्यापलीकडे याचा तादृश उपयोग नसला तरी बहुश्रुत व चतुरस्त्र अशा नव्या मंडळींस विचार करण्यास उत्तम साधनीभूत झाला आहे. ग्रहांवर तें तें दैव कल्पनेनें जरी योजिलें आहे तरी पितृसौख्य रवीणाम्, मातृसौख्य चंद्रेण, पुत्रसौख्य गुरूणाम्, इत्यादि जुन्या ग्रंथांतसुद्धां या कल्पनेला चांगलाच आधार आहे.

सायननिरयनवाद हा वादग्रस्त विषय आहे. ज्योतिषांस विनंति, विचार व ठोकताळे वगैरे विषय विचारणीय आहेत. नवी धर्ती असल्यानें स्वतः ग्रंथकार कांहीं ठिकाणीं संशयांत राहून इतरांसहि संशयांत लोटीत आहेत. पण एकंदरींत पुस्तक वाचनीय आहे, अलीकडे श्री. नवाथे वगैरे मंडळींनीं पूर्वींच्या ग्रंथांवर टीका भाषांतर करून त्यांस लोकोपयोगी करीत आहेत हें बरें आहे. पण त्यांत स्वतःचे विचार संशयित रीतीनें घुसडून प्रश्नार्थक काम करून आपला व दुसऱ्यांचा घोंटाळा करितात. पूर्वींच्या लोकांनीं स्पष्ट योग सांगितले ते पटत नाहींत तर तुम्ही तरी दुसरे योग सांगा, पण सगळाच ब्रह्मघोंटाळा करून ' नाहीं हें नाहीं तें ' अशी स्थिति केली आहे. अस्तु.

फलज्योतिषावर स्वतंत्र विचाराचीं व उत्तम तऱ्हेचीं पुस्तकें निर्माण केल्याबद्दल श्री. काटवे यांस धन्यवाद देऊन व अशींच जुन्या वळणाचीं पण नव्या पद्धतींत पुस्तकें त्यांच्याकडून तयार व्हावीं असें ईश्वराकडे चिंतून आणि श्री. भागवत यांनीं ज्योतिष्याचीं पुस्तकें प्रसिद्ध करून ज्योतिषी लोकांवर उपकार केला आहे, त्याविषयीं त्यांस धन्यवाद देऊन हा अभिप्रायदर्शक लेख पुरा करतों.

पंडित **माधवीवसंत**, दुधिया तलाव, नवसारी—श्री. काटवे यांच्या ' दैवविचार ' या लहानशा ग्रंथांत संशोधकास विचार करण्यासारखा व कित्येक ठिकाणीं उत्पत्तीच्या बाबतींत विचाराची दिशा ठरविण्यासारखा भाग आहे. असो.

दैवविचार हा छोटासा ग्रंथ अनेक नवे विचार सुचविण्याइतका महत्त्वाचा समजण्यास हरकत नाहीं. ग्रंथकर्त्यांचे अनेक विचार, उपपत्ति व सिद्धांत, अनुभव व प्रत्यक्ष दृष्टांत यांवरून तावूनसुलाखून घेण्याचा मार्ग सर्वांस खुला आहे. चिकित्सक बुद्धीनें कोणत्याहि शास्त्राचे कानेकोपरे शोधून काढणारांच्या हातनच शास्त्राचें क्षेत्र वाढविण्यांत येतें किंवा नव्याच बाजूवर प्रकाश पडतो एवढें हा ग्रंथ दाखवूं शकेल यांत संशय नाहीं.

## "दैव-विचार" पहिली आवृत्ति संपत आली.

### श्री. हणमंतसा नेमासा काटवेकृत

# प्रश्न-विचार कि. १८४

या ग्रंथांत पंचांगावांचून तात्कालिक प्रश्न सांगण्याची पद्धत, सुलभ व अगदीं नवीन तऱ्हेनें सांगितली आहे. शिवाय आठ दिवसांचीं प्रश्नोत्तरें दिलीं आहेत. प्रत्येक ज्योतिषास अत्यंत उपयुक्त असें हें पुस्तक झालें आहे. तरी लवकर मागणी करावी.

**विषयानुक्रमणिकाः**—१ विषयप्रवेश. २ कारक ग्रह. ३ प्रश्नसमुदाय. ४ ग्रह आणि दिशा. ५ वार व ग्रहभ्रमण. ६ कालनिर्णय. ७ प्रश्नविचार. ८ वारक्रमानें प्रश्नविचार.

# तेज-विचार कि. ८४

ईश्वरनिर्मित मनुष्यप्राण्यांचे चेहऱ्यांवर पांच प्रकारचें तेज असतें त्यांचे प्रकारः—१ ईश्वरी तेज. २ दैवी तेज. ३ मानवी तेज. ४ आसुरी तेज. ५ पैशाचिक तेज.


या पांच प्रकारच्या तेजांचा खुलासा अगदीं नवीन तऱ्हेनें स्पष्ट सांगितला आहे. कुंडली नसतांना पुढील भविष्य सांगणेसाठीं या पुस्तकाचा फारच उपयोग होणार आहे. या पुस्तकांतील विचार वाचकांस अगदीं नवीनच वाटतील यांत शंका नाहीं. **पाच आण्यांचीं पोस्टांचीं तिकिटें पाठवावीं.**

श्री. हणमंतसा नेमासा काटवेकृत

# राहु-विचार

कि. ०१२

मराठी भाषेंत राहूसंबंधीं माहिती असलेला असा स्वतंत्र ग्रंथ नाहीं. सबब मुद्दाम या पुस्तकांत राहूसंबंधीं सर्व प्रकारें सविस्तर विचार केला आहे. कांहीं अनुभविक व अद्‌भुत अशी माहितीहि ग्रंथकारानें यांत दिली असून ती वाचकांना अत्यंत मनोरंजक वाटेल अशी आम्हांस खात्री वाटते.



# राहु, तेजविचार व प्रश्नविचार यांवरील

# अभिप्राय

## राहु–विचार

केवळ क्षुण्ण विचारसरणी ग्राह्य धरून चालणारांपैकीं हे गृहस्थ नाहींत. ज्या बाबींचा प्रत्यक्ष अनुभवानें उलगडा पडत नाहीं. त्यासंबंधानें स्वतंत्र विचार करून तत्त्व व अनुभव यांची सांगड घालण्याचा पायाशुद्ध रीतीनें प्रयत्न करणें हेंच कार्य करण्याकडे त्यांची प्रवृत्ति कशी असतें हें त्यांच्या आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांवरून चांगल्या रीतीनें निदर्शनास आलें आहे. प्रस्तुत पुस्तकांत राहूचें कारकत्व, राहूचीं द्वादश भावगत फलें, राहूचें द्वादश भावगत भ्रमण, त्याचे इतर ग्रहांशीं होणारे योग, महादशादि विचार, त्रिपिढी ज्योतिष वगैरे बाबींचें त्यांनीं सोदाहरण विवरण केलें आहे. फलज्योतिष ग्रंथांमध्यें राहूसंबंधानें विवेचन केलेलें आढळत नाहीं. ती उणीव दूर होऊन मनुष्याच्या आयुष्यक्रमावर राहूचे काय परिणाम होतात हें समजण्यास सुलभता यावी या उद्देशानें त्यांनीं हें पुस्तक लिहिलें आहे.

—(ज्ञानप्रकाश–पुणें, ता. १०–६–१९३२.)

## तेज–विचार

या पुस्तकांत रा. काटवे यांनीं ईश्वरी तेज, दैवी तेज, मानवी तेज, आसुरी तेज व पैशाचिक तेज, अशीं पांच प्रकारचीं तेजें कल्पून त्यांचें स्वरूपवर्णन दिलेलें आहे. प्रत्येक तेजाचे काय गुणधर्म असतात व विशिष्ट व्यक्तींत कोणत्या प्रकारचें तेज प्राधान्येंकरून वास करीत आहे, हें ओळखावें कसें याबद्दल त्यांनीं माहिती दिली आहे. ती देतांना कोणतें तेज कोणांमध्यें विशेष वरचढ आहे हें दाखविण्यासाठीं कांहीं परिचित व्यक्तींचीं उदाहरणेंहि दिलीं आहेत. पुस्तकांत दिलेले सिद्धान्त सर्वांनाच पटण्यासारखे नसले किंवा या सिद्धा-न्तांची उपयुक्तता प्रत्यक्ष व्यवहारांत कशी पारखली जाणार याबद्दल पुष्कळ माणसांना संशय वाटणें स्वाभाविक असलें तरी त्यांची भूमिका व त्यावर त्यांनीं बसविलेली मीमांसा हीं निःसंशय मनोरंजक आहेत. निरनिराळ्या तेजांच्या

गुणधर्मांचे त्यांनीं जे आडाखे दिले आहेत त्यांतील कांहीं एकाहून अधिक तेजांना लागू पडत असल्यामुळें विशिष्ट तेजांचें पृथक्करण करणें अर्थातच कठीण पडेल.

—( ज्ञानप्रकाश ,१०-६-३२ )

## प्रश्न-विचार

दैवविचार, राहुविचार, तेजविचार वगैरे पुस्तकांच्या योगानें वाचकांशीं परिचित झालेले रा. ह. ना. काटवे यांनीं हें पुस्तक लिहिलें आहे. रा. काटवे यांच्या ज्योतिषविषयक व्यासंगाचा व विवेचनाचा विशेष म्हणजे ते पूर्वपरंपरागत आलेल्या चाकोरींतून निमुटपणें चालणारे नाहींत. प्रत्येक बाबीचा स्वतंत्र रीतीनें विचार करून मनास जें पटेल त्याचाच प्रचार करणारे आहेत. प्रस्तुत प्रश्नविचार या पुस्तकांतहि त्यांनीं आपली अशीच एक स्वतंत्र विचार-सरणी मांडली आहे. कोणी प्रश्न विचारावयास आला म्हणजे त्या वेळची कुंडली मांडून उत्तर देण्याची वहिवाट आज परंपरागत आहे. पण हा प्रघात दोषमय व कित्येक प्रसंगांत विसंगति उत्पन्न करणारा कसा आहे हें दाखवून रा. काटवे यांनीं आपल्या पद्धतीचें विवरण केलें आहे. सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीनें जातकापेक्षां प्रश्नजातकाचें महत्त्व विशेष आहे. कारण तात्कालिक प्रश्न विचारावयास येणाऱ्या लोकांचेंच प्रमाण फार मोठें असतें आणि म्हणून या शाखेचें विवरण साधारण निर्दोष रीतीनें होणें जरूर आहे. रा. काटवे यांनीं आपल्या पुस्तकाची मांडणी हीच दृष्टि ठेवून केली आहे. कोणत्या गोष्टींचे कोणते ग्रह कारक असतात, कोणत्या स्थानांशीं विवक्षित प्रश्नांचा संबंध येतो, ग्रह आणि दिशा यांसच या शाखेंत प्राधान्य देणें कसें अवश्य आहे, पृच्छक ज्या वेळीं प्रश्न विचारावयास येतो त्या वेळीं त्याची बसण्याची, पहाण्याची वगैरे स्थिति कशी असते, हें पहाण्याचें महत्त्व, ग्रहांच्या युतींचीं प्रश्नदृष्ट्या कोण-कोणतीं फळें येण्याचा संभव असतो, वारक्रमानें प्रश्नविचार कसा करावा, वगैरे बाबींचें सुबोध पण खुलासेवार विवरण एकंदर सात प्रकरणांत केलें आहे. आठव्या प्रकरणांत छोटा समारोप दिला असून त्यांत प्रश्नविचारासंबंधांत विहित व अविहित अशा बाबी कोणत्या आहेत यासंबंधाची माहिती सांगितली आहे. पुस्तक प्रतिपाद्य विषयासंबंधांत म्हणजे प्रश्नविचार प्रकरणीं निःसंशय नवीन दृष्टि आणून देणारें आहे.

—( ज्ञानप्रकाश ,१७-७-३२ )

पं. माधवीवसंतकृत

# हर्शल व नेपच्यून कि. २ रु.

प्रस्तावना लेखकः—श्री. येशवंत केशव प्रधान

कै. "गणकभास्कर" **वि. गो. नवाथे**—आपण हें पुस्तक शक्य तितक्या पुऱ्या व शोधपूर्वक माहितीनें आधुनिक पद्धतीनें लिहिलेलें असल्यामुळें ज्ञानवर्धक झालेलें आहे व आपण ज्योतिषवाङ्मयांत चर्वितचर्वण न करितां नवीन भर टाकलेली आहे यांत शंका नाहीं. हे ग्रह नवीन असल्यामुळें हिंदुस्थानांतील ज्योतिर्षीवर्गास त्यांची कल्पनाहि नव्हती. हर्शल व नेपच्यून म्हणजेच राहु व केतु अशीहि पुष्कळांची समजूत झालेली होती. आकस्मिकता, अद्‌भुतता, अपूर्वता, लोकविलक्षणशक्ति, अतींद्रियज्ञान इत्यादि बुद्धीच्या कार्यक्षेत्राच्या पलीकडील कल्पनातीत गुण पूर्वीच्या सात ग्रहांपैकीं एकाहि ग्रहांत नाहींत; यामुळें अमुक बालक पुढें अद्‌भुत सामर्थ्याचें होईल व त्याचें आयुष्य चमत्कारमय होईल याची कल्पना होण्यास मार्ग नव्हता. ही उणीव या ग्रहांनीं भरून काढलेली असल्यामुळें त्यांची मिळेल तितकी माहिती ज्योतिषवाङ्मयांत संग्रहित होणें आवश्यक होतें. हें काम आपण अत्यंत श्रमानें व बुद्धिचातुर्यानें केलें असल्यामुळें सर्व महाराष्ट्रवाचकांवर आपले उपकार झालेले आहेत असें मी समजतों.

श्री. **दाजी नागेश आपटे, बडोदें**:—पं. माधवीवसंत यांनी या दिशेनें चांगला प्रयत्न केला आहे. एकंदरीनें पुस्तक फार महत्त्वाचें झालें आहे. पुस्तकास अखेर जोडलेला कुंडलीसंग्रहादि स्वयंपरीक्षणास मदत करीलच. तात्पर्य, या विषयावर साद्यंत व पूर्ण माहिती देणारें हें पहिलेंच पुस्तक आहे व त्याची मी मनःपूर्वक शिफारस करतों.

पाश्चात्य पद्धतीनें ज्योतिषशास्त्र शिकणाऱ्यांस अमूल्य संधी

श्री. द्वारकानाथ नारायण राजेकृत

# जातकरहस्य कि. २॥८ रु.

**यांत सायन कुंडली मांडण्याचीं कोष्टकें, प्रश्नज्योतिष, ज्योतिर्वैदक, ग्रहांची परिभ्रमणपद्धति, जन्मरवीचा शरीरावर परिणाम, हर्शल व नेपच्यूनचीं कोष्टकें, दिनवर्षपद्धति, वगैरे अनेक विषयांवर दुर्मिळ व अनुभवसिद्ध माहिती दिली असून ती अत्यंत उपयुक्त आहे.**

# जातकनिधि

कि. २ रु. (आवृत्ति २ री)

सायन भावचलित कोष्टकें, अनुभविक नियम व ठोकताळे वगैरे पुष्कळ माहिती देऊन ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे.

हीं दोन पुस्तकें संग्रहीं ठेविल्यास प्रत्येकास फलज्योतिषशास्त्राचें सुसंगतवार ज्ञान होऊन धंदेवाईकांना ज्योतिषाचा धंदा उत्तम रीतीनें करतां येईल.

कै० " गणकभास्कर " विष्णु गोपाळ नवाथेकृत

# सुलभजातक–भाग ४ था, किं. १८८

राशि म्हणजे क्रांतिवृत्ताचा ३० अंशांचा प्रदेश. या प्रदेशाचें फल सर्वत्र प्रसिद्ध आहे व त्यालाच अनुसरून सर्व ज्योतिषी पत्रिका वर्तवतात. परंतु हा स्थूल मार्ग आहे हें उघड आहे. एखाद्या राशीच्या १ल्या अंशांतला ग्रह व त्याच राशीच्या २९ व्या अंशांतला अगर अन्य कोणत्याहि अंशांतला ग्रह यांत फलसाम्य कसें असूं शकेल? यासाठीं प्रत्येक राशीच्या प्रत्येक अंशाचें वास्तविक फल समजणें आवश्यक आहे हें कोणीहि कबूल करील. परंतु, असें वर्णन उपलब्ध पौर्वात्य ग्रंथांत कोठेंहि आढळत नाहीं. बृहज्जातकांत शेवटीं प्रत्येक राशीच्या प्रत्येक द्रेष्काणाचीं (१० अंशांच्या प्रदेशाचीं) स्वरूपें यवनांचीं म्हणून दिलीं आहेत. यावरून तशींच स्वरूपें प्रत्येक अंशाचींहि असलीं पाहिजेत, अशी सहज कल्पना होते. अलीकडे पाश्चात्य ज्योतिषी नवीन नवीन शोध लावीत आहेत. त्यांच्याच प्रयत्नानें प्रत्येक अंशाच्या स्वरूपाची माहिती इंग्रजींत उपलब्ध झाली ती मराठी वाचकांसाठीं या पुस्तकांत जशीच्या तशीच संग्रहित केली आहे. शिवाय राशिस्वरूपांची व त्यांच्या फलांची उपपत्ति स्वकल्पनेनें बसवली असून शेवटीं स्वतःचीं अंशवर्णनेंहि जोडलीं आहेत. मराठी वाचकांना एका नवीन पण अत्यंत उपयुक्त अशा विषयाचा विचार करण्यास हें पुस्तक मार्गदर्शक झाल्यावांचून राहणार नाहीं.

लवकर मागवा !! नवीन ग्रंथ !!!

फलज्योतिषावरील अत्यंत उपयुक्त व संग्राह्य ग्रंथ

ज्योतिषविषयक

# ठोकताळे व अनुभव

प्रस्तावना—लेखक

**ह. ने. काटवे, " दैवविचार "कर्ते.**

या पुस्तकांत कर्त्यानें स्वतःचे अनुभव व ठोकताळे दिले असून त्यांचा उपयोग ज्योतिषी व जिज्ञासु लोकांना व्हावा, या हेतूनें ते पुस्तकरूपानें मुद्दाम छापून प्रसिद्ध केले आहेत. यांत दिलेले ठोकताळे व अनुभव फारच उपयुक्त असून कुंडली पाहण्यास फारच मदत होईल. यांत शकुनाचा भाग दिलेला आहे व शिवाय रविचंद्रांच्या संयोगाचें फल पाश्चिमात्य ग्रंथांना धरून दिलेलें आहे. हें पुस्तक जवळ असल्यावर कुंडली पाहिल्याबरोबर चार-पांच गोष्टी आश्चर्यचकित होण्यासारख्या सहज सांगतां येतील. शिवाय ग्रहांचे गुणधर्म व परिणाम, राशींचे गुणधर्म, दिनवर्ष-पद्धतीचे योग वगैरे उपयुक्त माहिती दिली आहे.

अशा प्रकारचें स्वतंत्र पुस्तक मराठी भाषेंत अद्याप प्रसिद्ध झालेलें नाहीं; सबब आम्हीं मुद्दाम बरेच श्रम घेऊन हें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे. याचा महाराष्ट्रवाचकवर्गानें जरूर फायदा घ्यावा. **किंमत रु. १८४**

प्रकाशक

**वि. ग. भागवत आणि मंडळी,**

बुकसेलर्स, पुणें, नं. २.

## फलज्योतिषावरील अगदीं नवीन उपयुक्त ग्रंथ

# नाक्षत्र-रहस्य भाग १ ला.

ज्योतिषशास्त्र हें नक्षत्र व राशि यांवर अवलंबून आहे. राशिपद्धति प्रचारांत येण्यापूर्वी वेदांग ज्योतिषकालापासून सर्वत्र नक्षत्रपद्धतीच प्रचारांत होती. पूर्वकालीं नक्षत्रांवरूनच फलें पाहण्याचा प्रघात जास्त होता. राशिपद्धतीपेक्षां नाक्षत्रपद्धति जास्त सूक्ष्म आहे. राशींचा विचार स्थूल व नक्षत्रविचार सूक्ष्म. त्यांतहि प्रत्येक नक्षत्रचरणाचा विचार त्याहूनहि सूक्ष्म असतो.वस्तुतः राशींची मांडणी नक्षत्रांवरूनच झालेली आहे. नुसत्या राशींच्या गुणधर्मांनीं फलें सांगतां येणें कठीण आहे. त्यास प्रत्येक नक्षत्राचे गुणधर्म, त्यांचीं तत्त्वें व त्यांचा स्वभाव वगैरे लक्षांत घेणें अवश्य आहे. अर्थातच राशींवरून येणाऱ्या फलापेक्षां नक्षत्रांवरून येणारीं फलें अधिक सूक्ष्म व अधिक पटण्यासारखीं येत असलीं पाहिजेत हें सांगणें नकोच. परंतु अशा तऱ्हेचा म्हणजे सूक्ष्मरीत्या नक्षत्रफलांचा विचार ज्यांत केला आहे असा प्रयत्न मराठींत फारसा कोठें आढळत नाहीं, तो प्रस्तुत पुस्तकांत प्रामुख्यानें दिसून येणार आहे. यांत नक्षत्रफलांचा सांगोपांग विचार केला आहे. नक्षत्रें ( अभिजितसुद्धां ) अठ्ठावीस त्यांचे प्रकार, ( स्थिर, चर, मृदु व क्रूर इ. ) त्यांच्या मुखलोचनादि संज्ञा, त्यांचे स्वभाव, त्यांचे गुणधर्म, त्यांचे वर्ण, त्यांचे परस्परराशीं व निरनिराळ्या ग्रहांशीं होणारे योग व त्यांचे परिणाम ( सत्त्वरजतमादि गुणानुरूप), नक्षत्रांच्या देवता, त्यांचे आराध्यवृक्ष, त्यांचें वर्णन व तदनुषंगिक अनुभविक माहिती, गंडांत, मूळ, ज्येष्ठा, आश्लेषा वगैरे घातक नक्षत्रांचें वर्णन, निरनिराळे ग्रह, त्यांचे स्वभाव व त्यांचा त्या त्या नक्षत्राशीं योग झाल्यामुळें येणारीं फलें, गणांचा विचार, निरनिराळ्या नाक्षत्रफलांच्या कुंडल्या ( अल्प चरित्रांसह ) ( श्री. शिवछत्रपति, लो. टिळक, महात्मा गांधी, कैसर, नेपोलियन बोनापार्ट, झांशीची राणी, श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि, कै. हरि नारायण आपटे, श्रीमत् शंकराचार्य ( डॉ. कुर्तकोटी ), बालगंधर्व, इ. च्या त्यांचीं द्वादशभावगत फलें, नाक्षत्रिक कुंडली मांडण्याची सोपी रीत, नक्षत्रांचे शर, दिशा, क्रांति व वार्षिक गति यांचे तसेंच सप्तऋषींचे क्रांतिवृत्ताचे अंश व गति यांचें कोष्टक, ग्रहांचे परस्पर वेध ध्यानीं येण्याकरितां पंच-सप्तशलाकादि चक्रें इ.इ. भरपूर माहिती यांत समाविष्ट केली आहे.